# धर्मग्रंथ

रत्नाकर महाजन

साहित्य प्रतिष्ठान

# धर्म ग्रंथ

हिंदू प्राचीन धर्मग्रंथांचा थोडक्यात परिचय

परिचयकर्ता : रत्नाकर महाजन

ई साहित्य प्रतिष्ठान

# धर्मग्रंथ (Dharmagranth)

हिंदू प्राचीन धर्मग्रंथांचा थोडक्यात परिचय

परिचयकर्ता : रत्नाकर महाजन, विले पार्ले, मुंबई

ramahajanp@yahoo.com

ph : 02226128120, 8879011951

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

©esahity Pratishthan® 2014

# प्रकाशकाचे शब्द

हे एक अमूल्य पुस्तक आहे. श्री रत्नाकर महाजन यांनी आयुष्यभराच्या अभ्यासातून आणि गेले वर्षभर अथक मेहनत करून वयाच्या ७८व्या वर्षी हे पुस्तक लिहिलं आहे. काही हजार पानांची टिपणं काढून त्यातून हे ३०० पानी पुस्तक त्यांनी लिहिलं आहे. आणि तरीही नम्रपणे त्यांनी त्यावर लेखक अशी मुद्रा न लावता परिचयकर्ता अशी ओळख दिली आहे. हे पुस्तक त्यांनी वाचकांना विनामूल्य द्यायची अट टाकली आहे. तत्त्वज्ञान वाचणारे खूप असतात. पण जगणारे फ़ारच कमी. रत्नाकर महाजन यांच्या “इदं न मम” वृत्तीचे मूळ त्यांच्यात खोलवर रुजलेल्या तत्त्वज्ञानात आहे. हे कर्मयोगी भारतीय तत्त्वज्ञान हीच या देशाची आणि या देशातल्या लोकांची शक्ती आहे. अगदी हडकुळी दिसणारी भारतीय मंडळी कुठल्याही सुपरमॅनला मागे टाकतील अशी शक्तीमान आहेत. जेव्हा त्यांच्यावर “तशी” वेळ येते तेव्हा त्यांच्यातील ती शक्ती प्रकट होते. असे भारतीय असल्याचा आम्हाला अभिमान आहे. गर्व आहे. घमेंडही आहे.

पण ...

पण ही आमची मूळं आहेत तरी काय? आम्ही भले वेद, उपनिषदं, श्रुती, स्मृती, पुराणॆ, आदिंच्या गमजा सांगतो, मिरवतो. पण कधी वाचतो का? त्यात काय आहे हे तरी आपल्याला माहित असतं का? ज्या काळी युरोपातल्या लोकांना लेखी भाषा नव्हती, कपडेही घालता येत नव्हते आणि अन्न शिजवायची माहिती नव्हती, तेव्हा आम्ही, आमचे पूर्वज, असे भारी भारी ग्रंथ लिहायचो. पण आता त्यांचा अभ्यास युरोपीय लोक करतात. त्यांच्या वाचनालयांत ती पुस्तकं असतात. त्यांच्या विद्यापीठांत ती असतात. आणि आम्हाला धड त्यांची नांवंही माहिती नसतात. हे विदारक सत्य आहे. वेद, पुराणं, श्रुती, स्मृती, यांत जे लिहिलंय ते चूक की बरोबर आणि योग्य की अयोग्य हा वेगळा विषय आहेच. पण आम्हाला निदान ते माहित तरी हवं. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचं दहन केलं. पण त्या आधी वाचून त्यात काय चुकीचं आहे ते जाणून घेतलं. आपल्याला तर एक मनुस्मृती सोडली तर इतर स्मृतींची नांवं सुद्धा माहिती नाहीत. आणि म्हणे गर्व आहे. कसला? आपल्या अज्ञानाचा?

श्री रत्नाकर महाजन यांचं हे पुस्तक म्हणजे या महान ग्रंथांची नुसती तोंड ओळख आहे. फ़क्त सुरुवात. प्राथमिक शाळा. पण हे पुस्तक आपल्या या लाखों वाचकांपैकी निदान शंभर वाचकांची जिज्ञासा आणि उत्सुकता जागी करून त्यांना ही पुस्तकं मूळातून वाचायची प्रेरणा देईल अशी आशा आहे. तसं झालं तरच श्री महाजन यांची ७८व्या वर्षाची मेहनत सार्थकी लागली असे म्हणता येईल. श्री विजय पांढरे यांची भावार्थ ज्ञानेश्वरी प्रसारित केली तेव्हा आम्हाला जो भरघोस प्रतिसाद मिळाला तसाच या पुस्तकालाही मिळावा हीच अपेक्षा. वाचकांना पुढील अभ्यासासाठी मार्गदर्शन करायला श्री महाजन आहेतच. आम्हीही आपल्या परीने या खजिन्याची वाट दाखवण्याचा प्रयत्न करू.

आपणही आपल्या परीने आम्हाला या कार्यात मदत कराल ही अपेक्षा ठेवू ना?

आपले नम्र<br>
टीम ई साहित्य

“If a good system of agriculture, unrivaled manufacturing skill, a capacity to produce whatever can contribute to either convenience or luxury, schools established in every village for teaching reading, writing, and arithmetic, the general practice of hospitality and charity amongst each other, and above all, a treatment of the female sex full of confidence, respect, and delicacy, are among the signs which denote a civilized people – then the Hindus are not inferior to the nations of Europe, and if civilization is to become an article of trade between England and India, I am convinced that England will gain by the import cargo.”

– Thomas Munro (Governer, East India Company, 1814)

# धर्म ग्रंथ

ख्रिश्चनांचे बायबल, मुसलमानांचे कुराण तसा हिंदूंचा एकच असा ग्रंथ नाही.

आपल्या धर्मात अनेक ग्रंथ आहेत. हे ग्रंथ हजारो वर्षांपूर्वीचे आहेत. त्या ग्रंथांची नुसती यादी वाचली तरी छाती दडपून जाईल!

आपल्या धर्मग्रंथांचा आपल्याला थोडक्यात परिचय व्हावा म्हणून हा छोटासा प्रयत्न. हा प्रयत्न सर्वसमावेशक नाही. काही महत्वाच्या ग्रंथांविषयीचीच माहिती येथे दिली आहे.

पूजा करताना गुरुजी आपणास “श्रुती, स्मृती, पुराणोक्त” असे म्हणायला सांगतात व आपण तसे म्हणतोही पण त्याचा अर्थ काय या विषयी मात्र अनभिज्ञ असतो.

## श्रुती -

प्रथम आपण श्रुती म्हणजे काय ते समजून घेऊया, कारण श्रुती या सर्वात प्राचीन आहेत. श्रुतींचा निश्चित काळ सांगणे कठीण आहे. त्याबाबत मतभेद आढळतात. तरी तो काळ साधारणपणे ४००० ते ५००० वर्षांपुर्वीचा असावा असे वाटते.

श्रुती या शब्दाचा अर्थ 'ऐकलेले' म्हणजे देवांनी जे सांगितले ते  ऐकले व त्याप्रमाणे पाठ केले. कारण त्या काळी लिहायची साधने नव्हती. तेव्हा ऐकून  पाठ करून ठेवणे एवढेच शक्य होते. देवांनी सांगितले म्हणजे कुणा पुरुषाने – व्यक्तीने सांगितले असे होत नाही, म्हणून ते अपौरुषेय.

श्रुतींचे चार भाग पडतात

**१) वेद**

**२) ब्राह्मणे (ग्रंथ)**

**३) आरण्यके**

**४) उपनिषदे**

**वेद** ४ आहेत –

**१) ऋग्वेद,**

**२) यजुर्वेद - दोन भाग शुक्ल यजुर्वेद व कृष्ण यजुर्वेद**

**३) सामवेद**

**४) अथर्ववेद.**

५)**ब्राह्मणे आणि आरण्यके** –वेदात जे सांगितले आहे त्याची चर्चा ब्राह्मणे या ग्रंथात केली आहे. यातील काही चर्चा जंगलात-अरण्यात झाल्या म्हणून त्या ज्या ग्रंथात आहेत त्यांना आरण्यके म्हणतात. ब्राह्मणग्रंथांचे परिशिष्टात्मक भाग म्हणजे आरण्यके होत असाही उल्लेख आढळतो. यात प्रामुख्याने यज्ञ कसे करावेत याची चर्चा आहे.

१) ऐतरेय ब्राह्मण

२) कौषीतकी ब्राह्मण

३) तैत्तिरीय ब्राह्मण

४) शतपथ ब्राहमण

५) तांड्य ब्राह्मण

६) गोपथ ब्राह्मण

## ६) उपनिषदे –

वेदांमधील ज्ञानाविषयीची चर्चा ज्यात आहे त्यांना उपनिषदे असे म्हणतात. अशी उपनिषदे अनेक आहेत त्यातली काही महत्वाची अशी आहेत.

१) ईशावास्योपनिषद्

२) केनोपनिषद्

३) प्रश्नोपनिषद्

४) मांडुक्योपनिषद्

५) बृहदारण्यकोपनिषद्

६) कठोपनिषद्

७) मुंडकोपनिषद्

८) छांदोग्योपनिषद्

९) तैत्तिरीयोपनिषद्

१०) ऐतरेयोपनिषद्

७) **स्मृति** –

स्मृती म्हणजे देवांनी जे सांगितले व त्यातील जे ‘आठवले’ ते.

स्मृतींमध्ये **अत्रिस्मृती, आपस्तंबस्मृती, आंगिरसस्मृती, मनुस्मृती, याज्ञवल्क्यस्मृती, पाराशरस्मृती** इत्यादी ग्रंथ येतात.

८) **षड्दर्शने**– **१) वैशेषिकदर्शन २) न्यायदर्शन ३) योगदर्शन ४) सांख्यदर्शन**

**५) पूर्वमीमांसा दर्शन ६) उत्तरमीमांसा दर्शन**

दर्शन म्हणजे आत्मदर्शन किंवा आत्मसाक्षात्कार होय.

९) **यज्ञ** –वेद आणि ब्राह्मण ग्रंथयासर्वांचायज्ञहाचमुख्य विषयआहे.

१०) **पुराणे व उपपुराणे**- पुराणें ही १८ असून उप-पुराणे पण – १८ च आहेत.

पुराणें -**१) ब्रह्म, २) पद्म, ३) विष्णू, ४) वायु, ५) भागवत, ६) नारदीय, ७) मार्कंडेय, ८) अग्नि, ९) भविष्य, १०) ब्रह्मवैवर्त, ११) वराह, १२) लिंग, १३) स्कंद, १४) वामन, १५) कुर्म, १६) मत्स्य, १७) गरुड व १८) ब्रह्मांड.**

काही पुराणांतून वायूपुराणाऐवजी शिवपुराण आणि भागवतपुराणाऐवजी देवी-भागवत ही नावे आढळतात.

उप-पुराणे –१) आद्य (सनत्कुमारप्रोक्त), २) नारसिंह, ३) स्कांद (कुमारप्रोक्त), ४) शिवधर्म, ५) दुर्वाससोक्त, ६) नारदीय, ७) कापिल, ८) वामन, ९) उशनसेरित, १०) ब्रह्मांड, ११) वारुण, १२) कालिका, १३) माहेश्वर, १४) सांब, १५) सौर, १६) पराशरोक्त, १७) मारीच, १८) भार्गव.

काहींच्या मते या खेरीजही काही उपपुराणे आहेत.

## ११) उपवेद –

उपवेद चार आहेत

**१) आयुर्वेद**

**२) धनुर्वेद**

**३) गांधर्ववेद**

**४) अर्थशात्र**

१२)**वेदांगे** सहा आहेत.

१) शिक्षा २) कल्प

३) व्याकरण ४) निरुक्त

५) छंद ६)ज्योतिष

१३) **इतिहास / काव्य** –

**१) वाल्मिकी रामायण**

**२) योगवासिष्ठ**

**३) महाभारत**

**४) कृष्णचरित्र (हरिवंश/भागवत)**

कोणतेही लिहिण्याचे साधन नसताना हजारो वर्षे ऋषींनी / ब्राह्मणांनी हे ग्रंथ पिढ्यांनपिढ्या पाठ करून जतन करून ठेवले हा एक चमत्कारच म्हणावा लागेल. हे ग्रंथ जसेच्या तसे मिळाले याचे मुख्य कारण हे ज्ञान अक्षरबद्ध, छंदबद्ध, अर्थबद्ध आणि मंत्रबद्ध स्वरुपात निर्माण केले गेले. त्यामुळे त्यात फेरबदल करणे फारसे शक्य नव्हते. दहा ग्रंथ ज्यांचे पाठ असत त्यांना दशग्रंथी ब्राह्मण असे म्हणत असत.

वेद म्हणताना ते विशिष्ट छंदामध्येच म्हणावे लागतात. असे प्रमुख छंद म्हणजे गायत्री, उष्णिक, अनुष्टुप, बृहती, पंक्ति, त्रिष्टुप, जगती, प्रगाथा हे आहेत. यात गायत्री हा सामान्यपणे २४ अक्षरांचा सर्वात लहान छंद असून प्रगाथा हा सर्वात मोठा म्हणजे ८० अक्षरांचा छंद आहे.

जेव्हा लिहिण्याची सोय झाली तेव्हा हे ग्रंथ निरनिराळ्या पाठ केलेल्या माहितीच्या आधारे तयार करण्यात आले.

ही माहिती एकत्र करत असताना त्यातली कोणती माहिती घ्यायची, कोणती नाही याचा विचार करून अधिकृत माहिती जमा केली व निरनिराळे ग्रंथ तयार करण्यात आले. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या कामी आपल्याकडील विद्वानांबरोबरच  अनेक पाश्च्यात्य विद्वानांनीही ह्याला फार मोलाचा हातभार लावला.

हे सगळे साहित्य मुळात संस्कृतमध्ये असल्यामुळे त्याचे अनुवाद, भाषांतर, रुपांतर, लेख, विश्वकोश, इंटरनेट यांच्या मदतीने माहिती करून घ्यावी लागली. यातली सर्व माहितीची टिपणे काही हजार पानांची झाली. मूळ पाने तर काही लक्ष असावीत. यातली फारच थोडी माहिती आपणापर्यंत पोचवित आहे. ती वाचून हे साहित्य मुळातून वाचण्याची व अधिक माहिती मिळविण्याची प्रेरणा आपणास मिळो ही सदिच्छा. माहितीसाठी ज्यातून उतारे घेतले आहेत त्यांचा उल्लेख त्या त्या ठिकाणी केला आहे.

# श्रुती

**मंत्रपुष्पांजली**

ओम यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् तेह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति देवाः ।। १।।

**(ऋग्वेद)**

ओम राजाधिराजाय प्रसह्य साहिने। नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः।।२।।

**(तैत्तरीय अरण्यक)**

ओम स्वस्ति। साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्टयं राज्यं महाराज्यमाधिपत्यं समन्त पर्यायी स्यात् सार्वभौमः सार्वायुषं आन्तादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति ।।३।।

**(ऐतरेय ब्राह्मण)**

ओम तदप्येषः श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरुतस्यावसन् गृहे अविक्षतस्य कामप्रेर्विश्वेदेवा सभासद इति।।४।

**(ऐतरेय ब्राह्मण)**

अर्थ – आम्ही सर्व शक्तिमान व सर्वव्यापक परमेश्वराची नमनपूर्वक प्रार्थना करतो की, हे परमेश्वरा, तू भक्ताचे हृदय जाणणारा आहेस. तर आम्ही मनामध्ये धरलेली इच्छा सफल व्होवो व आमचे कल्याण व्होवो.

आमचे चहुकडे साम्राज्य पसरून त्यामध्ये सर्व उपभोगाचे पदार्थ उत्पन्न होवोत. त्या साम्राज्यामध्ये प्रजातंत्राने चालणारी राज्यपद्धती असो. तेथे सर्व जगतापेक्षा सर्व बाजूनी उत्तम व्यवस्था असो. सर्वलोक परमात्मनिष्ठ होऊन मुक्तीसुखाचे अधिकारी बनोत. आम्हाला त्या साम्राज्यात विशेष अधिकार असोत.

आमच्या साम्राज्यात पुष्कळ अधिकारी असावेत व हे सर्व मिळून होणारे राज्य चारही बाजूनी समुद्रापर्यंत व्यापणाऱ्या पृथ्वीवर पसरलेले असो.

आमचा जो अशा साम्राज्याचा सार्वभौम राजा होईल तो दीर्घायु होऊन हे आमचे साम्राज्य या सृष्टीच्या अंतापर्यंत परार्धकालाच्या समाप्तीपर्यंत एकसारखे नांदत राहो.

## ऋग्वेद

ऋग्वेद हा वेद सर्वांत प्राचीन आहे. यातील बहुतेक सूक्ते ही अफगाणिस्तान ते पंजाब या प्रदेशांत म्हणजे सिंधू नदीच्या दोन्ही तीरांवरील प्रदेशांत रचली गेली असावीत. भारताच्या वायव्य प्रदेशापासून दिल्लीपर्यंतचा प्रदेश हा सप्तसिंधुप्रदेश म्हणून गणला गेला आहे.

ऋग्वेदाच्या रचनेचा काळ पाच हजार वर्षे पूर्वीचा असावा. हा काळ म्हणजे वैदिक आर्यांचा भारतात प्रवेश झाल्यानंतरचा असावा. यातली सूक्ते निरनिराळया ऋषिकुलांमध्ये वंशपरंपरेने रचिली जात होती.

ऋग्वेदाची दहा मण्डले असून एकूण १,०२७ सूक्ते असून १०,६०८ ऋचा आहेत.

**पद** = ओळ

**ऋचा** = पद्यात्मक मंत्र. हे पद्य म्हणजे छंदोबद्ध वाक्यरचना. वेदोत्तर साहित्यात अशा रचनेसश्लोक असे म्हणतात.

**सुक्त** = एकाच विषयावरील ऋचांचा समूह.

**मण्डल** = प्रकरण (भाग)

त्यातली काही निवडक सूक्ते नमुना म्हणून पुढे दिली आहेत. त्यावरून किती वेगवेगळे विषय यात हाताळलेत याची कल्पना येते. यातल्या काही सुक्तांची ओळखही करून दिली आहे.

ऋग्वेदातील पहिल्या ऋचेचा प्रारंभ ‘अ’ या अक्षराने झालेला आहे. कल्पना यावी म्हणून ती ऋचा व तिचा अर्थ मुद्दाम पुढे देत आहे.

## अग्निसूक्त -

**||ॐ || अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातमम् ।**

यज्ञाच्या प्रारंभी ऋत्विज म्हणून ज्याची स्थापना केली आहे अशा देवांना बोलावून आणणाऱ्या, सदैव प्रज्वलित असणाऱ्या आणि ऐश्वर्यसंपन्न अशा अग्नीचे मी स्तवन करतो.

जगाला पावन करणाऱ्या अग्ने, तू सर्वश्रेष्ठ आहेस. तुला आम्ही धृताने अभिषेक करतो. आमचे हविर्भाग तू देवांप्रत ने. कारण तू प्रज्वलित झालास की तुला कोठेही प्रतिबंध नाही.

तुला आम्ही धृत आणि वपा अर्पण करीत आहोत. त्याने तू संतुष्ट हो.

(पशूच्या मध्य शरीरातून अत्यंत पातळ कातडीचा पापुद्रा काढून तो अग्नीला अर्पण करतात. या पापुद्र्याला वपा असे म्हणतात. मेदयुक्त प्राण्याची वपा उत्तम प्रकारची असते. त्यामुळे यज्ञात बळी द्यावयाचा पशू पुष्ट असेल याची काळजी यज्ञकर्ते घेत असत.)

अग्नि तयार करण्याची कृती–

अग्नि दोन काष्ठे (मंथनयष्टि - लाकडे) एकमेकावर घासून तयार केला जात असे. हे काम मोठे जिकीरीचे असे.

अग्नीचे अस्तित्व विविध वस्तूंमध्ये आहे. प्रत्येक स्थळाप्रमाणे या अग्नीचे स्वरूपही भिन्न असून त्याला त्यामुळे विविध नावे देखील प्राप्त झाली आहेत.

| अग्नीचे स्थान | प्राप्त झालेले नाव |
|---|---|
| १) उदकगर्भ | अपांनपात् |
| २) वृक्षगर्भ | दावाग्नि |
| ३) स्थावर व जंगमांच्या उदरी | जठराग्नि |
| ४) पर्वतामध्ये असणारा | अपराग्नि |

उदकामध्ये असलेला अग्नि पाणी प्रकाशमान करतो.

वृक्षांमध्ये असणारा अग्नि लाकडाच्या घर्षणाने गोचर होतो.

स्थावर आणि जंगमांच्या उदरात असलेला अग्नि अन्नरस पचविण्याची क्रिया करतो.

पर्वतामध्ये वास करणारा अग्नि प्रजाहित करणारा आहे.

चत्वारि शृंगा: त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य
त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्यां आविवेश

(चार शिंगे म्हणजे चार दिशा, तीन पाय म्हणजे तीन वेद, दोन मस्तके म्हणजे दिवस-रात्र, सात हात म्हणजे सप्त किरण, त्रिध:बद्ध म्हणजे पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्यू.)

वडवानल नावाचा अग्नि सागराच्या उदरात राहतो. या अग्नीची ज्वाला अमृतमयी आहे. या अग्नीला चार शिंगे, तीन पाय दोन मस्तके आणि सात हात असून तो मत्तवृषभाप्रमाणे आपल्या डरकाळयांनी मृत्युलोक व्यापून टाकतो.

इंद्राने दुधाचा, सूर्याने दह्याचा आणि अग्नीने तुपाचा शोध लावला. त्यामुळेच अग्नीला धृतधारांनी आनंद होतो. अत्यंत शुद्ध, प्रसन्न नद्यांप्रमाणे शोभिवंत, वायूप्रमाणे दृतागामी, संकेताप्रमाणे धाव घेणाऱ्या सुहास्यवदना युवतीप्रमाणे विवाहाच्या वेळी सालंकृत वधूप्रमाणे पतीकडे धाव घेणाऱ्या, बृहदाकार धृतधारा अग्निकडे झेपावताना पाहताना आनंदाने मन तृप्त होते. स्वत:च्या तेजाने सर्व विश्व भरून टाकणारा वडवानल प्राणीमात्रांना प्रेरणा देऊन अन्न पचविणारा वैश्वानर, जलामध्ये प्रदर्शित होणारा विद्युताग्नी, मानवी उदरात प्रदीप्त होणारा जठराग्नी, संग्रामसमयी उफाळणारा शौर्याग्नी, याला धृताने संतृप्त केल्यावर त्या मधुर रसाचा वाटा आम्हास प्रदान करण्यास समर्थ होतो.

## अग्निविश्वेदेवसूक्त –

विश्वदेव – अग्नि, उषा, अश्विनीकुमार, बृहस्पती, सवितृ, मित्रावरूण, भग, वसु, रुद्र, आदित्य वगैरे एकत्र राहणाऱ्या, यज्ञाची इच्छा करणाऱ्या, देवतांना सामगायन करून आवाहन करतो.

## वैदिक ऋतु-परंपरा

| वैदिक मास | | आधुनिक नाव |
|---|---|---|
| १) | मधु | चैत्र |
| २) | माधव | वैशाख |
| ३) | शुक्र | ज्येष्ठ |
| ४) | शुचि | आषाढ |
| ५) | नभ | श्रावण |
| ६) | नभस्य | भाद्रपद |
| ७) | द्रष | आश्विन |

| | | |
|---|---|---|
| ८) | ऊर्ज | कार्तिक |
| ९) | सह | मार्गशीर्ष |
| १०) | सहस्य | पौष |
| ११) | तप | माघ |
| १२) | तपस्य | फाल्गुन |
| मलमास | | अधिक मास |

**ऋतु नाम** (सहा ऋतूंची नांवे, त्यांचे महिने आणि त्यांची नक्षत्रे)

| ऋतू | महिने | नक्षत्रे |
|---|---|---|
| १) वसंत | चैत्र | चित्रा |
| | वैशाख | विशाखा |
| २) ग्रीष्म | ज्येष्ठ | ज्येष्ठा |
| | आषाढ | पूर्वाषाढा |
| ३) वर्षा | श्रावण | श्रवण |
| | भाद्रपद | पूर्वाभाद्रपदा |

| | | |
|---|---|---|
| ४) शरद् | अश्विन | अश्विनी |
| | कार्तिक | कृत्तिका |
| ५) हेमंत | मार्गशीर्ष | मृगशीर्ष |
| | पौष | पुष्य |
| ६) शिशिर | माघ | मघा |
| | फाल्गुन | उत्तराफाल्गुनी |

## विश्वेदेवसूक्त –

हे संपूर्ण सूक्त शान्तिपाठ म्हणून प्रसिद्ध आहे. या सूत्रात दहा ऋचा असून त्यांचा विनियोग निरनिराळया कारणांसाठी करण्यात येतो. विशेषत: या ऋचा आशीर्वाद मंत्र म्हणूनही म्हणण्यात येतात.

१) वंशवृद्धी

२) स्नेहप्राप्ती

३) सर्वकल्याण

४) औषधातून स्वास्थ्य संपादन

५) संपत्तीलाभ व रक्षण

६) कल्याण प्राप्ती

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः

स्वस्ति नस्ताक्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु

७) संरक्षणार्थ

८) भलेपण उपभोगाशिर्वाद

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा पश्येमाक्षभिर्यजत्राः

स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः

९) शतायुष्य प्राप्ती

१०) देवी अदितीचा मंगल आशीर्वाद

ब्रह्मणस्पती सूक्त -

ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे कविंनामुपमश्रवस्तमम्

ज्येष्ठराजं ब्रह्मणा ब्रह्मणस्पत आ न: शृणवन्नूतिभि: सीदसादनम्

गणांचा स्वामी, ज्ञानवान लोकांमध्ये श्रेष्ठ, आणि ज्येष्ठराज ब्रह्मणस्पते, आम्ही केलेल्या स्तवनांनी तू प्रसन्न होऊन आमच्या मदतीसाठी आमच्या यज्ञात स्थानापन्न हो.

(येथे गणपती म्हणजे गणांचा स्वामी असा अर्थ आहे. श्री गणेश देवता ऋग्वेदकाली नव्हती)

पृथ्वीला जागृत करणारी, मनुष्यांना कामाला प्रवृत्त करणारी, तरुण प्रशंसनीय स्वर्गकन्या उषा आमच्या यज्ञस्थानी अवतीर्ण होत आहे. सूर्याच्या बरोबर संचार करणारे द्रुतगामी सूर्यकिरण पृथ्वी आणि अंतरिक्षात पसरले आहेत. विविध रंगांच्या उल्केप्रमाणे अंतरिक्षात भ्रमण करणारा, अंतरीक्षाचे रक्षण करणारा तेजस्वी सूर्य पूर्व-आकाशात प्रकाशमान होत आहे.

या बालसुर्याला ऋत्विज स्तोत्रे गाऊन दशदिशात हिंडण्यास प्रवृत्त करतात. ग्रीष्म, वर्षा आणि हेमंत या ऋतुमध्ये सूर्यकिरण प्रवेशतात तेंव्हा ते अधिक तेजस्वी होतात. प्रवाहित नदीजल समुद्रात नेण्यास प्रवृत्त करणाऱ्या द्यावापृथ्वी अहोरात्र धारण करतात.

या मातांनी किरणांची वस्त्रे विणलेल्या वस्त्रांनी नर्तनपटू आणि आनंदित स्त्रियांनी सेविलेला सूर्य आमची स्तोस्त्रे स्वीकारतो. अग्निसहित यज्ञस्थानी उपस्थित झालेल्या मित्रावरुणांनो आम्हाला आधार आणि स्थैर्य प्रदान करणाऱ्या सुर्याला आमचे नमस्कार प्रदान करा.

कालचक्र – सूर्यामुळे होणारे एक चक्र म्हणजे एक वर्ष आणि तीन ऋतू उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा आणि त्याचे सात अश्व म्हणजे सात वार.

ईश्वराचे अगुणत्व – ईश्वर दिसत नाही तरी त्याने हे दिसणारे विश्व तयार केले आहे.

जीव-परमात्मा – जीव आणि परमात्मा हे दोन पक्षी एकाच वृक्षाच्या आश्रयाने राहतात. त्यांच्या पैकी  एक फळांचा मधुर रस सेवन करतो आणि दुसरा काहीही न करता याची कृती पाहात बसतो.

१) न मृषा श्रान्तं यदवन्ति देवा:

व्यर्थ कष्ट करणाऱ्यांचे देव रक्षण करीत नाही.

२) सत्या देवेष्वाशिषो जगाम

खरे काम करणाऱ्यांना देवांचे आशीर्वाद मिळतात.

३) न ऋते श्रान्तस्य सख्याय देवा:

शरीर कष्टविल्याविना देवाचे सख्यत्व प्राप्त होत नाही.

**विषसूक्त** – भक्तरक्षक मित्रावरुणांनो शरीरामध्ये अजकाव रोगाने ग्रासणाऱ्या विषापासून आमचे रक्षण होवो आणि वक्रगती सर्प आमच्या पावलांचा आवाज न ऐकोत.

गुडघे आणि घोटे यामधील सांध्यांना त्रास देणाऱ्या वंदन नामक वनस्पती विषाचा, तेजस्वी अग्नी नाश करो.

शाल्मली वृक्ष, नद्या आणि औषधी यामध्ये असलेल्या विषांचा विश्वदेव परिहार करोत.

पर्वतातून निर्माण होणाऱ्या, सखल प्रदेशाकडे वाहत जाणाऱ्या विश्वाला तृप्त करणाऱ्या, उदक समृद्ध नद्या शिपद आणि शिमिद रोगांपासून आम्हास दूर ठेवोत.

**प्रात:स्मरणसूक्त –**

हा यज्ञरूपी रथ तयार झाला आहे. या रथाला चार घोडे, तीन चाबूक आणि सात लगाम आहेत. या रथाला दहा द्वारे असून या यज्ञात दिलेल्या आहुतींनी या रथाला वेग प्राप्त होवो. हे इंद्रा भक्ताकडे येताना तू आठ, दहा, वीस, तीस, चाळीस, पन्नास साठ, सत्तर ऐंशी, नव्वद किंवा शंभर अश्व जोडून आमच्या प्रार्थनेला साथ देण्यासाठी आणि सोमरस प्राशनासाठी त्वरेने ये.

**देवतासूक्त** – स्त्री ही पुरुषाची पत्नी आणि जन्मदात्री पण असते. पुरुष तिच्या ठिकाणी वास करतो.

**सवितृसूक्त** – दैदीप्यमान सविता उदयास आला की प्रत्येक प्राणीमात्राला प्रेरणा मिळते. सवितृ देवाचे किरणरूपी हात दूरपर्यंत जाऊन स्पर्श करतात. त्यांच्यामुळे जल शुद्ध होऊन ते प्रवाहित होते आणि अंतरिक्षात वायू संचार करू लागतो. हाच सवितृदेव मावळला म्हणजे रात्र पसरू लागते. प्रवाशांचा प्रवास आणि वीरांची वीरता काही काळ विराम पावतात. मनुष्ये आपल्या नित्याच्या कार्यातून निर्वृत्त होतात. परतू हाच सवितृदेव रात्रीला मागे सारून जगकल्याणासाठी पुन्हा उदित होतो. उषा ज्या वेळी सवितृदेवाने दिलेले तेज धारण करते आणि मनुष्यमात्रांचे कार्यचक्र सूर्याच्या भ्रमणाप्रमाणे चालते. तृषार्त मृगांना आणि पक्ष्यांना अंतरिक्ष-जल प्राप्त करून देऊन सवितृदेव जीवसखा होतो. सूर्यास्त झाला की पक्षी आपापल्या घरट्यात परत जातात.

**अश्विनीकुमारसूक्त** – वीराप्रमाणे शूर, युवतीप्रमाणे सौदर्यसंपन्न, दांपत्याप्रमाणे सहकारी, रथाच्या धुरेप्रमाणे एकरूप, दोन आंस, दोन तुंबे , दोन चक्रे एक कार्यरूप असणाऱ्या अश्विनीकुमारांनो योद्ध्याच्या कवचाप्रमाणे कवच बनून वार्धक्य आणि संकटे यापासून आमचे रक्षण करा.

दोन ओठांनी एकच मधुर भाषा बोलली जाते, दोन नेत्रांना एकाच दृष्टी, दोन नासिकापुटांतून एकच श्वसन त्याप्रमाणे तुम्ही दोन असूनही एकच कृपा करणारे शक्तीदाते आणि धनदाते आहात.

देवतासूक्त – गायत्री मंत्र

या सूक्तात सुप्रसिद्ध गायत्री मंत्र आहे.

ॐ भू: भूव: सुव: । तत्सवितुर्वरेण्यं । भर्गो देवस्य धीमहि ।

धियो यो न: प्रचोदयात् ॥

पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग यांच्या पलीकडे असल्यामुळे तत् या शब्दाने दाखविता येतो असा पाप दग्ध करणारा जो सूर्य आमच्या बुद्धीला प्रेरणा देवो.

या सूक्तात अनेक देवतांच्या प्रार्थना आहेत.

वायू, इंद्रवायू, मित्रावरून, अश्विनीकुमार, इंद्र, विश्वेदेव, सरस्वती, द्यावापृथ्वी.

**कृषिसूक्त** – या सूक्तात क्षेत्रपती-शेतमालक देवता, शून नांगर, शुनासीर – नांगराचा फाळ, सीता – नांगारलेले शेत यांचे वर्णन आणि स्तवन आहे. या सूक्ताचा उपयोग शेत नांगरताना, बी पेरताना अगर पाणी देताना करतात.

**गर्भस्त्राविणी उपनिषद** –

या मंत्राचा उपयोग प्रसूतीकाली अडलेल्या प्रसवेच्या सुलभ प्रसूतीसाठी करतात. मनुष्य, गाय, अश्व आणि हरीण यांच्या बाबतीत हा प्रयोग केला जातो.

यथा वातो यथा वनं । यथा समुद्र एजति ।

एवा त्वं दशमास्य सहा वेहि जरायुणा ॥

वायूच्या योगाने वन आणि सागर ज्याप्रमाणे स्पंद पावतात त्याप्रमाणे दशमास उदरात राहिलेला आणि उल्बात गुंडाळलेला गर्भ बाहेर पडतो.

दश मासाञ्छशयान: कुमारो अधि मातरि ।

निरैतु जीवो अक्षतो जीवो जीवन्त्या  अधि ॥

मातेच्या उदरात दहा मासांपर्यंत राहिलेला जीवितयुक्त शिशु, त्याला कोणत्याही तऱ्हेची जखम न होता, जिवंत मातेच्या उदरातून जिवंत बाहेर येवो.

## गोसूक्त –

हे सुक्त गोसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. गायीचा गौरव करणारे, गायींची वृद्धि करणारे, दूधदुभते वाढविणारे, आरोग्य पसरविणारे हे सूक्त आहे. रोज संध्याकाळी गायी घरी आल्यावर गोठ्यात त्यांना संरक्षित करावे. एका कोपऱ्यात विशेषत: नैऋत्य कोपऱ्यात अग्नी प्रज्वलित करून, धूप, गुग्गुल अगर चंदन जाळावे. अर्थात हा अग्नी गायींच्या शेणीच्या साह्याने तयार करावा. गाईचे दुध काढण्यापूर्वी गाईकडे तोंड करून या सूक्ताचा पाठ करावा. गाईची धार काढण्यापूर्वी खालील ऋचा म्हणावी. धार कोणीही काढली तरी चालेल पण ही ऋचा गाईच्या जवळ जाऊन म्हणावी. गाईला स्पर्श करून नमस्कार करावा आणि मग धार काढावी.

**आ गावो अग्मन्नुत भद्रमंत्रन् त्सीदन्तु गोष्ठे रणयन्त्वस्मे ।**

**प्रजावती: पुरुरुपा इह स्युरिन्द्राय  पूर्वीरुषसो दुहाना: ॥**

गायी आमच्या घरात येऊन सर्वत्र मंगलत्व निर्माण करोत. आमच्या गोठ्यात येताच त्या गाई प्रसन्न होवोत. या गोठ्यात निरनिराळया वर्णाच्या गाई वत्सयुक्त होऊन उष:कालाच्या वेळी दुध देवोत.

**युद्धसूक्त** – युद्धासाठी निघालेल्या राजाला स्फूर्ती आणि आशीर्वाद देण्यासाठी या सूक्ताचा वापर केला जात असे. या मंत्राच्या साह्याने प्रत्येक आयुध जलाने प्रोक्षण करून सूर्यतेजाच्या स्पर्शाने राजाला प्रदान करीत असत. राज्याभिषेकाच्या वेळी राजाला ही सर्व युद्धायुधे त्या त्या मंत्राच्या घोषात प्रदान करून त्याला शोभायमान केले जात असे. हीआयुधे पुढील प्रमाणे –

चिलखत, धनुष्य, धनुष्याची दोरी (प्रत्यंच्या), बाणभाता, सारथी व लगाम, अश्व, रथ, बाण, चाबूक, हस्तघ्न (धनुष्याच्या दोरीचा आघात मनगटावर होऊ नये म्हणून मनगटावर चर्मवेष्टित आणि पक्ष्यांच्या पिसांनी सुशोभित केलेला मणिबंध बांधतात. त्याला हस्तघ्न असे म्हणतात)

प्रसिद्ध **मृत्युंजय मंत्र** =

त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।

उर्वारूकमिव बंधनाऽऽन्मृत्योमुक्षीय मामृतात ॥

कीर्तिवंत आणि शक्तिमान त्र्यंबकाचे आम्ही यजन करतो. फल तोडणाऱ्या माळयाच्या क्रूरतेने प्राण हिरावून घेणाऱ्या मृत्यूपासून मुक्त करून आम्हास तो अमृतत्व प्रदान करो.

या मंत्राचा प्रयोग खालील कारणांसाठी केला जातो.

१) अतिशय आजारी असलेल्या व्यक्तीला दीर्घायुष्य लाभावे म्हणून

२) आसन्नमरण असलेल्या माणसाला बरे वाटावे म्हणून किंवा त्याचे हाल कायमचे संपावेत आणि त्याला लवकर शांतपणे मृत्यू यावा म्हणूनही याच मंत्राचा प्रयोग करतात. मंत्राने सिद्ध केलेले जल पिण्यास देतात.

३) गाय, हरण, अश्व आणि हत्ती यांना अकाली मृत्यू न यावा म्हणून या मंत्राच्या १०० पाठांनी अभिषेक करून ते पाणी या प्राण्यांस प्यावयास देतात.

४) अपमृत्यू टाळण्यासाठी, मृत्यूची भीती कमी करण्यासाठी अगर नाहीशी करण्यासाठी रोज गायत्री जपानंतर या मंत्राच्या १०० आवृत्या रोज कराव्यात. एकूण मुदत शंभर दिवस. प्रारंभ सोमवारी अगर शिव रात्रीस करावा.

**अपसूक्त** – (जल)

**शं नो देवीरभिष्ट्य आपो भवंतु पीतये ।**

**शं योरभि: स्त्रवन्तु न: ॥**

दिव्य गुणांचा समावेश असलेले हे पाणी पिण्यायोग्य झालेले आहे. आमचा यज्ञ कल्याणमय करून गुप्त रोगांना उत्पन्न न होऊ देता प्रकट रोगांना शांत कर. असत्वा ह्या सुंदर पाण्याचा आकाशातून वर्षाव व्होवो.

प्राणीमात्रांचा आधार, रोगनिवारक, आरोग्यदायक जगाला सुख प्रदान करणाऱ्या पाण्यामध्ये औषधी आणि अग्नी असतो.

हे औषधी गुणसंपन्न उदका! मला प्रदीर्घ आयुष्य प्रदान कर. हे उदका, माझ्याकडून हिंसा, दुष्कर्म, मिथ्या भाषण वगैरे प्रकारचे जे पाप घडले असेल त्या पापापासून आमचे रक्षण कर.

**अंत्येष्टिसूक्त** – या पांच सुक्तांमध्ये अंत्यसंस्काराच्या वेळी म्हणण्यात येणारे काही मंत्र दिले आहेत.

यम-अंत्येष्टिसूक्त, स्मशानसूक्त, अंत्येष्टिसूक्त इत्यादी.

**अक्षसूक्त** –

अक्ष म्हणजे फासे. द्युतामध्ये याचा उपयोग केला जातो. या फाशांमुळे काय काय होते याचा विस्तार या सूक्तांत आहे. एका पट खेळणाऱ्या द्युतासक्त माणसाचे हे उदगार आहेत.

“या नादामुळे माझ्या सुशील आणि गुणवती पत्नीलासुद्धा मी घरातून घालवून दिले.”

“अपयश आले तरी पुन्हा तो विजयाच्या आशेने प्राणपणाने खेळतच राहतो.”

“द्युतकाराची पत्नी नेहमी चिंतातूर आणि संतप्त राहते. त्याचा पुत्र उनाड बनतो. आपले घरदार विसरतो आणि मित्रांच्या घरी राहतो.”

द्यूतासक्तास सूर्याने केलेला वेदोक्त उपदेश खालील प्रमाणे आहे.

“हे द्युतासक्त पुरुषा, द्युत सोडून तू कृषिकर्म कर. या कृषी कर्माच्या योगे तुला पशुधन आणि अनुरूप पत्नीचा लाभ होईल.”

**वैश्वानर अग्निसूत्र** - न चावता पदार्थ भक्षण करणारा, ज्वाला समृद्ध आहे. तो वने भक्षण करतो. पृथ्वीवरील लता आणि वृक्ष क्षुधार्ध बालकाप्रमाणे भक्षण करतो. पृथ्वीवरील तृण त्याला अतिशय आवडते. अग्नी जंगलात ज्यावेळी प्रदीप्त होतो तेंव्हा तो वनस्पतींच्या साह्याने अधिक पुष्ट बनतो.

**यज्ञगौरव -**

यातली एक ऋचा आपल्या परिचयाची आहे. यज्ञ म्हणजे धर्माचे अधिष्ठान. त्याची पूजा केली जात असते. –

**यज्ञेन यज्ञमजयन्त देवाऽऽस्तानी धर्माणि प्रथमान्यासन् ।**

**ते ह नाकं महिमान: सचन्त यत्र पूर्वे साध्या: सन्ति देवा: ॥**

देवांनी संपन्न केलेल्या यज्ञामध्ये ज्या विराट पुरुषाचे पूजन केले त्यापासून गुणधर्माचा धारण-कर्ता-धर्म उत्पन्न झाला. ज्या स्वर्गामध्ये देवगण निवास करतात त्या श्रेष्ठ स्वर्गलोकामध्ये थोर लोकांना स्थान प्राप्त होते.

पृथ्वीपासून ऊर्ध्व गतीने जाणारे पाणी (पाण्याची वाफ) आणि पर्ज्यन्यरुपाने पृथ्वीवर येणारे पाणी सारखेच आहे. कारण ऊर्ध्वगती जल आकाशाची शोभा वाढवतो आणि पर्जन्य पृथ्वीला टवटवी आणतो. वर जाणारी पाण्याची वाफ शुद्ध असते. त्याचप्रमाणे मेघातून पृथ्वीवर येणारे पाणी पृथ्वीला स्पर्श करण्यापूर्वी अत्यंत शुद्ध असते. त्यामध्ये अन्य वायू वगैरे मिसळलेले नसतात. संस्कृतमध्ये ‘आप्’ या शब्दाने दर्शविले जाणारे जे पाणी ते तूच आहेस. या पाण्यापासून विविध प्रकारचे जल तयार होते.

**‘अद्भ्य: पृथ्वि:’** या आप संज्ञेस पात्र असलेल्या पाण्यापासून पृथ्वि निर्माण होते.

**औषधीसूक्त** – या सूत्रात एकूण १०७ औषधी वनस्पतींचा उल्लेख केला आहे. याचे पाच प्रकार वर्णिले आहेत. झाडाचे मूळ, साल, पान, फळ, फुल हे ते पाच प्रकार. पिंपळ, पळस, अश्वावती, सोमवती, ऊर्गवंती, उदोजस या वृक्षांचा उल्लेख आहे. या औषधी वनस्पतींमुळे शरीरातील सर्व रोगांचे मुळापासून उच्चाटन होते.

**पर्जन्यसूक्त** – जलवृष्टी करणाऱ्या, उदार अंत:करणाच्या, गर्जना करणाऱ्या आणि आपल्या जलाने वनस्पतीमध्ये औषधीरूपी गर्भाची स्थापना करणाऱ्या, स्वत:चा महाकाय धक्का देऊन जगाला भयभीत करणाऱ्या, वृक्षांना उन्मळून टाकणाऱ्या, दुर्जनसंहारक, प्राण्यांना संतोष देणाऱ्या आणि निर्जन प्रदेशावर आक्रमण करणाऱ्या पर्जन्यदेवा, तू अंतरिक्षातून पृथ्वीवर अवतीर्ण होतोस त्यावेळी वायू वाहू लागतो, वीज चमकू लागते, औषधी वाढू लागतात. मेघ आपल्या पखाली पृथ्वीवर ओतून मोकळया करतात आणि पृथ्वी नूतन रूप धारण करून प्रसन्न होते.

**भिक्षूसूक्त** - भुकेल्याला अन्न न देता जो स्वत:च ते भक्षण करतो तो आपद्ग्रस्त होतो. निर्धन आणि भुकेल्या माणसाला अन्न न देणारा निर्धन होय. अतिथीला अन्नदान करणाऱ्या दात्याचे शत्रू त्याचे मित्र बनतात. सेवकाला अन्नवंचित करणाऱ्या कृपणाचा त्याचे मित्र आणि आप्तसुद्धा त्याग करतात. धनसंपत्ती एकाच व्यक्तीजवळ कधीही राहत नाही. एकाच मातेच्या उदरी जन्म घेतलेले भाऊ, किंवा दोन हात कधीच सारखे नसतात. कोणी दानशील तर कोणी कृपण होतो. परंतु लहान धनिकाने दान करणे सोडू नये.

**रात्रिसूक्त** – या सूक्ताला सृष्टी निर्माण करणाऱ्या मायेचे गौरवसूक्त म्हणण्यात येते. रात्री या शब्दाचा अर्थ माया असाही केला जातो. मंद पावलांनी येणाऱ्या रात्रीने सर्वत्र अंध:कार पसरायला सुरुवात केली आहे. ती नक्षत्ररूपी अलंकारांनी नटली आहे. स्वर्गातील देवता आणि पृथ्वीवरील पाणी यांच्यावर या रात्रीने आपले साम्राज्य पसरविले आहे. परंतु काही काळाने हा अंध:कार नाहीसा होणार आहे.

अंध:काराचे राज्य लयाला जाऊ लागताच बहिण मानलेल्या उषेने पूर्वक्षितिजावर प्रकाशरूपी अलंकार धारण करून पदार्पण केले.

अंध:कार पसरू लागताच पक्षी ज्याप्रमाणे वृक्षाचा आश्रय करतात त्याप्रमाणे आम्ही झोपेचा आश्रय करून आनंदित होतो. रात्र येताच सर्व गाव नि:स्तब्ध झाले. पक्षी, मनुष्ये आणि पशु आपल्या कार्यापासून निवृत्त होऊन स्तब्ध झाले. हे निशादेवी कोल्हे, लांडगे, चोर आमच्याकडे न येवोत असे कर. आणि तू आमच्यासाठी कल्याणमयी हो.

**यक्ष्मघ्नसूक्त** – (क्षयरोग निवारण)

अज्ञात क्षयरोगाने ग्रासलेल्या रूग्णा मी यज्ञानुष्ठानाच्या साह्याने तुला मुक्त करतो. त्या योगे तुझ्या प्राणांचे रक्षण होईल.

**आसन्नमरणसूक्त** -

या सूक्तांच्या पठणाने आसन्नमरण असलेल्या माणसाला सुखाने मरण येते. त्याचे क्लेश सुसह्य होतात.

**संज्ञानसूक्त** – या सूक्तातील प्रार्थना समभाव वर्तनाचे एक उत्तम गमक आहे. राष्ट्रांतील एकरूपता साधणे आणि ती टिकवणे या दोन महत्वाच्या क्रियांना पूर्वीच्या द्रष्ट्या ऋषींनी सुद्धा मोठा मान दिला आहे.

हे लोकांनो, तुम्ही एक विचाराने, समान तत्व बोलणारे, सारख्या मनाचे आणि ज्याप्रमाणे एकबुद्धीवाले देवगण समान हवि ग्रहण करतात त्याप्रमाणे तुम्ही समान बुद्धीवंत होऊन धन ग्रहण करणारे व्हा.

हे लोकांनो, तुमची स्तोत्रे एकच अर्थ प्रकट करणारी असावीत, तुंम्ही एकमेकांच्या साह्याने एकत्र यावे, तुमची मने एकत्र यावीत आणि एकाच विचाराने तुम्ही यज्ञ संपन्न करावा.

हे लोकांनो, आमची प्रार्थना एक असू दे. आमची हृदये एकमेकांशी मिळोत, आमची मने आणि विचार एकच असोत आणि आम्ही सर्व प्रकारे एकत्रित संघटित होवो.

**अश्विनीकुमारसूक्त** – या सुक्तांची रचना वसिष्ठ ऋषींची आहे. अश्विनीकुमार ही आरोग्यदायक प्रात:स्मरणीय देवता आहे.

सौरसूक्ताच्या अखेरीस केलेली सूर्याची प्रार्थना –

सविता पश्चात्तात सविता पुरस्तात् ।

सवितोत्तारात्तात् सविताधरात्तात् ॥

सविता न: सुवतु सर्वतातिं ।

सविता नो रासातां दीर्घमायुः ॥

सविता आमच्या मागे, पुढे, वर आणि खाली अशा चारही बाजू धनसंपन्न करून आम्हास दीर्घायुष्य प्रदान करो.

**प्रस्थान सूक्त** : माणसाचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून –

**स्वस्ति पन्थामनु चरेम सुर्याचिन्द्रमसाविव ।**

**पुनर्ददताघ्नता जानता सं गमेमहि ॥**

सूर्य आणि चंद्र कोणत्याही अडचणीशिवाय भ्रमण करतात त्याचप्रमाणे आम्हा लोकांना सुद्धा दीर्घकाळ कराव्या लागणाऱ्या प्रवासात आमच्यावर प्रेम करणारे नातेवाईक आणि मित्र लाभून आमचा प्रवास सुखकारक व्होवो.

**उषासूक्त** – हीकालस्थिती असली तरी तिला देवता स्वरूप मानले आहे.

शुक्रोदयाबरोबर ब्राह्म मुहूर्ताला प्रारंभ होतो. त्यानंतर उषा, प्रभा किंवा प्रभात, अरुणोदय आणि सूर्योदय. ब्राह्ममुहूर्त साधारण पहाटे ३ ते ५ (५ घटका) त्यानंतर उषा (दीड घटका) ३६ मिनिटे नंतर प्रभा किंवा प्रभात २४ मिनिटे नन्तर अरुण सहा मिनिटे व शेवटी सूर्योदय.

हे उदार तेजस्विनी रथात बसून तू आमचेकडे ये. ती आलेली दिसताच प्रवासी मार्गस्थ होतात. पक्षी आकाशात उडू लागतात. मनुष्य कार्यास उद्युक्त होतो, प्राणीमात्र भक्ष्यशोधार्थ बाहेर पडतात.

**सूर्यसूक्त** – रोगोघ्नोपानिषद् म्हणून हे पन्नासावे सूर्यसूक्त प्रसिद्ध आहे. सर्वदर्शी सूर्योदय होताच नक्षत्रेलोप पावतात. सूर्य सर्व लोकांना प्रकाशित करतो. त्याच्यामुळे दिवसरात्र होतात. उदित होणाऱ्या सूर्याचे उंच ठिकाणाहून दर्शन घेतले असता हृद्रोग आणि शरीर निस्तेज करणारा पंडुरोग नाश पावतो. वृक्षांच्या ठिकाणी हरिद्रता निर्माण होते. खालील ऋचा रोगनाशक प्रमुख मंत्र आहेत.

**उद्यन्नद्य मित्रमह आरोहन्नुत्तरां दिवम् ।**
**हृद्रोगं मम सूर्य हरिमाणं च नाशय ॥**
**शुकेषु मी हरिमाणं रोपणाकासु दध्मसि ।**
**अथो हरिद्रवेषु मी हरिमाणं नि दध्मसि ॥**

ऋग्वेदांचा काळ लक्षात घेऊन ऋग्वेद वाचले पाहिजेत. चार ते पाच हजार वर्षांपुर्वीचे ते जीवन आणि त्या संदर्भातले त्याकाळच्या लोकांचे विचार समजून घेतले पाहिजेत.

सामाजिक जीवन आशावादी व ऐहिक वैभवाची आकांक्षा बाळगून स्थिरावत होते, असा हा काळ होय. जीवनाचे तत्त्वज्ञान ऐहिक जीवनाला प्राधान्य देणारे होते. ऐहिक जीवनाबद्दल उद्वेग, वनिवृत्तिमार्गाबद्दल पूज्यभाव, ऋग्वेदकालीन समाजात नसला, तरी भारतातील वेदपूर्वसंस्कृतीतील समाजात तो होता, असे दिसते.

संदर्भ :स.कृ. देवधर

## यजुर्वेद –

यजुर्वेद हे दुसरे वेद. अध्वर्यु, होता, उद्‌गाता व ब्रह्मा या चार प्रमुख ऋत्विजांपैकी अध्वर्यु नावाचा ऋत्विज यज्ञतंत्रासाठी ज्या वेदातील मंत्रांचा उपयोगात करतो, त्या वेदास यजुर्वेद म्हणतात. यासाठीच यजुर्वेदास अध्वर्युवेद अशीही संज्ञा आहे. यज्ञप्रक्रिया आणि यज्ञानुष्ठानातील क्रम लक्षात घेऊनच या वेदाचे संकलन केले असल्याने या वेदाच्या संहितांना 'याज्ञिकी संहिता' असेही म्हणतात.

यजुर्वेदाचे 'कृष्ण यजुर्वेद'आणि 'शुक्ल यजुर्वेद'असे दोन भेद आहेत.

'कृष्ण' आणि 'शुक्ल' अशा यजुर्वेदाच्या विभागणीसाठी पुराणात पुढीलप्रमाणे आख्यायिका आढळते : यजुःसंहितेचा पहिला पाठक वैशंपायन होता. त्याच्या ब्रह्महत्येच्या पातकाचे निरसन करण्यासाठी त्याच्या शिष्यांनी व्रताचरण करण्यास सुरुवात केली.

या प्रसंगी ‘हे दुबळे शिष्य कसले व्रताचरण करतील, मीच आपणासाठी व्रताचरण करतो’, असे वैशंपायनाचे एक शिष्य याज्ञवल्क्य म्हणाले. हे ऐकून वैशंपायनांनी, आपल्या शिष्यांचा अवमान करणाऱ्या याज्ञवल्क्यास, ‘माझ्याकडून शिकलेले वेद परत दे’ असे सांगितले. याज्ञवल्क्यांनीही गुरूच्या सांगण्याप्रमाणे शिकलेली यजुःसंहिता तत्काळ ओकून टाकिली. ते ओकलेले वेद, ऋषींनी तित्तिरिपक्ष्यांचे रूप घेऊन स्वीकारले. तित्तिरींनी स्वीकारलेल्या यजुर्वेदास ‘तैत्तिरीय’ अशी संज्ञा मिळाली.

धर्माधिकारी, त्रि. ना. (विश्वकोश)

(वरील कथेचे पटणारे विवेचन विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर यांच्या ‘भारतीय आचार्य’ या ग्रंथात पुढील प्रमाणे दिले आहे

“याज्ञवल्क्याला वाईट वाटले. तो उत्तरला “मी तर केवळ आपल्या विषयी असलेल्या भक्तीपोटीच असे बोललो होतो. पण आता आपण मला शिकवलेली सर्व विद्या आपल्याला परत करतो.”

असे म्हणून सर्व विद्या गुरूला परत करून – म्हणजे त्या विद्येचा अन्यत्र कुठेही उपयोग होणार नाही असे अभिवचन देऊन - याज्ञवल्क्य आश्रमातून निघून गेला. अन्य शिष्यांनी व्रताचरण करून गुरूला ब्रह्महत्येचा पापातून मुक्त केले.

याज्ञवल्क्याने सूर्यनारायणाची तपश्चर्या केली आणि सूर्य प्रसन्न होऊन प्रकट झाल्यावर याज्ञवल्क्य म्हणाला; “माझ्या गुरुजींना अज्ञात असलेल्या यजुर्वेदाचा बोध आणि उपदेश मला करा.”

प्रसन्न झालेल्या सूर्याने वैशंपायनाला अज्ञात असलेल्या ‘आयातयाम’ नामक यजु:श्रुतींचा उपदेश याज्ञवल्क्याला केला. त्यालाच वाजी म्हणतात. “वाजिन” म्हणजे सूर्य होय. सूर्याप्रमाणे तेजस्वी असलेला

उपदेश याज्ञवल्क्याने आपल्या शिष्यांना शिकविला. तोच शुक्ल यजुर्वेद या नावाने प्रख्यात झाला आणि वैश्यंपायनाचा कृष्ण यजुर्वेद म्हणून ज्ञात झाला.)

सद्‌गुण धारण करण्यासाठी दुर्गुणांना त्यागावे लागते. म्हणून ऋषी म्हणतात “द्वेष आणि कुटीलतेचा आमच्याकडून त्याग घडो.” हे ईश्वरा आमच्या पापांना जाळून टाक.” “ आमची मानसिक; शारीरिक आणि वाचिक पापे ईश्वर नष्ट करो.” “देवद्रोही, अशुभ, कृपण, अशा जनांपासून आम्ही सदैव दूर असावे” “देवगणांनी आम्हाला पाप आणि कुकर्म यापासून वाचवावे. दुर्गुण नष्ट होऊ देत आणि सद्‌गुण वाढू देत. व्यवहारात गोड बोलण्याने मित्र जोडले जातात आणि सद्भावही प्रस्थापित होतो. माणसाला मधुर वचन बोलण्यासाठीच ईश्वराने पाठवले आहे असे हा वेद म्हणतो.

परमात्म्याने आपली वाणी मधुर करावी आणि त्या वाणीला ईश्वर भक्तीचा स्पर्श असावा हेच ऋषींचे मागणे आहे. आपण आतिथ्यशील असावे, सत् चारित्र्य संपन्न असावे, ज्ञानी व्हावे, मनात सद्भाव निर्माण व्हावा, मन प्रसन्न असावे, हृदयात आस्तिकता असावी, दुसऱ्याच्या धनाची लालसा अंत:करणात निर्माण होऊ नये, सत्कर्मे प्राप्त व्हावीत, निष्ठेने यज्ञ करून त्याचे फळ भोगावे, निर्भयता यावी, अज्ञान आणि कुमती नष्ट व्हावी, ऐश्वर्यासाठी जागृती लाभावी, सुबुद्धी मिळावी, इंद्राने आपल्याला पवित्र करावे, निखळ यश प्राप्त व्हावे, दान करण्याची प्रेरणा आपल्याला लाभावी, व्रताचे पालन नित्य करावे, आपण श्रद्धावान असावे असे सदाचाराला धारण करणारे अनेक सद्गुण ऋषी ईश्वराकडे मागतात."

विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर

**'पाणी'** या शब्दाला संस्कृत मध्ये अप्, जल, नीर, उदक असे सात वेगवेगळे शब्द आहेत. आपण मराठीत हे शब्द पाण्याचे पर्यायी शब्द म्हणून वापरतो. पण यजुर्वेदात (हे वेद ३ ते ४ हजार वर्षांपूर्वी रचले गेले आहेत) या शब्दांचे वेगवेगळे अर्थ दिले आहेत.

१) **आप** – म्हणजे मेघातून सुटल्यापासून पृथ्वीवर पडायच्या १५० हात उंचीवर असणारे पाणी असे म्हणतात. या पाण्यात कोणतेही वायू, क्षार मिसळलेले नसतात. ते पाणी शुद्ध असते.

२) **जल** – ज = जन्म घेणे, ल = पालन पोषण करणे, जगवणे. हे पाणी झाडे आणि मानव यांच्या पोषणाला मदत करतात.

३) **नीर** – दुसऱ्या पदार्थांत एकरूप होऊन त्या पदार्थाचे गुण वाढविणारे अगर कमी करणारे पाणी असे म्हणतात. उदाहरणार्थ दुधातील पाणी, फ़ळांच्या रसातील पाणी.

४) **उदक** – एखाद्या वस्तूला स्पर्श करून त्या वस्तूचे तेज वाढवणारे पाणी. या तेजोमय पाण्याने देव, पितर अगर पुण्य-पुरुष यांना अर्घ्यपाद्य स्नान अर्पण करतात. शिंपडले जाणारे किंवा पाण्याच्या पातळीपासून उंच नेले जाणारे पाणी.

५) **वारि** – दोष दूर करणारे पाणी. मंत्रवलेले पाणी.

६) **तोय** – केवळ तहान नाहीशी करणारे पाणी. प्यायचे पाणी.

७) **सलिल** – नदी नाल्याच्या रुपाने प्रवाहित होणारे पाणी. वाहते पाणी.

स.कृ. देवधर (यजुर्वेद)

मी झोपल्यावर माझे मन नाहीसे झाल्यासारखे वाटले. परंतु मी जागा झालो तेंव्हा माझे मन माझ्यामध्येच असल्याचे मला जाणवले. स्वप्नामध्ये माझे जीवन संपुष्टात आल्यासारखे वाटले. परंतु मी

जागृतीत येताच माझे आयुष्य मला पुन्हा प्राप्त झाले. मला प्राणशक्ती प्राप्त झाली, मला पाहता येऊ लागले, ऐकता येऊ लागले, ह्या सर्व शक्ती मला प्राप्त झाल्या. अग्नी आमच्या शरीराचा पालनकर्ता आहे, आमच्यावर उपकार करणारा आहे. हे अग्ने, सर्व निंद्य कर्मापासून आमचे रक्षण कर.

वृक्षारोपण करताना ते मंत्रपूर्वक करावे. अशा प्रकारे वृक्षारोपण केल्यास तो वृक्ष दीर्घजीवी आणि फलसमृद्ध होतो.त्या निमित्ताने या ऋचेचे पठण करतात. ही ऋचा उच्चारून वृक्ष लावण्यासाठी केलेल्या खळग्यात पाणी प्रोक्षण करतात. झाडाच्या मुळांवर आणि अग्रावर देखील याच मंत्राने पाणी शिंपडतात आणि हा मंत्र म्हणत म्हणतच वृक्षारोपण करून त्यास पाणी घालतात.

“हे अध्वर्यू, सर्व प्राणीमात्रांना आरोग्य आणि तेज प्राप्त व्हावे म्हणून पृथ्वीवर खणलेल्या या खड्यात हे पाणी तू ओत आणि त्यामध्ये निरोगिता प्रदान करणाऱ्या औषधीयुक्त आणि फलसमृद्ध होणाऱ्या वनस्पतीची स्थापना कर.

“आमच्या राष्ट्रामध्ये समृद्धी नांदण्यासाठी, हे ब्रह्मदेवा, गुणवान लोकांची निर्मिती कर. त्यामध्ये अध्ययनशील आणि ब्रह्मतेजसंपन्न ब्राह्मण, अचूक शरसंधान करणारा क्षत्रिय, शत्रूच्या सैन्याचा आणि हजारो रथांचा धुव्वा करणारा महारथी, क्षत्रिय, दुभती गाय, भारवाहक वृषभ, जलद धावणारा अश्व, सर्वगुणसंपन्न स्त्री, यांना उत्पन्न कर. त्याचप्रमाणे यजमानाला, जयवान, रथस्वामी, सभापंडीत, आणि तरुण पुत्र लाभो. आमच्या राष्ट्रात वेळेवर पाऊस पडो, फलवृक्ष फलसमृद्ध बनोत. शेते विविध पिकांनी समृद्ध व्होवोत. राष्ट्रातील प्रत्येकाला न प्राप्त झालेली वस्तू प्राप्त व्होवो आणि प्राप्त झालेल्या वस्तूचा त्याला उपभोग घेता येवो.

“यजमानांचे कल्याण करणाऱ्या देवतांनो, आम्हाला कानांनी चांगले ऐकावयास मिळो. डोळयांनी चांगले पाहावयास मिळो, निरोगी अवयवयुक्त होऊन तुमची स्तुती करावयास मिळो आणि आम्हाला देवांनी दिलेले शंभर वर्षांचे आयुष्य उपभोगता येवो.

“या अखिल विश्वामध्ये स्थावर आणि जंगम अशा ज्या वस्तू आहेत त्या सर्व वस्तू ईश्वराने आपल्या सत्तेने व्यापून टाकल्या आहेत. सर्व वस्तूंचा त्या वस्तूतील ज्याचा जो वाटा आहे तो त्याला देऊन उर्वरित भागाचा उत्तम प्रकारे उपभोग घे. अन्याच्या स्वाधीन असलेल्या धनाची तू इच्छा धरू नकोस.

“प्रत्येक मनुष्याने आपल्या वाट्याला जे कर्म आले आहे तेच करावे आणि ते कर्म करीत करीत शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी. या प्रमाणे कर्म करीत राहिल्यास त्या कर्मापासून निर्माण होणारी बंधने (पाप अगर पुण्य) माणसाला बद्ध करू शकत नाहीत.

“केवळ प्राणोपजीवी लोक ज्या ठिकाणी वास्तव्य करतात त्या प्रदेशांना असूर्य नावाचा प्रदेश असे संबोधिले जाते. हा सर्व लोक प्रगाढ अंध:काराने व्यापलेला आहे. स्वत: ज्ञान संपादन न करणे हा आत्मघात आहे. जे कोणी असे आत्मघातकी असतील ते मरणोत्तर या अंध:कारमय प्रदेशात येऊन पोचतात.

“परब्रह्म म्हणून ज्याला संबोधतात ते परब्रह्म अचल, अद्वितीय मनापेक्षा देखील अधिक गतिमान, सुर्याच्याही पूर्वी अस्तित्वात असणारे आणि अविनाशी आहे. या ब्रह्मरुपाला देवसुद्धा जाऊन पोहोचत नाहीत, ते त्या ब्रह्माला जाणण्याच्या बाबतीत असमर्थ आहेत. ते अचल आहे असे वाटले तरी सर्व वेगवान वस्तुंना ते मागे टाकते आणि पुढे धावत जाते या परब्रह्माच्या आधारानेच वायुरूपी अत्यंत चेतन शक्ती, या जड पृथ्वीचे मूळस्थान (उत्पत्तिस्थान) असलेल्या उदकाला धारण करते.

“केवळ स्वत:च्या पुरतीच म्हणजे वैयक्तिक कर्माची जे उपासना करतात ते अंध:काराच्या मार्गाचा अवलंब करतात. आणि प्रगाढ अज्ञानमय अंध:कारात प्रवेश करतात. आणि जे स्व कर्तव्यापासून बाजूला जातात आणि केवळ आत्मज्ञानातच गढून गेलेले असतात ते त्यापेक्षा देखील अत्यंत प्रगाढ अंध:कारात जाऊन पडतात.

“प्राणरूपी वायू अविनाशी अर्थात अमर आहे. परंतु हे शरीर मात्र अखेर भस्मसात होणारे आहे. कारण ते नाशिवंत आहे. ब्रह्माचे प्रतिक समजल्या जाणाऱ्या ॐची उपासना कर. संकल्पात्मक अग्ने, पूर्वी ब्रह्मचर्य आणि गृहस्थ ह्या आश्रमात मी तुझी उपासना केली ते तू लक्षात आण. त्याचप्रमाणे लहानपणापासून आत्तापर्यंत तुझ्यासाठी जे कर्म केले त्याचेही तू स्मरण ठेव.

विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर

## सामवेद

सामवेदातील बहुतेक सर्व ऋचा ऋग्वेदातील आहेत. ऋचा म्हणजे पद्यात्मक मंत्र. हे पद्य म्हणजे छंदोबद्ध वाक्यरचना. नंतरच्या काळात यास श्लोक असेही म्हणू लागले. ऋचांचा समुदाय म्हणजे सूक्त. सूक्ते साधारण १०-१२ ऋचा असलेली असतात.

सूक्त रचना ही देवांची देणगी आहे असाही उल्लेख आढळतो.

सामवेदात मुख्यत्वे अग्नि, इंद्र, सूर्य, ईश्वर यांच्या प्रार्थना आहेत. शिवाय सोम म्हणजेच सोमरसा विषयी बरीच माहिती आहे.

हा तिसऱ्या क्रमांकाचा वेद आहे. यात साधारण १५०० ऋचा आहेत.

याचे एक वैशिष्ट्य म्हणजे ह्या ऋचा गाऊन म्हटल्या जातात. यालाच सामगायन म्हणतात.

यज्ञाच्यावेळी हे सामगायन केले जात असे.

सा रे ग म प ध नि या सप्त सुरांचा उगम सामवेदात आहे. ती ऋचा अशी =

य: सामगानां प्रथम: स वेणोर्मध्यम: स्वर: ।

यो  द्वितीय: स गान्धार: तीतृयरस्त्वृषभ: (रे) स्मृत: ॥१॥

चतुर्थ: षड्ज (सा) इत्याहु: पन्चमो धैवतो भवेत् ।

षष्ठो निषादो विज्ञेय: सप्तम: पंचम: स्मृत: ॥२॥

१) मध्यम – म

२) गान्धार – ग

३) ऋषभ – रे

४) षड्ज – सा

५) धैवत – ध

६) निषाद – नि

७) पंचम – प

यात “म ग रे सा ध नी प” हा क्रम आहे. पुढे तो हल्लीच्या प्रमाणे

“सा रे ग म प ध नि” असा झाला असणार.

यज्ञाच्यावेळी हे सामगायन केले जात असे.

## अग्नी –

ऋग्वेदातील पहिली ऋचा अग्नीच्या प्रार्थनेने सुरु झालेली आहे. सामवेदाची सुरुवात सुद्धा अग्निसुक्ताने झाली आहे. अग्नीची प्रार्थना. स्तवन (स्तुती) करण्यामागचे एक मुख्य कारण म्हणजे यज्ञकुंडात प्रथम अग्नीच पेटवला जातो (प्रज्ज्वलित केला जातो). अग्नीमुळे देवता तेथे येतात. त्यांना येण्याचे आवाहन केले जाते अशी समजूत होती.

आमच्या अज्ञानरूपी अंधकाराचा तू नाश कर. तुझे रूप अत्यंत दीप्तीमान आहे. वायुच्या मित्रात्वामुळे प्रदीप्त होतोस.

सोम प्राशन करण्यासाठी तुला पुन:पुन्हा आवाहन केले जात आहे. देवतांच्या या यज्ञामध्ये तू त्वरेने ये.

'अग्नि' ची नावे अशी दिली आहेत.

१) **सुसमिद्ध** – समिधांच्या सहाय्याने प्रज्वलित होणारा.

२) **तनूनपात** – दोन अरणींच्या (लाकूड) गर्भात राहणारा. काष्ठ घर्षण करून तयार केलेला.

३) **नराशंस्** – दोन अरणींच्या साह्याने निर्माण झालेला. (काष्ठमंथन)

४) **इलाग्नि किंवा इडाग्नि** – अग्नीची यज्ञामध्ये स्तुती-स्तोत्रे गात असताना प्रदीप्त होणारा.

अग्नी विषयी सांगितले आहे –

१) अन्नाची वृद्धी (वाढ) करणारा, सर्व ठिकाणचे दोष नाहीसे करणारा (म्हणूनच अग्नीला पावक असेही म्हणतात),

२) दीप्तीमान (तेजाने तळपणारा),

३) यज्ञामध्ये प्रगट होणारा, उंच जागी राहून आमचे रक्षण करणारा, महान शक्ती देणारा,

४) धनधान करण्याची प्रेरणा देणारा

५) उत्तम निवासस्थान देणारा

६) विविध प्रकारे सेवा करणारा पुत्र देणारा

७) आपल्या प्रचंड तेजाने राक्षसांचे बल, आणि वीर्य यांचा नाश करणारा

८) वायुच्या साह्याने कंपित होणारा

९) प्रत्येक वस्तूचे भस्म करण्याचे सामर्थ्य असलेला

## इंद्र -

अग्नी नंतर दुसरी देवता म्हणजे इंद्र. इंद्राची स्तुती पुढीलप्रमाणे केली आहे.

पृथ्वी, स्वर्ग आणि सूर्य निर्माण करणारा इंद्र.

पृथ्वी, अंतरीक्ष आणि स्वर्ग लोकात राहणारा इंद्र हा महापराक्रमी असून तो पृथ्वीवरील लोकांची संकटे दूर करतो.

गाई आणि वृषभ समान जातीचे असल्याने आप्ताप्रमाणे आहेत.

जो लोभी मनुष्य दुसऱ्यांना काहीही न देता स्वत:च उपभोग घेतो त्यांना देवता स्वत: काहीही देत नाहीत तर त्यांचे वैभव स्वत: नाहीसे करतात.

हे इंद्रा, काळा, तांबडा किंवा विचित्र रंग असलेल्या गाईंचे दूध मात्र चमकदार शुभ्र ठेवण्याचे सामर्थ्य केवळ तुझे आहे.

दिवस आणि रात्र या दोन अवस्थांची तू निर्मिती करतोस.

इंद्रा, तुला जन्म देणारी अदिती माता.

हा इंद्र आम्ही केलीली त्याही स्तुती श्रवण करतो आणि त्याची उपासना न करणाऱ्यास एखाद्या क्षुद्र वस्तूप्रमाणे बाजूस टाकून देतो.

हे इंद्रा, धनाने उन्मत्त झालेल्या पणींवर तू लत्ता प्रहर कर.

हे इंद्रा, प्रकाशासाठी तू सुर्याला उत्पन्न केलेस.

## सूर्य -

इंद्राप्रमानेच सुर्याचीही स्तुती सामवेदात आहे. ती अशी =

हा अग्नी ज्या वेळी सुर्यरुपाने स्वर्गलोकात प्रकाशित होतो त्यावेळी जीवनगती प्राप्त झालेले जीव या सूर्यतेजाचा आश्रय करून त्याचे दर्शन घेतात.

हे सवितृ देवा तू या यज्ञ कर्माच्या दिवशी आम्हाला पुत्र-पौत्रांचे ऐश्वर्य प्रदान कर.

गाईच्या दुधापासून निर्माण होणाऱ्या धृताने अग्नी संपन्न होतो.

अश्विनिरूपी सात रथकन्या, हे सूर्या, तू आपल्या रथास जोडतोस त्यामुळे तुझा रथ आपोआप गतिमान होतो.

सूर्य – हरित वर्णाचे सात अश्व जोडलेला रथ तुला वाहून नेतो.

सदाचार संपन्न मित्रावरुणांनो तुम्ही आमची निवासस्थाने आणि गाईचे गोठे समृद्ध करा आणि मधुर रसांनी संपन्न अशी अन्ने आम्हाला प्रदान करा.

आम्हाला पुष्कळ काल पर्यंत सूर्य दर्शन घडेल असे दीर्घायुष्य प्रदान करून आमचे कल्याण कर.

आदित्य सूर्य – सूर्योदयानंतर आमच्या सर्व कामना पूर्ण करोत.

## सोमरस -

सोमरसाचे महत्व –

तो कसा तयार होत असे? –

सोमवल्ली कुटून तयार केलेला,

गाईचे ताजे दुध मिसळलेला,

दही आणि दुध मिसळून संपन्न केलेला,

तूप मिसळलेला,

विशिष्ट तऱ्हेचा स्वाद असलेला,

अतिशय रुचिर असलेला,

पवित्र कलशामध्ये प्रस्थापित केलेला (ठेवलेला),

पर्वतामध्ये उत्पन्न होणारा,

हिरवट रंगाचा,

थेंबाथेंबांनी एकत्रित होणारा,

दोन पाषाणांच्या सहाय्याने कुटून तयार केलेला,

कर्मकुशल अश्या हाताच्या दहाही बोटांनी संस्कारित (तयार) केलेला,

ग्रावन (नामक) दगडांच्या साह्याने रस काढताना नाद करणारा,

लोकरीच्या वस्त्रातून गाळलेला,

मधुर स्वादयुक्त,

मधूस्त्रावक नावाच्या सोमपात्रामध्ये साठविलेला,

परम स्वादिष्ट.

सोमरसाने काय साध्य होते?

सोमरस यज्ञकुंडात टाकत असत (त्यालाच ‘हवि’ देणे असे म्हणतात). त्यामुळे इंद्र देवता संतुष्ट होऊन यजमानाचे (जो यज्ञ करतो त्याचे) भले होत असे. त्याची माहिती इतरत्र दिली आहे. सोमरस स्वत:ही पीत असत. (त्यालाच प्राशन करणे असे म्हणतात) त्यामुळे काय होत असे ते पुढे दिले आहे =

आनंद निर्माण करणारा, आनंद वाढवणारा

सर्वांच्या इच्छा (कामना) पूर्ण करणारा

सर्वांना आवडणारा, मित्राप्रमाणे आदरणीय

सामर्थ्य देणारा

सुखकारक, सुखवर्धक

संपत्ती प्राप्त करून देणारा

प्राणीमात्रांचे रक्षण करणारा

ज्ञान प्राप्त करून देणारा

यज्ञ शत्रूंचा नाश करणारा

भक्तांना शुद्ध बुद्धी देणारा

नास्तीकांचा नाश करणारा

माणसाला देवता पूजनाची स्फूर्ती देणारा

सेनेला स्फूर्ती देणारा

अत्यंत पथ्यकर

संसारी जीवांना तृप्त करणारा

पुत्र-संतती आणि यश देणारा

मदकारक

सुखप्रद अन्न देणारा

या सोमाला द्रोणकलशामध्ये प्रस्थापित करण्यात येत आहे.

गाईच्यासाठी जे गवत असते त्यामध्ये दुग्ध ज्याप्रमाणे भरून राहिलेले असते त्याप्रमाणे सोमामध्ये उत्तम बुद्धी गुप्तरुपाने स्थिर असते.

हे स्तोत्यांनो, किंचित पिवळसर आणि आरक्त वर्णाच्या बलसंपन्न आणि स्वर्गामध्ये देखील गौरविला गेलेल्या सोमाचे तुम्ही स्तवन करा.

हे ऋत्विजांनो, ग्रावन दगडाच्या साह्याने उत्पन्न केलेल्या आणि लोकरीच्या वस्त्रावरून गाळलेल्या या सोमामध्ये तुम्ही मधुर असे गाईचे दुध मिसळा.

सागर ही सोमाची जननी असून ऋत्विज्यांच्या दहा बोटांनी सोमरस तयार केला जातो. हा सोम सुर्याला झाकून टाकतो.

देव ज्याची सतत इच्छ्या करतात असा सोम.

पवमान नामक देवतेच्या ऋषींनी सांगितलेल्या या ऋचांचे अध्ययन करणाऱ्या भक्ताला हा शुद्ध असा सोमरस नेहमी प्राप्त होवो.

पावसाचे पाणी पृथ्वीवर पडते आणि ते नदीच्या रुपाने समुद्रात जाऊन समुद्रात असलेल्या वडवानल नावाच्या अग्नीला तृप्त करते.

पर्वतावर पडलेल्या या पाण्यामुळे नद्या आणि नद्यांचे तट निर्माण झाले आहेत.

**अग्नी** स्वत:बद्दल म्हणतो – मी जन्मत:च सर्वज्ञ आहे. तूप (धृत) हे माझे नेत्र असून माझ्या मुखामध्ये नेहमी अमृत स्त्रवत असते. विश्वाला जगण्यासाठी आवश्यक असणारा प्राण हे माझे स्वरूप आहे.

मी तीन रुपानी प्रसिद्ध आहे. मी अंतरिक्षाचा स्वामी असून आदित्य हे माझेच स्वरूप आहे. हव्य वाहक म्हणून माझे सार्थ नाव असून मी सर्वज्ञ आहे.

**भद्रं कर्णेभि: श्रुणुयाम देवा पश्येमाक्षभिर्यजत्रा: ।**

**स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर् व्यशेम देवहितज् यदायु: ॥**

हे यज्ञार्ह विश्वेदेवांनो, आम्ही केलेल्या स्तुतीमुळे तुम्ही आमच्यावर प्रसन्न व्हा आणि आमच्या कानी केवळ चांगल्या सुखमय गोष्टीच येतील असे करा. तसेच आमच्या नेत्रांना प्रत्येक वस्तुमधील चांगलेच दिसो. देवांनी आम्हास प्रदान केलेले आयुष्य अत्यंत सुदृढ आणि निरोगी शरीराने आणि निरोगी अवयवांनी उपभोगण्याचा आशीर्वाद प्रदान करा.

स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवा: स्वस्ति न: पूषा विश्ववेदा: ।

स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमि: स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥

हे विश्वदेवांनो, मानवी आयुष्याची मर्यादा केवळ शतवर्षांची आहे. या मर्यादेच्या अखेरच्या अवस्थेत माणसांना म्हातारपण प्राप्त होते. पुत्र पित्याप्रमाणे होतात. (पुत्रांना पुत्र झाल्याने ते पिता या पदवीवर आरूढ होतात) आम्ही सर्व तुमची प्रार्थना करतो की आमचे आयुष्य मध्येच खंडीत होऊ देऊ नका.

**सामवेद ऋचा** –

**तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।**

**धियो यो न: प्रचोदयात् ॥**

प्रसिद्ध गायत्री मंत्र 'जो आमच्या बुद्धीला प्रेरणा देतो, त्या सवितृ देवाच्या (सूर्याच्या) पाप भर्जित तेजाचे आम्ही ध्यान करतो.

(ही ऋचा मूळ ऋग्वेदातील आहे.)

उषा आणि रात्र या दोन्ही भगिनी आहेत. परंतु स्वरूप मात्र परस्पर विरोधी आहे. या दोघी एक मताच्या, एकाच मार्गाने गमन करणाऱ्या परंतु एकमेकींच्या पाठोपाठ जाणाऱ्या आणि एकमेकीला कोणताही अडथळा न निर्माण करणाऱ्या आहेत. एकमेकींसाठी त्या कधी वाट पाहात थांबत नाहीत.

अश्विनीकुमारांच्या तीन चाकांच्या, तीन देवतांनी बसण्यास योग्य, ऐश्वर्याने भरलेला, अत्यंत वेगाने जाणाऱ्या अश्वांनी सज्ज केलेला, मधुर पदार्थांचे वहन करणारा रथ यज्ञ स्थानी येवो. आणि आमच्या परिवारातील सर्व मनुष्ये आणि प्राणीमात्र यांचे परिवहन करो.

स.कृ. देवधर (सामवेद)

# अथर्ववेद

चारवेदांपैकी एक. या वेदात विविध प्रकारचे अभिचारमंत्र (जारणमारणमंत्र) आणि इतर जादूचेमंत्र मोठ्या प्रमाणावर संगृहीत केले आहेत.

अथर्वन् आणि अंगिरस् असे जादूच्या मंत्रांचे दोन वेगवेगळे प्रकारही आहेत.

अथर्वन म्हणजे मनुष्यजातीस उपकारक ठरणाऱ्या पवित्र जादूचेमंत्र. उदा.,अथर्ववेदातील विविध रोगनिवारक मंत्र.

अंगिरस म्हणजे शत्रुत्वापोटी एखाद्याला त्रास देण्यासाठी उपयोगी पडणारे अभिचारमंत्र अथवा काळीजादू.

अथर्ववेदांत यमुना आणि वारणावती या नद्यांचे उल्लेख येतात. बंगालमधील दलदलीच्या प्रदेशात वावरणारा वाघ अथर्ववेदात प्रथमच दिसतो. आर्य आणि दस्यू यांच्यामधील भेदभाव तीव्रतर झाल्याचे आढळते. ब्राह्मणांचे महत्त्व वाढल्याचा प्रत्यय येतो. चातुर्वर्ण्य स्थिरावलेले दिसतात. ऋग्वेदातील अग्नी, इंद्र इ. देवता येथेही दिसतात; परंतु राक्षसांचा नाश करणे एवढेच त्यांचे मुख्य कार्य झालेले दिसते. अथर्ववेदातील काही भाग ऋग्वेदाइतकाच जुना आहे.

अथर्ववेदातील विविध विषयस र्वसाधारणपणे दहा वर्गात विभागले जातात. हे वर्ग पुढीलप्रमाणे:

(१) भैषज्यकर्मे,

(२) आयुष्यकर्मे,

(३) अभिचारकर्मे वा कृत्याप्रतिहरणकर्मे,

(४) स्त्रीकर्मे,

(५) सांमनस्यकर्मे,

(६) राजकर्मे,

(७) ब्राह्मणमाहात्म्य,

(८) पौष्टिककर्मे,

(९) शांतिकर्मे आणि

(१०) विश्वोत्पती व अध्यात्म.

**भैषज्यकर्मे** : विविध रोगांच्या निर्मूलनासाठी वापरावयाचे मंत्र यात आहेत. ज्वर, अतिसार, मूत्ररोध, नेत्ररोग, वातपित्तकफादी दोष, हृद्रोग, कावीळ, कोड, यक्ष्मा, जलोदर इ. रोगांसाठी रचिलेल्या या मंत्रांत भारतीय आयुर्वेदाची प्रारंभीची अवस्था दिसते. जेष्ठीमध, दूर्वा, अपामार्ग (आघाडा), पिंपळी, रोहिणी इ. रोगनाशक आणि आरोग्यकारक वनस्पतींचे उल्लेख अथर्ववेदात येतात. रोगनाशक वनस्पतींची स्तुती काही मंत्रांत आहे. रोग हटविण्यासाठी ताइतांचा वापरही सुचविला आहे. अस्थिभंगावर आणि जखमांवर काही मंत्र आहेत.

त्यात अरुंधती, लाक्षा (लाख) आणि सिलाची यांचा उल्लेख येतो.

जंतू, राक्षस, गंधर्व, अप्सरा ही रोगांची कारणे म्हणून दाखविली जातात. जंतूंना मारून टाकण्यासाठी इंद्रासारख्या देवतेला आवाहन केले जाते.

**आयुष्यकर्मे**: आयुष्यमंत्र उपनयन, गोदान इ. गृह्यसंस्कारांच्या वेळी म्हटले जातात. मृत्यूच्या १०० किंवा १०१ प्रकारांपासून संरक्षण मिळण्यासाठी केलेल्या प्रार्थना येथे आढळतात. या सर्व मंत्रांत अग्नीचे महत्त्व प्रकर्षाने आढळते. अग्नी जिवंतपणाचे प्रतीक आहेच. जीवन संरक्षकता यांनाही येथे स्थान आहे. सोन्याचा ताईत, मेखला, शंखमणी यांचे उल्लेखआहेत.

**अभिचार किंवा कृत्याप्रतिहरणकर्मे** : शत्रू, राक्षस आणि कृत्या (चेटूक) यांचा प्रतिबंध करण्यासाठी हे मंत्र आहेत. अभिचार आणि यातुविद्या या मंत्रांतून दिसते. या मंत्रांच्या भाषेतूनही निष्ठुरपणा व्यक्त होतो. या मंत्रांना 'अंगिरस्' असे म्हटले जाते. या मंत्रांतील काहींचा संबंध इतर वर्गांतील विषयांशीही पोहोचतो. उदा., राक्षसांविरूद्ध असलेले मंत्र. भैषज्यसूक्तांतही राक्षसांविरूद्ध मंत्रयोजना आहेच. 'यातुधान' (राक्षस), 'किमीदिन्' (दुष्ट पिशाचांचा एक प्रकार) यांच्याविरुद्ध अग्नी आणि इंद्र यांना आवाहन केले आहे. राक्षसांविरुद्ध शिशाचा उपयोग सांगितला आहे. येथेही ताइतांचा उपयोग सांगितला आहेच. उदा., अश्वत्थ आणि खदिर यांसारख्या वृक्षांच्या लाकडापासून तयार केलेले ताईत. वज्र नावाच्या आयुधाचाही वापर दिसतो. शत्रूला मूत्रावरोधाची व्याधी व्हावी या दृष्टीने त्याच्या मूत्राशयावर परिणाम घडवून आणणारे मंत्र दिसतात.

**स्त्रीकर्मे:** या वर्गातील मंत्र मुख्यतः स्त्रीजीवनाशी निगडित झालेले आहेत. स्त्रीचे विवाहपूर्व आणि विवाहोत्तर जीवन हा त्यांचा एक महत्वाचा विषय आहे. कुमारिकेस वरप्राप्ती, नवदांपत्यासाठी आशीर्वचने, गर्भसंभव, गर्भवती स्त्रीचे व तिच्या गर्भाचे संरक्षण, पुत्रप्राप्ती, नवजात बालकाचे संरक्षण इत्यादींसाठी रचलेले मंत्र लक्षणीय आहेत. अथर्ववेदाच्या १४ व्या कांडातील विवाहमंत्र याच वर्गातले होत. स्त्रीपुरूषांचे प्रणयमंत्र हाही या वर्गातील सूक्तांचा एक प्रधानभाग आहे. या मंत्रांस 'वशीकरण मंत्र' असेही म्हणतात. इच्छित स्त्री अथवा पुरूष लाभावा म्हणून पुरूषाने अथवा स्त्रीने वापरावयाचे हे मंत्र आहेत. प्रेमात स्पर्धा करणाऱ्यांचा नाश करण्यासाठीही काही मंत्र दिले आहेत. या मंत्रांत दिसणारी असूया आणि चीड अत्यंत तीव्र आहे. मत्सरग्रस्तांच्या हृदयातील मत्सर नाहीसा व्हावा म्हणूनही काही मंत्र आहेत.

**सांमनस्यकर्मे** : कुटुंबात सलोखा नांदावा, व्यक्तिव्यक्तींमधील कलह नष्ट व्हावे, सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, सभाजय साधता यावाइ. हेतूंसाठी ही सूक्ते आहेत.

**राजकर्मे** : प्राचीन भारतात राजाला पुरोहिताची नेमणूक करणे आवश्यक असे. राजपुरोहितास राजाला हितकारक असे मंत्र ठाऊक असावे लागत. या वर्गात येणारे मंत्र अशा प्रकारचे आहेत : राज्यभिषेक, राजाची निवड, हद्दपार केलेल्या राजाचे पुनःस्थापन, शत्रूंवर वर्चस्व संपादन करणे, राजाला युद्धात जय मिळवून देणे, शत्रुसेना संमोहन, स्वीय सेनेचे उत्साहवर्धन, शत्रूच्या बाणांपासून करावयाचे संरक्षण असे अनेक विषय या मंत्रांतून येतात. वेदकालीन राजनीतीची काहीकल्पना त्यांतून येते.

**पोष्टिककर्मे**: समृद्धिप्राप्ती आणिसंकटमुक्ती या हेतूने केलेली काही मंत्ररचनाअथर्ववेदात आढळते. शेतकरी, पशुपाल, व्यापारी यांसारख्या व्यावसायिकांना आपापल्या व्यवसायांत उत्कर्ष मिळावा हे यातील काही मंत्रांचे प्रयोजन. जमीन नांगरणे, बी पेरणे इ. कृषिकर्मे करतानाम्हणण्यासाठी, शेतातील उंदरांचा आणि किड्यांचा नाश करण्यासाठी तसेच भरपूर पाऊसपडण्यासाठी केलेली मंत्ररचना या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

गाईबैलांचे संरक्षणव्हावे, त्यांची उपयुक्तता वाढावी, व्यापाऱ्यांचा प्रवास सुरक्षितपणे व्हावा, द्युतकर्मात जय मिळावा, अग्नीपासून होणारे धोके टळावेत, वास्तू सुरक्षित रहावी, गाईला वासराबद्दल प्रेम निर्माण व्हावे इ. गोष्टी साधण्यासाठी असलेले मंत्र आणि प्रार्थनाही याच वर्गात मोडतात.

**शांतिकर्मे**: यावर्गातील मंत्रांमागे दुःखनाश आणि पाप-परिमार्जन ही प्रेरणा आहे. दु:खस्वप्ने, अपशकुन, पापनक्षत्रावर झालेला जन्म, कपोत आणि घुबड यांसारख्या अशुभ पक्ष्यांचे दर्शन इत्यादीं मधून होणारी दुःखे टळावीत म्हणून शांतिकर्मे सांगितली आहेत. कळत-नकळत झालेल्या पापांसाठीही शांतिकर्मे आहेत. उदा., कर्जफेड (विशेषतः जुगारात झालेल्या कर्जाची फेड) न करणे, थोरल्या भावाच्या आधी विवाह करणे, धर्मकृत्यांत काही चूक होणे इ. पापे.

पापाला सहस्त्राक्ष (हजार नेत्रांचे) म्हटले असून पापी मनुष्य राक्षसाने झपाटलेला असतो अशीही कल्पना दिसते. अथर्ववेदाच्या चौथ्या कांडातील २३ ते २९ या मृगारसूक्तांचा अंतर्भावही याच वर्गात करता येईल. त्यांत दुःखनाशासाठी अग्नी, इंद्र, वायू आणि सविता, द्यावा-पृथिवी, मरूत, भव आणि शर्व, मित्र आणि वरूण या देवतांच्या प्रार्थना सांगितलेल्या आहेत.

**विश्वोत्पत्ती आणि अध्यात्म** : वेद म्हणून प्रतिष्ठा मिळावी म्हणूनही ही सूक्ते अथर्ववेदात अंतर्भूत केली गेली असावीत. ऋग्वेदादी संहिता आणि उपनिषदे यांतील तत्त्वचिंतनाहून मात्र या सूक्तांतील तत्त्वचिंतनाचे स्वरूप थोडे वेगळे आहे. प्रायः अंतिम सत्याचा पाठपुरावा करण्याची खरी तळमळ त्यांत दिसून येत नाही,

अथर्ववेदातील अभिचारमंत्रांच्या प्राधान्यामुळे त्यावेदास बराच काळ प्रतिष्ठा नव्हती.ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद यांचा उल्लेख 'त्रयी' अथवा 'त्रयी विद्या' असा करून त्यांच्या नंतर अथर्ववेदाचा वेगळा उल्लेख केल्याची उदाहरणे आढळतात.

कधीकधी तर त्याचा उल्लेखही टाळला गेल्याचे दिसते; परंतु अथर्ववेदातील निरनिराळे विषय पाहिले, तर त्यांत मानवी संबंध आणि भावभावना यांचा वैविध्यपूर्ण प्रत्यय येतो. वैदिक काळातील आर्यांच्या सर्वसामान्य जीवनाचे प्रतिबिंब त्यांत दिसते.

लोकसमजुती आणि लोकाचार यांचे दर्शन येथे होते.अथर्ववेदातून मिळणारी ही माहिती मानवशास्त्र आणि देवविषयक कल्पनांचा इतिहास यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाची आहे, असे अनेक विद्वानांचे मत आहे. गोपथ ब्राह्मणातील उल्लेखानुसार सर्पवेद, पिशाचवेद, असुरवेद, इतिहासवेद आणि पुराणवेद हे अथर्ववेदाचे पाच उपवेद मानले जातात.

जोशी, लक्ष्मणशास्त्री; कुलकर्णी, अ. र. (विश्वकोश)

या वेदातील विषय –

१) अध्यात्म २) ब्रह्मचर्य

३) गृहस्थधर्म ४) वानप्रस्थ

५) सन्यास ६) आयुर्वर्धन

७) भैष्यज (औषधी) ८) रोगनिवारण

९) कृमिनाशन १०) विषनाश

११) अरिष्टनाश १२) राज्य-शासन

१३) राष्ट्रसंवर्धन १४) संग्राम

| | |
|---|---|
| १५) शत्रुनाश | १६) मणिधारण |
| १७) पापनाश | १८) अन्न |
| १९) संपत्ती | २०) अधिदैवत |
| २१) यज्ञ | २२) काल |
| २३) पशु-संपत्ती | २४) व्यापार |

## विद्युत् – (वीज)

केवळ प्रकाश निर्माण करणाऱ्या विजेला (विद्युत),

कडकडाटासह प्रकाश देणाऱ्या विजेला (स्तनयित्नु),

मेघरूपी दगडावर आघात करणाऱ्या विजेला (तडित्) आमचा नमस्कार असो.

**पावमानम्** (पवित्रीकरण) –

देवता मला पवित्र करोत. मनुष्यकर्म आणि बुद्धी पवित्र करोत. अंतरिक्षात संचार करणारा वायू आणि गाळून तयार केलेला सोम, बललाभ, कर्मफललाभ आणि अहिंसक आचारासाठी मला पवित्र करोत. सवितृदेव सर्वांना प्रेरणा देणारा, या लोकी आणि परलोकी सुख प्रदान करणारा असल्याने तो आम्हास पावन करो.

अरिष्टक्षयनम् (अरिष्ट कमी करणे) – (कपोत – कबुतर हा पक्षी घुबडाप्रमाणेच अरिष्ट निर्माण करणारा आहे. हे अरिष्ट नष्ट व्हावे म्हणून हीप्रार्थना आहे)

हे देवतांनो, कबुतर पाप देवतेचा दूत असून आम्हाला दु:ख देत आहे. त्याचे निराकरण व्हावे म्हणून आम्ही तुझी पूजा करतो. आमचे द्विपाद आणि चतुष्पाद प्राणी सुखी व्होवोत.

यासाठी हे अग्ने, आमच्या आहुती तू स्वीकार कर. त्या कबुतरांचे पंखरूपी हत्यार आमची हत्या न करो. आम्हाला ताप न देवो. आमच्या गाई आणि अन्य पुरुषांना सुख लाभो.

देवता –

१) मरुत् – पर्वतांचे अधिपती.

२) अग्नी – सर्व लहान-थोर वनस्पतींचा अधिपती.

३) द्यौ आणि पृथ्वी – दातृत्ववान लोकांचे अधिपती.

४) वरूण – पाण्याचा अधिपती.

५) मित्रावरुणौ – पर्जन्यवृष्टीचे अधिपती.

६) सविता – सर्व निर्माण झालेल्या वस्तूंचा अधिपती.

७) सोम – लतादी औषधींचा अधिपती.

८) वायु – अंतरिक्षाचा अधिपती.

**९) सूर्य – नेत्रांचा अधिपती.**

**१०) चंद्र – नक्षत्रांचा अधिपती.**

**११) इंद्र – देवांचा अधिपती.**

**१२) मरुत्-पिता – पशूंचा अधिपती.**

**१३) मृत्यू – प्रजेचा अधिपती.**

**१४) यम – पितरांचा अधिपती**

**१५) मृत – फार लांबचे पितर.**

हे माझे रक्षण करोत.

**सुखम् (सुख)** –

**शं नो वातो वातु:।   शं नो तपतु सूर्य:।**

**अहानि शं भवतु न:।  शं रात्री प्रति धीयतम्।**

**शशुषा नो व्यच्छतु ॥**

वाहणारा वारा, तळपणारा सूर्य, दिवस, रात्र आणि उषा आमच्यासाठी कल्याणकारक होवो.

**ब्रह्मचर्य** – संयमी जीवन.

पश्येम शरद: शतम्।   जीवेम शरद: शतम् ।
बुद्ध्येम शरद: शतम् ।   रोहेम शरद: शतम् ।
पूषेम शरद: शतम् ।   भूवेम शरद: शतम् ।
भूयेम शरद: शतम् ।   भूयसी: शरद: शतात् ॥

हे सूर्या –

१) आम्ही तुझे शंभर वर्षेपर्यंत सतत दर्शन घ्यावे.

२) आम्ही शंभर वर्षे जिवंत राहावे.

३) आमची बुद्धी शंभर वर्षेपर्यंत कार्यक्षम राहो.

४) आम्ही शंभर वर्षे सतत वृद्धींगत होत राहो.

५) आम्ही शंभर वर्षेपर्यंत पुष्ट राहो.

६) आम्ही शंभर वर्षेपर्यंत पुत्रादिकांनी संपन्न राहो.

७) शंभर वर्षे आम्ही सर्व प्रकारच्या वस्तूंनी संपन्न राहो.

८) आम्ही शंभर वर्षेपर्यंत अखंड कीर्तीने महान होत राहो.

( या सर्व वचनांचा गोषवारा असा आहे कीहे सूर्या, तू आम्हाला नुसते शंभर वर्षांचे आयुष्य प्रदान करू नकोस. त्याचा उपयोग नाही. पण त्याचबरोबर माझी सर्व इंद्रिये, बुद्धी, आरोग्य, कीर्ती, पुत्रपौत्रादि वंश आणि पश्वादि परिवार सतत वृद्धींगत होत राहील असे कर. तरच त्या शंभर वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्याचा उपयोग आहे.)

(अथर्ववेद – स.कृ. देवधर)

**ब्राह्मणे**: ब्रह्म म्हणजे मंत्र वा यज्ञ. मंत्र व यज्ञ यांसंबंधी विवेचन करणारे गद्य वाङ्मय म्हणजे ब्राह्मणग्रंथ.

ब्राह्मणग्रंथ हे मुख्यतः यज्ञांचे विवेचन करणारे ग्रंथ आहेत. वेदांच्या मंत्रसंहितांमध्ये निरनिराळ्या देवतांना उद्देशून सांगितलेल्या मंत्रांचा विनियोग यज्ञकर्मांत कसा करावयाचा हे ब्राह्मणग्रंथांत सांगितलेले असते. हे सांगत असताना मंत्रांचा अर्थ त्या त्या कर्माला कसा जुळणारा आहे हे दाखवून दिले आहे.

ब्राह्मणग्रंथांचा काळ इ. स. पू. २००० असल्याचे अनेक संशोधकांनी सिद्ध केले आहे. या काळात ऋग्वेदकालीन आर्य संस्कृतीचे केंद्र प्राचीन भारताच्या मध्य देशात आले होते असे दिसते. या ठिकाणी असलेल्या कुरू, पांचाल, उशीनर इ. अनेक राज्यांचे उल्लेख ब्राह्मणग्रंथांत आढळतात. अश्वमेघासारख्या यज्ञांच्या संदर्भात अनेक राजे व पुरोहित यांची नावे ब्राह्मणग्रंथांत आली आहेत. विदेहाचा राजा जनक आणि याज्ञवल्क्य यांच्या संबंधीच्या अनेक कथा शतपथ ब्राह्मणात आल्या आहेत. ऐतरेय ब्राह्मणातील

राज्याभिषेकाच्या वर्णनात अनेक राज्यांचा उल्लेख आहे. गंगा, यमुना, सरस्वती या नद्यांबरोबरच सदानीरा, काम्पील, परिचक्रा इ. नगरांचाही निर्देश ब्राह्मणग्रंथात आहे. यावरून या ग्रंथांची रचना मध्य देशात झाली असावी, असे दिसून येते.

**ब्राह्मणांचे विषय**: ब्राह्मणग्रंथांत मुख्य विषय यज्ञ हा आहे. हे यज्ञ कोणते? किती प्रकारचे? कोणी करावे? केव्हा करावे? इ. अनेक विषयांची माहिती ब्राह्मणग्रंथांत आली आहे. यज्ञांचे विधान करणाऱ्या वाक्यांना विधिवाक्ये म्हणतात. कर्म करीत असताना काही गोष्टींचा निषेध केलेला असतो. उदा. खोटे बोलू नये, मांसभक्षण करू नये. अशा वाक्यांना निषेधवाक्ये म्हणतात. पण या वाक्यांबरोबर अर्थवाद या नावाने ओळखला जाणारा पुष्कळ मोठा भाग ब्राह्मणग्रंथांत आढळतो. अर्थवाद म्हणजे विधेय कर्माची स्तुती किंवा निषिद्ध कर्माची निंदा. या अर्थवाद भागात कथा, आख्याने, शब्दांच्या व्युत्पत्ती इ. विषय येतात.

याशिवाय ब्राह्मणग्रंथांत सोमयाग, राजसूय, अश्वमेध, सत्रे इ. अनेक प्रकारचे मोठे यज्ञ सांगितले आहेत. या यज्ञांचे अनुष्ठान करण्यास अनेकांचे साहाय्य घ्यावे लागते. साधनसामग्री पुष्कळ लागते. त्यामुळे अशा श्रौतयज्ञांची अनुष्ठाने आधुनिक काळात क्वचितच होतात.

ब्राह्मणग्रंथांत अनेक कथा सांगितल्या आहेत. त्यांतील काही कथा मनोरंजक आहेत; तर काही कथांतून प्राचीन काळचा इतिहासही समजून येतो. यज्ञातील एखाद्या विधीचे वर्णन करताना कथा सांगितलेली असते.

शतपथ ब्राह्मणात अग्निमंथाचे विधान करताना पुरुरवस व उर्वशी यांचे आख्यान झाले आहे. राजसूयाच्या संदर्भात आलेली ऐतरेय ब्राह्मणातील शुनःशेपाची कथा प्रसिद्ध आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाचे मूलाधार ग्रंथ म्हणजे उपनिषदे होत. पण उपनिषदांतील तत्वज्ञान ब्राह्मणग्रंथांतून निर्माण झालेले आहे. यज्ञांचे विधान सांगताना ‘य एवं वेद’(जो अशा प्रकारे ज्ञान करून घेतो) हे वाक्य ब्राह्मणग्रंथांत वारंवार आले आहे. म्हणजे प्रत्यक्ष यज्ञ न करता अर्थाज्ञानपूर्वक त्या त्या यज्ञविषयक भागाचे चिंतन केल्यास योग्य असे फळ मिळवता येते. उपनिषदांतील अनेक विचार ब्राह्मणग्रंथांतील यज्ञांच्या पृष्ठभूमीवर मांडलेले आहे. तत्वज्ञानाप्रमाणे मीमांसा, व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, गणित, रसायन, शेती, वनस्पतिशास्त्र इ. अनेक शास्त्रांच्या प्राथमिक स्वरूपाची माहिती ब्राह्मणग्रंथांवरून मिळू शकते.

निरनिराळया वेदांची ब्राह्मणे: निरनिराळया वेदशाखांचे ब्राह्मणग्रंथ उपलब्ध असून त्यात यज्ञात भाग घेणाऱ्या ऋत्विजांच्या कामाची माहिती सांगितलेली आहे.

ऋग्वेदातील मंत्र म्हणण्याचे काम ‘होता’ नावाच्या ऋत्विजाकडे असते अर्थात त्याने ते मंत्र केव्हा म्हणावे यासंबंधीचे विधान ऐतरेय आणि कौषीतकी या ऋग्वेदाच्या ब्राह्मणग्रंथांत केलेले आहे.

‘अध्वर्यू’ हा यजुर्वेदातील मंत्र म्हणतो, तर‘उद्गाता’ हा सामवेदातील मंत्रांवर सामगान करतो. म्हणून त्यांच्या कामांची माहिती त्या त्या ब्राह्मणग्रंथांत सांगितलेली आहे. अथर्ववेदातील काही मंत्र म्हणून काम करणाऱ्या ‘ब्रह्मा’ या ऋत्विजाच्या कर्माची माहिती गोपथब्राह्मणात आहे.

१) **ऐतरेय ब्राह्मण**: हे ब्राह्मण ऋग्वेदाचे असून महीदास ऐतरेय हा या ब्राह्मणाचा ऋषी समजला जातो. मुख्यतः 'होता' या ऋत्विजाने यज्ञांत ऋग्वेदातील कोणती सूत्रे म्हणावी याचे विधान यात आहे. याची भाषा गद्य आहे. अलंकारांनी युक्त आहे. अनेक ठिकाणी मंत्राचा अर्थ कर्माला कसा जुळणार आहे हेही सांगितले आहे. यात अनेक कथा आलेल्या आहेत.

२) **कौषीतकी ब्राह्मण**: हेही ऋग्वेदाचे ब्राह्मण आहे. यास शांखायन ब्राह्मण असेही म्हणतात. काहींच्या मते हे दोन ब्राह्मणग्रंथ वेगवेगळे असावे. यात ऐतरेयाप्रमाणेच सर्व विषय आले आहेत. अग्निहोत्र, प्रायश्चित्ते यांसंबंधीची अधिक माहिती आहे.

३) **तैत्तिरीय ब्राह्मण** : कृष्णयुजर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेचे हे ब्राह्मण आहे. त्यांत विविध यज्ञांचे विवेचन करणारा गद्य भाग आहे. त्याचप्रमाणे यात काही मंत्रही आलेले आहेत. अध्वर्यू या नावाच्या ऋत्विजाने यज्ञात करावयाच्या अनेक विधींचे विवेचन यात असल्याने याचा विस्तार मोठा आहे. अग्न्याधान, गवामयन, वाजपेय, सौत्रामणी, सव, काठकचयने इ. अनेक विषयांची माहिती यात सांगितलेली आहे.

४) **शतपथ ब्राह्मण**:शुक्लयजुर्वेदाच्या माध्यन्दिन व काण्व अशा दोन्ही शाखांची ब्राह्मणे या एकाच नावाने प्रसिद्ध आहेत. तथापि त्यांत फारच थोडा फरक आहे. या ब्राह्मणाचा ऋषी याज्ञवल्क्य आहे. या माध्यन्दिन शाखीय ब्राह्मणाची चौदा कांडे असून पहिल्या नऊ कांडांत शुक्लयजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेतील मंत्रांचा यज्ञांच्या क्रमाने विनियोग सांगितला आहे. त्यांत दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, सोमयाग,

चयने वगैरे यज्ञांचे तपशिलवार विवेचन आहे. विधींच्या अनुषंगाने अनेक कथा या ब्राह्मणांत आल्या आहेत. दहाव्या कांडात शांडिल्याने सांगितलेले अग्निरहस्य आहे. अकरा ते चौदा या कांडांत उपनयन, ब्रह्मचरित्रते, पितृमेध, प्रवर्ग्य असे अन्य विषय आहेत. चौदावे कांड आरण्यक म्हणून प्रसिद्ध असून त्यांतील शेवटच्या सहा अध्यायांना बृहदारण्यकोपनिषद असे म्हणतात.

५) **तांड्य ब्राह्मण**: हे सामवेदाचे प्रसिद्ध ब्राह्मण आहे. यामध्ये उद्गाता नावाच्या ऋत्विजाने वेगवेगळया यज्ञांत म्हणावयाच्या सामांची माहिती दिली आहे. सामांचे अनेक प्रकार यात उल्लेखिले असून त्यांवर आधारित असे अनेक सोमयाग सांगितलेले आहेत.

६) **गोपथ ब्राह्मण**: अथर्ववेदाशी संबंधित असे हे एकमेव ब्राह्मण आहे. हे ब्राह्मण बरेचसे अर्वाचीन समजले जाते. ब्रह्मा या ऋत्विजाने करावयाच्या कर्मांन विधान यात आहे. पूर्व गोपथ व उत्तर गोपथ असे याचे दोन भाग आहेत. यात श्रौतयज्ञाबरोबर उपनयनादी संस्कार, पाकयज्ञ, बलिहरण यांसारख्या काही स्मार्त कर्मांचेही विवेचन आहे. अंग, मगध, कुरू, पांचाल इ. देशांची नावे यात आहेत. गोपथ या नावाचा कोणी एक ऋषी असावा असे मानले जाते. व्युत्पत्तिशास्त्र व भाषाशास्त्र या दृष्टीने हे ब्राह्मण महत्त्वाचे आहे.

भिडे, वि. वि. (विश्वकोश)

# उपनिषदें

उपनिषदें शेकड्यांच्यावर आहेत. त्यातली काही प्रमुख पुढे दिली आहेत.

उपनिषद याचा अर्थ जवळ बसणे असा आहे. गुरूजवळ बसून शिष्य ज्ञान घेत आहे. शिष्याच्या अंत:करणात गुरुविषयी नितान्त आदर आणि गुरूला शिष्याविषयी निरतिशय प्रेम असे हे नाते आहे.

१) **ईशावास्योपनिषद्** –

प्रत्येक उपनिषदाच्या सुरुवातीला प्रार्थना दिलेली असते.

ॐ पूर्णमद: पूर्णांमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ॥

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥

ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ॥

‘ईश्वर पूर्ण आहे.

“ईशावास्यम् इदम् सर्वम्”

ईश्वरापासून उत्पन्न झालेले हे विश्व पूर्ण आहे. पूर्णापासून पूर्ण उत्पन्न झाले, तरी शेवटी पूर्णच शिल्लक राहिले आहे,’ ही ईशोपनिषदाची प्रार्थना आहे. गुरु प्रसन्न झाला म्हणजे आपले संपूर्ण ज्ञान शिष्याला देतो. गुरुच्या पूर्ण ज्ञानातून संपूर्ण ज्ञान शिष्याकडे निघून गेलेले असते. तरीही गुरुकडे पुन्हा पूर्ण ज्ञान शिल्लकच असते.

ईश्वर अनंत आहे. ईश्वर जसा पूर्ण आहे तसाच अनंतही आहे. त्याचे पूर्णत्व जसे व्यापक तसे अनंतत्वही व्यापक. पूर्णत्वाला समर्पक दृष्टांत नाही तसा अनंतत्वालाही नाही. ज्या आभाळात सर्व मावते त्याच्या आकाराला उपमा कुणाची? ज्या सूर्याच्या प्रकाशाने सारे प्रकाशते त्याला उपमा कुणाच्या प्रकाशाची?

हे विश्व किती व्यापक आहे?

ज्याची गणतीही करणे अशक्य आहे. सर्व आयुष्य आपण संख्यांवर शून्ये लिहीत बसलो तरी ज्यांचे मोजमाप संपणार नाही, इतक्या सूर्यमाला या विश्वाच्या अवकाशात, आपापल्या गतींनी फिरत आहेत.

हे सारे विश्व ईश्वरमय आहे असे जाणल्यावर लोभ कशाचा धरायचा? इथे कुणाचे आहेच काय? धन कुणाचे? घर कुणाचे? कांता कुणाची? पुत्र कुणाचा? हे सारे ईश्वराचेच आहे, त्याच्यावर लोभ ठेवण्याचा आपल्याला अधिकार नाही.

## २) केनोपनिषद्-

प्रार्थना : माझे शरीर, माझी इंद्रिये आणि सामर्थ्य हीसारी त्या ईश्वराला जाणून घेण्याइतकी समर्थ बनोत. ईश्वराची भेट व्हावी यासाठी झिजण्याची प्रवृत्ती त्यांना व्होवो आणि कष्ट त्यांना घडोत. ज्या ईश्वराचे वर्णन सर्व उपनिषदात आहे, त्याविषयीचे प्रेम माझ्या मनांत निरंतर असो. मला ईश्वराचा द्वेष कधी न वाटो. माझे प्रेम माझी ओढ जो जाणतो त्या ईश्वराचेही माझ्यावर सदासर्वदा प्रेम असो. तो ईश्वर मला कधी दूर न करो. माझा तिरस्कार न करो. उपनिषदांनी जो सदाचार सांगितला आहे, सन्मार्ग म्हणून सांगितला आहे, तसेच माझे आचरण घडो.

ईश्वराचे ज्ञान इतर ज्ञानाप्रमाणे देता येत नाही. ज्या ज्ञात गोष्टी आहेत आणि अज्ञातही, त्या साऱ्यांच्या पलीकडे ईश्वर आहे.

ज्या मनाने संकल्प करून ईश्वर जाणायचा असतो त्या मनाचे चैतन्य ईश्वर आहे. कान, वाणी, डोळे, मन यांचे चैतन्यही ईश्वर आहे.

पृथ्वीवर जे जे आहे ते ईश्वराचे स्वरूप आहे. प्रत्येक स्थिर आणि चर वस्तूंमध्ये ईश्वर आहे. आणि प्रत्येक स्थिर आणि चर वस्तू ईश्वरात आहे याची जाणीव होते.

३) **प्रश्नोपनिषद्** –

प्रार्थना :

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा: पश्येमाक्षभिर्यजत्राः॥

स्थिरैरंगैस्तुष्टुवांसस्तनूभिर्व्यशेम देवहितं यदायुः ॥

ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ॥

हे देव हो, आमच्या कानांत ईश्वर संकीर्तनाची शुभ वाक्येच पडोत. जीवनरुपी यज्ञाला प्रवृत्त झालेल्या आमच्या नेत्रांसमोर ईश्वराचे स्मरण घडविणारी शुभ दृष्येच दिसोत. आमचे शरीर आणि इंद्रिये ही ईश्वरासाठीच झिजोत आणि ईश्वराने आम्हास दिलेले आयुष्य सत्कारणी लागो.

ज्ञान हे थोडक्यात मिळाले तर त्याची किंमत कमी होते. ते कष्टाने लाभले तर तेच अंगी अधिक बाणते हे पिपलाद मुनींना माहीत होते. त्यामुळे त्या मुनींनी त्यांच्या शिष्यांना तपश्चर्या आणि ब्रह्मचर्य यासह एक वर्षपर्यंत आपल्या प्रश्नांचे आपणच चिंतन करण्याची आज्ञा केली. एक वर्षाच्या चिंतनानेही त्यांना आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली नाहीत. तेंव्हा ते पुन्हा पिपलाद मुनींकडे आले.

शिष्यांनी विचारलेले प्रश्न आणि त्यांची उत्तरे –

१) गुरुजी, सृष्टीमध्ये प्रजेची उत्पत्ती कशी झाली?

उत्तर : ईश्वराच्या मनात आले की आपण आता अनेकविध व्हावे. म्हणून त्याने निष्क्रीय व क्रियावान असे जीवतत्त्व उत्पन्न केले. त्याने प्रथम सुर्याला जन्म दिला आणि मग चंद्राला जन्म दिला आणि त्यानंतर

पृथ्वी निर्माण केली. सूर्य, चंद्राने पृथ्वीला गती दिली. या गतीतून अयन व महिने आणि दिवस व रात्र ही उत्पन्न झाली.

सूर्य हेच पृथ्वीवरील जीवतत्व आहे. सूर्याचे किरण जिथे जिथे जातात तिथे ते जीवतत्व निर्माण करतात. सूर्य आणि चंद्र यांच्यामुळे वनस्पतींची उत्पत्ती होते. वनस्पतीरूपी अन्नाच्या मंथनातून जीव बीज म्हणजे रेत उत्पन्न होते आणि त्यातूनच प्रजा निर्माण होते.

२) देहामध्ये श्रेष्ठ काय?

उत्तर : देहामध्ये प्राण श्रेठ. प्राणामुळे वाणी बोलते, डोळे पाहतात, कान ऐकतात,

३) प्राण कशापासून उत्पन्न होतो?(पंचप्राण)

प्राण हा ईश्वरापासून उत्पन्न होतो. प्राण शरीरात प्रवेश करतो, शरीर धारण करतो. प्राण शरीरात पाच विभागात राहतो. शरीराच्या वरच्या भागात राहणाऱ्या विभागास प्राण असेच म्हणतात. तो कान, डोळे इत्यादिना शक्ती देण्याचे काम करतो. शरीराच्या खालच्या विभागात राहणाऱ्या प्राणाला अपान असे म्हणतात. शरीराच्या स्वच्छतेवर नियंत्रण करतो. उदरातल्या विभागाला समान असे म्हणतात. हा विभाग अन्नापासून उत्पन्न झालेल्या पोषक शक्तींची शरीरात समान वाटणी करतो. आपल्या हृदयापासून एकशे एक नाड्या निघतात. त्यांच्या शेवटी बहात्तर कोटी, बहात्तर लक्ष, दहा हजार दोनशे इतक्या उप-नाड्या होतात. या विभागाला व्यान असे म्हणतात. या एकशे एक नाड्यांमध्ये सुषुम्ना नावाची एक मुख्य नाडी आहे. तिच्यावर सत्ता चालविणाऱ्या विभागाला उदान असे म्हणतात. हेच मनुष्याचे पंचप्राण होत. अंतकाळ जवळ असता प्राण इंद्रियांच्या शक्ती मनात लोपवितो आणि उदान सत्ताविभागात स्थित होऊन तेथून देह सोडून जातो. हा मुखातून जातो.

४) गुरुजी, शरीरामध्ये झोपते कोण? जागते कोण? स्वप्ने कोण पाहाते? निद्रेमध्ये सुख कोणाला होते?

उत्तर : इंद्रियांच्या सर्व शक्ती निद्रेच्या प्रसंगी मनामध्ये लोप पावतात. इंद्रिये या वेळी झोपलेली असतात. त्यामुळे यावेळी ऐकू येत नाही, दिसत नाही, वास येत नाही, रुची लागत नाही, स्पर्श कळत नाही, बोलता येत नाही, देता येत नाही, घेता येत नाही, चालता येत नाही. यावेळी सर्व ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये झोपलेली असतात.

प्राण मात्र या वेळी आणि सदाचा जागा असतो. शरीर धारणेचे आपले कार्य तो नेहमी करीत असतो. असा काही वेळ असतो की जेंव्हा इंद्रिये झोपलेली असतात, पण मन झोपलेले नसते.

अशा वेळी मनात आत्मा स्वप्नांचा अनुभव घेत असतो. वासनांच्या बळानुसार मन पाहिलेले - न पाहिलेले, ऐकलेले – न ऐकलेले, अनुभवलेले – न अनुभवलेले प्रसंग उभे करते आणि आत्मा त्याचा अनुभव घेतो.

नंतर काही वेळाने आत्माही झोपी जातो. प्राण अशा वेळी जागाच असतो. निद्रेच्या वेळी आत्मा ईश्वराकडे गेलेला असतो.

५) गुरुदेवा, आयुष्यभर निष्ठेने ॐकाराचा जप केल्याने काय फळ मिळते?

उत्तर : ॐकार हा परमेश्वरवाचक शब्द आहे. त्याचा जप केल्याने, त्याचा ध्यास घेतल्याने मनुष्य ईश्वराचे दर्शन पावतो. ॐ या अक्षराच्या अ उ व म अशा तीन मात्रा आहेत. अ हे अक्षर शरीराचे वाचक आहे. उ हे अक्षर मनाचे वाचक आहे. म हे अक्षर आत्म्याचे वाचक आहे. ॐ ह्या मंत्राचा जप अउम असा

शांतपणे करावयास हवा. असे केल्याने ऐहिक संपत्तीबरोबर मन शुद्ध होऊन शेवटी आत्म्याचा उद्धार होतो आणि ईश्वराचे दर्शन होते.

६) ईश्वर कोठे राहतो?

ईश्वरच आत्म्याच्या रुपाने आपल्या देहात असतो.

४) **मांडुक्योपनिषद्** –

(याची प्रार्थना व प्रश्नोपनिषदाची प्रार्थना एकच आहे)

हे सर्व विश्व ॐकारमय आहे. भूत, भविष्य आणि वर्तमान यात जे आहे ते आणि या त्रिकालाच्या पलीकडे जे आहे तेही ॐकारमयच आहे. ॐकार म्हणजेच ईश्वर होय.

आत्मा चार रूपे धारण करतो.

१) जागृतावस्था

२) स्वप्नस्थिती

३) सुषुप्तावस्था

४) ईश्वरात विलीन होणे, एकरूप होणे.

५) **बृहदारण्यकोपनिषद्-**

(याची व ईशावास्योपनिषदाची प्रार्थना एकच आहे)

असतो मा सद्गमय ।

तमसो मा ज्योतिर्गमय।

मृत्योर्माऽमृतं गमय ॥

"मूर्त आणि अमूर्त  अशी परमेश्वराची दोन रूपे आहेत. ज्ञानाचा आरंभ मूर्तापासून होत असला तरी त्याचा शेवट अमूर्ताच्या ज्ञानात व्हावयास हवा. जे ज्ञात तेथून अज्ञाताकडे जावयास हवे. ॐकारपूर्वक आरंभिलेल्या ज्ञानाचा शेवट ॐकाराचे स्वरूप जाणण्यात व्हावयास हवा. ज्ञानाला मर्यादा नाही. त्याचा

अमर्याद असा विस्तार होऊन अमर्याद असा परमेश्वर त्याच्या कक्षेत यावयास हवा. म्हणजेच असत्यातून सत्याचे, अंधारातून प्रकाशाचे, मृत्यूतून अमृताचे ज्ञान व्हावयास हवे."

"अमर्यादाचे ज्ञान शब्दात मिळत नाही. कितीही वर्णन करून परमेश्वर काय असे विचारले तरी 'हा नाही, हा नाही. (नेति नेति) हेच त्याचे उत्तर आहे. त्याचे ज्ञान झाल्याचे मुख्य लक्षण म्हणजे आपणास काहीही समजलेले नाही हेच समजणे होय."

याच उपनिषदात याज्ञवल्क्य आणि मैत्रेयी यांचा संवाद आहे. त्याचप्रमाणे गार्गीचाही उल्लेख आहे. या दोनही स्त्रिया महापंडिता होत्या. त्यामुळे पुराणकाळातही स्त्रियांना मान होता हेच सिद्ध होते.

**तेहेतीस देव** या प्रमाणे :-

**आठ वसू** – अग्नी, पृथ्वी, वायु, अंतरिक्ष, आदित्य, द्यौ, चंद्रमा आणि नक्षत्रे.

**अकरा रुद्र** – दहा इंद्रिये व आत्मा. (रुद्र = देह सोडताना रडवितात म्हणून)

**बारा आदित्य** – बारा महिने

**प्रजापती आणि इंद्र.**

६) **कठोपनिषद्** –

प्रार्थना :

ॐ सह नाववतु ॥ सह नौ भुनक्तु ॥ सह वीर्यं करवावहै ॥

तेजस्विनावधीतमस्तुमा विद्विषावहै॥

ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ॥

आम्ही दोघांनी एकत्र राहावे, एकत्र सेवन करावे, एकत्र पराक्रम करावा, आमचा अभ्यास आम्हास तेजस्वी करणारा असावा. आमच्याकडून एकमेकांचा द्वेष न घडावा.

ईश्वर आम्हा दोघा गुरुशिष्याचे एकत्रच संकटापासून रक्षण करो. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाची लूट करण्याचा जो पराक्रम आम्ही करणार आहोत, त्यात आम्हा दोघांचा सहकारच असो. आमचे अध्ययन हे

तेजाळ असो; अविद्येचा अंधाराचा नाश करणारे असो. आमच्यामध्ये विद्वेषाची, गैरसमजाची भावना न पसरो.

ईश्वरावर श्रद्धा ठेऊन दुसऱ्या कोणत्याही फळाच्या आशेशिवाय कर्म केले तरच ईश्वराचा लाभ होईल. ईश्वरासाठी तीर्थयात्रा करणारे लोक उगाच भ्रमत असतात.त्यांना लोकव्यवहाराचे ज्ञान, सुंदर दृश्यांनी डोळयांचे समाधान असल्या लौकिक गोष्टीच यात्रांनी साध्य होतात; ईश्वर नाही.

आत्मा गेल्यावर देहाचे प्रेत होते. “देह प्राणवायूने जगतो, अन्नाने जगतो” या म्हणण्याला मर्यादित अर्थ आहे. प्रेताभोवती प्राणवायू आणि पक्वान्ने यांच्या राशी उभ्या केल्या तरी प्रेताला चेतना येणार नाही. प्राणवायू तिथेच असला तरी देहाचे प्रेत होते. मृत्यूचे कारण प्राणवायूचा अभाव हे नव्हे तर आत्म्याचा अभाव हे आहे.

## ७) मुंडकोपनिषद्-

(याची आणि प्रश्नोपनिषदाची प्रार्थना एकच आहे.)

ऋषी अंगिरस आणि शिष्य शौनक यांची हीकथा. शौनक "गुरुदेव, जी एकाच विद्या शिकली असता सर्व ज्ञानाची प्राप्ती होते ती विद्या मला सांगा."

ऋषी अंगिरस "विद्येचे दोन प्रकार आहेत. एक अपरा म्हणजे कनिष्ठ विद्या आणि दुसरी परा म्हणजे श्रेष्ठ विद्या. वेदवेदांगांचे अध्ययन घडून फलाशेने कर्म करावयास प्रवृत्त करणारी ती अपरा विद्या होय. वेदान्ताचे अध्ययन करून निष्काम कर्माच्या योगाने ईश्वराचे ज्ञान घेण्या इतकी तत्त्वदर्शी बनविणारी ती परा विद्या होय. बुद्धिमान लोक परा विद्येच्या साहाय्याने ईश्वरदर्शन पावतात.

शुद्ध अंत:करण हीच ईश्वराला पाहण्याची एक जागा आहे. इतर कशानेही ईश्वर दिसू शकत नाही. चंद्राच्या प्रकाशात ज्याप्रमाणे सूर्य दिसू शकणार नाही, त्याप्रमाणे इतर कसल्याही प्रकाशाने ईश्वर दिसू शकणार नाही. कारण ते सारे प्रकाश ईश्वराने निर्मिलेले असतात.

सत्यमेव जयति नानृतम् ।

विश्वात नेहमी सत्याचाच जय होतो. असत्याचा कधीही होत नाही.

## ८) छांदोग्योपनिषद् –

(याची प्रार्थना आणि केनोपनिषदाची प्रार्थना एकाच आहे.)

ॐकार हे ईश्वर स्वरूप आहे. कोणत्याही कामाचा आरंभ ईश्वर-स्मरणपूर्वककरावा.

मनामध्ये जेंव्हा सत्प्रवृत्ती आणि दुष्प्रवृत्ती यांचे युद्ध सुरु होते तेंव्हा सत्प्रवृत्तीचा दुष्प्रवृत्तीवर ॐकाराने विजय होतो. कुविचार पाठलाग करतात तेंव्हा सुविचार ॐकाराशिवाय कुणाच्याही आश्रयाला जाऊ शकत नाहीत.

ॐम्हणजेच समृद्धी होय.

ॐम्हणजे तीनही वेदांचे कर्म होय.

ॐकाराने आरंभ करूनच कर्म करावे.

ॐकाराचे महत्व जाणणारे आणि न जाणणारे दोघेही कर्मच करीत असतात. पण त्या कर्माकर्मात अंतर असते. ॐकारपूर्वक कर्म करणारे ते कर्म ईश्वराला अर्पण करीत असतात आणि फलांच्या बंधनातून मुक्त होतात. नुसते कर्म करणारे कर्माच्या बंधनात सापडतात. या दोघांतील फरक हा विद्या अविद्या, ज्ञान अज्ञान यातील फरक होय.

ज्ञानाची किंमत कळल्याशिवाय ज्ञानाची ओढ लागत नसते. ज्ञान हे आपले आपण मिळवायचे असले तरी पुत्राच्या मनात ज्ञानाची ओढ उत्पन्न करणे हे पित्याचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे ही ओढ व जिज्ञासा पटल्यावर त्याला ज्ञानाची दिशा दाखविणे हे गुरुचे कर्तव्य आहे.

## ९) तैत्तिरीयोपनिषद् –

प्रार्थना : सूर्य आणि वरूण आमचे कल्याण करोत. इंद्र आणि गुरु आमचे कल्याण करोत. वेगाने भुवन व्यापणारा विष्णू आमचे कल्याण करो. ईश्वर आमचे कल्याण करो. वायू आमचे कल्याण करो.

देहांतर्गत ईश्वर म्हणजे आत्मा हाच देहाचा अधिपती होय. मन, वाणी, नेत्र इत्यादींचा स्वामी तोच असतो. तो शांत, मृत्यूरहित आणि सूक्ष्म असतो. या आत्म्याचे नेहमी स्मरण ठेवले पाहिजे.

सत्यं वद । धर्मं चर ॥

खरे बोल, धर्माने वाग.

मातृदेवो भव ।

पितृदेवो भव ।

आचार्यदेवो भव ।

अतिथिदेवो भव ॥

आईला देव मान. वडिलांना देव मान. गुरूला देव मान. अतिथीला देव मान.

अन्नं न निंद्यात् ।

अन्नं न परिचक्षीत ॥

अन्नं बहु कुर्वीत ॥

तू कधीही अन्नाची निंदा करून नकोस. अन्नाचा त्याग न करण्याचे व्रतच धर.

अन्नाची वृद्धी करण्याचे व्रत घे.

## १०) ऐतरेयोपनिषद् –

प्रार्थना :हे ईश्वरा, मला दर्शन दे. माझ्या मनात जे बोलावे असे वाटेल तेच बोलण्याची माझ्या वाणीला शक्ती दे. वाणीने जे मंगल बोल बोलणे उचित तेच बोलण्याचे माझ्या मनात येऊ दे. माझे मन आणि वाचा मिळून सर्व ज्ञान माझ्याकडे आणतील आणि एकदा आल्यावर ते मी विसरणार नाही असे कर.

मी जे अध्ययन करीन त्याचे अहोरात्र चिंतन करून माझे आचरण, विचार व उच्चार मी माझ्यासारखे करीन असे कर. मी नित्य सरळ बोलेन, सत्य बोलेन असे कर. ईश्वरा, माझे आणि माझ्या गुरुचे संरक्षण कर.

आनंद साधले (उपनिषदें भाग १ व २)

# स्मृती

## अत्रिस्मृती –

जी स्त्री बलपूर्वक हरण केलेली असेल किंवा तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी अतिप्रसंग केला असेल तर अशा स्त्रीचा त्याग करू नये. अशी स्त्री दुषित होत नाही. अशी स्त्री रजस्वला झाली किंवा तिने प्रजापत्य व्रत केले तर ती आपोआप शुद्ध होते.

या स्मृतीचे फळ

“विद्यार्थी लभते विद्यां धनकामो धनानी च

आयुष्कामस्ततथैवायुः श्रीकामो महती श्रीयाम”

असे सांगितले आहे. या स्मृतीचा पाठ करण्याने विद्यार्थ्याला विद्या, धनाची इच्छा करणाऱ्याला धन, दीर्घायुष्याची इच्छा करणाऱ्याला दीर्घायुष्य आणि सौंदर्याची इच्छा करणाऱ्याला सौंदर्याची प्राप्ती होईल.

# मनुस्मृती

काळ : इ.स. दुसरे शतक - भृगुप्रोक्त –

मनुस्मृतीचे बारा अध्याय आहेत.

अध्याय १ : विश्वाची उत्पत्ती, विराट पुरुषाची उत्पत्ती, स्थावर जंगमाची निर्मिती, चातुर्वण्याची उत्पत्ती, कर्मे आणि ब्राह्मणांचे वर्चस्व, आचार महिमा इत्यादी यात येतात.

अध्याय २ : धर्माची व्याख्या, धर्माची प्रमाणे, वेद प्रामाण्य, संस्कारांचे महत्व, स्त्रियांचे संस्कार, ब्रह्मचर्याची व्रते इत्यादी.

अध्याय ३ : गृहस्थाश्रम, सवर्ण व असवर्ण स्त्री-पुरुष विवाह, गृहस्थधर्म इत्यादी.

अध्याय ४ : जीवनउपाय.

अध्याय ५ : भक्ष्याभक्ष्य, स्त्रीधर्म, पातिव्रत्य इत्यादी.

अध्याय ६ : वानप्रस्थाश्रम, संन्यासधर्म, अतिथीपूजा, मोक्षसाधना इत्यादी.

अध्याय ७ : राजधर्म.

अध्याय ८: न्यायसंस्था – साक्षीधर्म, ऋणविचार, ठेव – अपराध व नियम, व्यापार-उद्योग, सीमेसंबंधीचे वाद, कठोरभाषा व त्यावरील दंड, दुसऱ्याला शारीरिक इजा करणे, चोरी असे असंख्य प्रश्न यात येतात.

अध्याय ९ : वारसा हक्क, जुगार, समाजकंटकांपासून धोका व त्यांचा बंदोबस्त इत्यादी.

अध्याय १० : चारी वर्णांचे आणि संकर जातीचे विवरण,  जातींचे उपजीविकेचे व्यवसाय, आपद्धर्म, धनार्जनाचे मार्ग इत्यादी.

अध्याय ११ : दानधर्म, पाप आणि त्याचे प्रायश्चित्त इत्यादी.

अध्याय १२ : शुभाशुभ कार्याचे तत्वज्ञान, वेदप्रशंसा, मोक्षोपाय विचार, धर्मांची प्रमाणे इत्यादी.

मनुस्मृतीतील धर्मशात्र हे अध्यात्मिक तत्त्वज्ञानावर आधारलेले आहे. सर्व सत् आणि असत विश्व आत्म्यात सामावलेले आहे. मनुष्याच्या जीवनाची धर्म, अर्थ आणि काम ही तीन मुख्य उद्दिष्टे आहेत. ऐहिक दृष्ट्या समृद्ध जीवनाच्या निर्मितीकडे पाठ फिरवून वैराग्याच्या दीक्षेला महत्व देता कामा नये असे मनुस्मृती सांगते.

चातुर्वर्ण्यव्यवस्था – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र.

आश्रमव्यवस्था आणि चातुर्वर्ण्यव्यवस्था ही सामाजिक जीवनाची मुख्य रचना अशा निर्विकार प्रज्ञेनेच नीट रीतीने स्पष्ट होऊ शकते, असा मनुचा सिध्दांत आहे. त्याने असे म्हटले आहे, की ज्ञानी, सज्जन, रागद्वेषापासून नित्यमुक्त अशांच्या ह्रदयाला पटलेला असा धर्म या मानवधर्मशास्त्रात सांगितलेला आहे. आर्थिक लाभ आणि बाह्येंद्रियांचे सुख यांपासून जे अलिप्त असतात त्यांनाच धर्मज्ञान प्राप्त होऊ शकते.

मनुष्याच्या जीवनाची धर्म, अर्थ आणि काम ही तीन मुख्य उद्दिष्टे आहेत. यांचा समतोल ज्या आचारपध्दतीने साधेल तीच आचारपध्दती लोकयात्रेस, सामाजिक जीवन व्यवस्थित रीतीने चालू राहण्यास, म्हणजे समाजधारणेस कारणीभूतहोते.

मनुस्मृतीतील समाजरचना म्हणजे चातुर्वर्ण्यव्यवस्थाहोय. भारतीय समाजरचनेचा तात्विक आकार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र याउच्च-नीच वर्णव्यवस्थेत प्रत्ययास येतो.

लाकडाचा हत्ती, भुसा भरलेल्या चामड्याचा मृग व अशिक्षित ब्राह्मण हे केवळ नामधारी होत. धनाच्या लोभाने जगणारा कर्तव्यच्युत ब्राह्मण हा आणि शूद्र यांच्यात फरक नाही. किंबहुना कर्तव्यच्युतीने सगळेच वर्ण स्वस्थानापासून भ्रष्ट होतात. असे मनूने निक्षून सांगितले आहे. केवळ जगण्यापुरतेच धन ब्राम्हणाने मिळवावे. इंद्रियांच्या सुखाकरता नव्हे. क्षत्रियांने इंद्रियांवर जय मिळवून इतर देश जिंकायला निघावे. इंद्रियांवर विजय न मिळवलेला क्षत्रिय हा सर्वच गमावून बसतो. अशा तऱ्हेचे वर्णव्यवस्थेचे चित्र मानवधर्मशास्त्रामध्ये निदर्शनास येते.

मनुप्रणीत राज्यशास्त्र – प्रजापालनाचा धर्म हा मुख्य राजधर्म आहे. प्रजांच्या परंपरागत धर्मव्यवस्थेची सुरक्षा ही राजाची जबाबदारी होय. समाजनियंत्रण आणि समाजाचे नियमन करण्याची दमनशक्ती म्हणजे दंडसंस्था हीराजाने नीट वापरली तरच त्याचे राज्य चालते.

सगळे आश्रमधर्म, वर्णधर्म, देशजातिधर्म, कुलधर्म, राजधर्म या सगळयांची कसोटी सार्वत्रिक धर्म होय. ह्या सार्वत्रिक धर्माची दहा लक्षणे मानवधर्मशास्त्रात सांगितलेली आहेत ती अशी :

1. संतोष
2. क्षमा म्हणजे दुसऱ्याने अपकार केला असताना आपण उलट त्याला अपकार न करणे
3. दम : मनाला व इंद्रियाला चलित करण्याच्या परिस्थितीमध्ये मनाचा निग्रह
4. अस्तेय - परधनाचा अपहार न करणे
5. शौच म्हणजे देहाचीस्वच्छता

6. इंद्रियनिग्रह
7. ज्ञान
8. विविध विद्यांचा अभ्यास
9. सत्य
10. अक्रोध.

हे दहामिळून धर्माचे लक्षण होय.

भारतात हिंदू समाजात समाजसुधारणेचे व धर्मसुधारणेचे आंदोलनसुरू होऊन १५० हून अधिक वर्षे झाली. मनुस्मृतीतील किंवा एकंदरीत हिंदुधर्मशास्त्रातील विधिनिषेध किंवा धर्मनियम हे समाज सुधारणेच्या आणि धर्मसुधारणेच्या विरोधी असल्यामुळे रूढिनिष्ठ जनता व समाजसुधारक ह्यांच्यात संघर्ष सुरू झाला.

प्रथम समाजसुधारणेस अनुकूल असलेली धर्मशास्त्रातील वचने हुडकून काढून समाजसुधारक स्वतःच्या सुधारणेच्या कार्यक्रमाचे समर्थन करू लागले. परंतु रूढीनिष्ठांची धर्मशास्त्रविषयक बाजू खूप

बळकट असल्यामुळे समाजसुधारणेची चळवळ जेव्हा दृढमूल होऊ लागली आणि पसरू लागली तेव्हा मनुस्मृती व धर्मशास्त्र ह्यांच्याविरूध्द जाणारा जहाल समाजसुधारकांचा वर्ग पुढे आला.

अस्पृश्यता निवारणाच्या संदर्भात अस्पृश्य समाजातून सुधारक नेतृत्व वर आले. उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी प्रतीकात्मक कृती म्हणून मनुस्मृती जाळण्याचा कार्यक्रम अनेकदा पार पाडला. मनुस्मृतीमध्ये स्त्री-पुरूषनियमन, स्त्रियांचे पारतंत्र्य आणि जातिबध्द विषमसमाजरचना ह्यांचे जोरदार समर्थन आहे. ब्राह्मण जात सर्वश्रेष्ठ व अस्पृश्य जमात ही सर्वात कनिष्ठ, बहिष्कार्य आणि सर्वसामान्य उच्चवर्णीयांच्या किंवा सवर्णांच्या वसतिस्थानांपासून दूर, अलग राहण्यास पात्र होय असे मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे. म्हणून मनुस्मृतीच्या आणि परंपरागत धर्मशास्त्राच्या विरूध्द आजचे हिंदुसमाजसुधारक वारंवार लिहितात व प्रचार करतात.

जोशी, लक्ष्मणशास्त्री. (विश्वकोश)

# षड्दर्शने

एकत्वात अनेकतेची अभिव्यक्ती आणि अनेकतेत एकतेचे दर्शन हे षड्दर्शनाचे लक्षणीय वैशिष्ठ्य आहे.

## योगदर्शन –

योग ही अशी जीवनशैली आहे की जी तुम्हाला संपूर्ण शारीरिक, नैतिक, मानसिक आणि अध्यात्मिक आरोग्य देते. योग म्हणजे केवळ हातापायांची आसने नव्हेत. ती एक संपूर्ण जीवनपद्धती आहे.

अष्टांगयोग – यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी हा अष्टांग योगमार्ग होय.

ऋषी पतंजलींनी त्यांच्या अष्टांग योग साधनेत या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून एक तत्वप्रणालीच आपल्यापुढे ठेवली आहे. आपण योग म्हणजे आसने व प्राणायाम एवढेच गृहीत धरतो. योग म्हणजे व्यायामाचा जणू एक प्रकार आहे असे आपण समजतो ते चुकीचे आहे.

ऋषी पतंजलींनी अष्टांगयोग सांगितला आहे. ती आठ अंगे या प्रमाणे.

१) **यम** – समाजात पाळावयाचे नियम. ते पाच आहेत. अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह (अनावश्यक वस्तूंचा संग्रह करणे).

२) **नियम** – व्यक्तिगत स्वास्थ्यासाठी पाळावयाचे नियम. शौच (शुचिता), संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वर प्रणिधान (सर्व समर्थ शक्तींपुढे लीन होणे).

३) **आसन** – शरीराची विशिष्ठ स्थिती.

४) **प्राणायाम** – लयबद्ध नियंत्रण केलेला श्वासोश्वास.

५) **प्रत्याहार** – मनाला मुक्त करणे.

६) **धारणा** – चित्त एकाग्र करणे.

७) **ध्यान** – एकाच विषयाचे सतत चिंतन करणे.

८) **समाधी** – परमात्म्याशी एकरूपता.

## पूर्वमीमांसा दर्शन –

मीमांसा म्हणजे सखोल जिज्ञासा होय. वेदविहीत कर्माचा अन्वयार्थ लावण्यासाठी ज्या सैधान्तिक चर्चा झाल्या त्यांना मीमांसा असे नाव प्राप्त झाले. त्यामुळे पूर्वमीमांसा हीनुसती कर्ममीमांसा नसून तत्त्व प्रणाली बनली.

पूर्वमीमांसेचा प्रमुख उद्देश धर्माची व्याख्या सांगणे आणि वेदाने प्रतिपादित केलेल्या कर्माचा अर्थ आणि त्यानुसार आचार सांगणे हाच आहे. तात्पर्य, शास्त्रांविषयी निष्ठा निर्माण करून अधर्माची निवृत्ती आणि धर्माची प्रवृत्ती करणे हेच पूर्णमीमांसा दर्शनाचे उद्दिष्ट आहे.

## उत्तरमीमांसा दर्शन –

भारतीय आस्तिक षट्दर्शनापैकी एक प्रमुख दर्शन. अंतिम भाग उपनिषदाचा आहे. या उपनिषदरूपी भागाला उत्तरमीमांसा आहे असे म्हणतात. महर्षी वेदव्यासाने उत्तरमीमांसेची रचना केली आहे. यालाच ब्रह्मसूत्रे म्हणतात. परब्रह्माची जिज्ञासा आणि लक्षण हेच उत्तरमीमांसेचे प्रमुख सूत्र होय. पूर्वमीमांसेत कर्मकांड आहे तर उत्तरमीमांसेत उपासना आणि ज्ञानकांड आहे. यालाच वेदान्त दर्शन असेही म्हटले आहे.

पूर्वमीमांसेचा प्रारंभ 'अथातो धर्मजिज्ञासा' असा आहे,

तर उत्तरमीमांसेचा 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' आहे.

पूर्वमीमांसेत धर्मासाठी असलेली आवश्यक कर्मे (कर्मकांड) आहेत. तर उत्तरमीमांसेत शुद्ध उपासना व परब्रह्माचे विरूपण आहे. आत्मोन्नतीसाठी दोन्ही आवश्यक आहेत.

# यज्ञ

वेदांमध्ये यज्ञाला फार महत्व आहे.

यज्ञात अर्पण केलेला हवि जलाची उत्पत्ती करतो, जल वनस्पतींना आणि वनस्पती अग्नीला उत्पन्न करतात. म्हणून अग्नीला जलाचा नातू असे संबोधण्यात येते. तो अग्नी, मित्र, वरुण आणि जलासाठी यज्ञ संपन्न करो.

यज्ञ का करायचे – देवांची स्तुती करून, त्यांना यज्ञात त्यांच्या आवडत्या गोष्टींची आहुती देऊन, प्रसन्न करून घेऊन त्यांच्याकडून पुढील गोष्टी साध्य करायच्या.

धन, ऐश्वर्य, अन्न, सर्व उपभोग्य वस्तू, तेज, सौभाग्य, दीर्घायुष्य, गोधन, निवासस्थानाचे संरक्षण, पुत्र-पौत्रादि संपत्ती, संकटांचा नाश, शत्रूंचा नाश, पापे नष्ट करणे, सर्व तऱ्हेच्या रोगांना दूर ठेवणे,

**ऋत्विज** : यजमानासाठी यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या ब्राह्मणास ऋत्विज म्हणतात.

‘**होता**’ : हा ऋग्वेदाचा ऋत्विज. ‘होत्या’चे काम म्हणजे ऋचा म्हणून देवतांना आवाहन करणे,

‘**अध्वर्यू**’ : हा यजुर्वेदाचा ऋत्विज. यज्ञातील बहुतेक क्रियांची व विशेषतः आहुती टाकण्याची जबाबदारी अध्वर्यूवरअसते.

‘**उद्गाता**’ : हा सामवेदाचा ऋत्विज. उद्गात्याचे काम म्हणजे सामगायन करून देवतांची स्तुती करणे

‘**ब्रह्मा**’ हा अथर्ववेदाचा ऋत्विजहोय. ब्रह्मा हा प्रमुख ऋत्विज असल्यामुळे त्याला चारही वेदांचे ज्ञान अपेक्षित असते. ब्रह्माचे काम सर्व ऋत्विजांच्या कामावर नजर ठेवून अनुष्ठानात काही चूक राहणार नाही हे पाहणे असे असते.

**सोमयज्ञ** म्हणजे सोम वनस्पतीच्या रसाची आहुती ज्यात इंद्रादी देवांनामिळतेअसा यज्ञ होय

**अग्नी** : यज्ञ दोन प्रकारचे असतात. श्रौत व गृह्य. यज्ञामध्ये अग्नीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. अग्नी तयार करण्यासाठी अग्निमंथन केले जाई. शमी वा पिंपळयांच्या लाकडापासून अरणी तयार करतात.

खालची व वरची अशा दोन फळ्या तयार करून त्यांना मधोमध खाचा पाडतात. वरच्या फळीस उत्तरारणी व खालच्या फळीस अधरारणी म्हणतात. वरच्या फळीच्या खाचेखाली घुसळण्याचा दांडू दाबून धरून खालच्या फळीच्या खाचीत दाबायचा व दोरीने घुसळावयाचा; या घर्षणाने अग्नी निर्माण होतो. हा अग्नी प्रज्वलित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पळस वगैरे यज्ञवृक्षांच्या बारीक फांद्यांच्या तुकड्यांना समिधा म्हणत.

देवता, मंत्रवद्रव्यत्याग : यज्ञामध्येअग्नी, इंद्र, वरुण, मित्र, अर्यमा, सविता इ. देवतांना उद्देशून हविर्द्रव्यांचा मंत्रपूर्वक त्याग केला जातो. म्हणूनच द्रव्य, देवता व द्रव्यत्याग हे यज्ञाचे तीन प्रमुख घटक होत. यज्ञातील सर्व कर्मे समंत्रकच करावयाची असतात. त्याचवेळी यजमान देवतेला उद्देशून ('न मम') 'हे माझे

नाही’ असे म्हणून हविर्द्रव्यावरील आपले स्वत्व सोडतो. स्वत्व सोडून देण्याच्या याक्रियेला त्याग असे म्हटले जाते.

म्हणूनच याग म्हणजे देवतेला उद्देशून केलेला द्रव्यत्याग, अशी व्याख्या करण्यात आली आहे. देवतेसाठी ज्याचा त्याग केला जात आहे, त्या द्रव्याचा अग्नीमध्ये प्रत्यक्ष प्रक्षेप (टाकणे) म्हणजे होम होय. त्या त्यागास ‘याग’ म्हणतात.

**हविर्द्रव्ये**: यज्ञांमध्ये विविधप्रकारच्या द्रव्यांची आहुती दिली जाते. अग्नीमध्ये द्रव्य अर्पण करणे म्हणजे आहुती देणे होय. सातूच्या वा तांदळाच्या वाटलेल्या पिठात कढत पाणी घालून तयार केलेला गोळा खापराच्या तुकड्यावर ठेवून भाजला असता ‘पुरोडाश’ नावाचे हविर्द्रव्य बनते. तांदूळ, सातू वगैरे शिजवून तयार केलेला भात म्हणजे ‘चरू’ होय. ‘आज्य’ म्हणजे तूप होय.

पशुयागामध्ये पशू मारून त्याच्या अवयवांची आहुती दिली जाते. हा पशू बांधण्यासाठी रोवलेल्या खांबाला ‘यूप’ असे म्हणतात. यज्ञातील ही हिंसा तत्त्वतः हिंसा नसून अहिंसाच होय, असे मनु इ. स्मृतिकार मानतात.

(प्राचीनकाळी जेव्हा सर्वच लोक मांस भक्षण करीत, त्याकाळी देवालाही मांस समर्पण करणे ही गोष्ट निषिद्ध नव्हती. आपल्याजवळ जे असेल व आपल्याला जे आवडते ते इष्ट देवतेला अर्पण करणे, समर्पण करणे हीच यज्ञाची मूळ कल्पना आहे.)

विशिष्ट पद्धतीने विधिपूर्वक सोमवल्ली कुटून काढलेला रस हेही एक महत्त्वाचे हविर्द्रव्य होय. कोणत्या वनस्पतीला सोमवल्ली म्हटले जात होते, याचे निश्चित ज्ञान सध्या उपलब्ध नाही. अध्वर्यू चमस नावाच्या पात्रातून सोमरसाची आहुती देतो.

ऋत्विजांना हुत शेष भक्षणाचा म्हणजेच आहुती देऊन उरलेल्या द्रव्याच्या भक्षणाचा अधिकार असतो. ही हविर्द्रव्ये देवतांना पोहोचविण्याचे काम अग्नी करीत असल्यामुळे अग्नीला हुतवह म्हणतात.

अग्नी देवतांना यज्ञभूमीत बोलावून आणतो. त्याच्याद्वारा देवता आहुतीचा स्वीकार करण्यासाठी अग्निकुंडाच्या जवळ उपस्थित होतात; म्हणून अग्नीस देवदूत म्हणतात. अग्निद्वारा देवता उपस्थित होतात अशी यजमानाची श्रद्धा असते.

**यज्ञीयउपकरणे** : यज्ञांमध्ये विविध प्रकारची उपकरणे वापरली जात.त्यांपैकी बहुतांश उपकरणे लाकडाची बनविलीजात.मातीचीभाजलेलीखापरे, शूर्प (सूप), वेदी मोजण्यासाठी शम्या नावाचा दांडा, कृष्णाजिन, यज्ञाच्या रक्षणासाठी स्फ्य नावाचे तलवारी सारखे लाकडी आयुध, यज्ञीय पशू बांधण्यासाठी यूप (खांब), पशूचे अवयव कापण्यासाठी स्वधिती नावाची सुरी, यजमानाला अंग खाजविण्यासाठी लागणारे हरणाचे शिंग, अग्नीला वारा घालण्यासाठी लागणारे धवित्र नावाचे पंखे, सोम कुटण्यासाठी लागणारा अधिषवणफलक, देवतांसाठी सोमरस ठेवण्याची ‘ग्रह’पात्रे, ऋत्विजांना सोमरस पिण्यासाठी लागणारे चमस नावाचे प्याले, सोम ठेवण्यासाठी वापरली जाणारी ‘राजासंदी’ नावाची घडवंची इ. प्रकारची उपकरणे यज्ञामध्ये आवश्यक असत.

**यज्ञाचेप्रकार** : विशिष्ट फलाच्या इच्छेने देवतेसाठी अग्नीमध्ये समंत्रक आहुती अर्पण करण्यासारख्या काही गोष्टी सर्वच यज्ञांना समान असल्या तरी कोणत्या फळाची इच्छा आहे, कोणत्या द्रव्याची आहुती दिली जाते, यजमान कोणत्या शाखेचा आहे इ. कारणांवरून यज्ञांच्या अनुष्ठानात फरक पडतो. त्यामुळे यज्ञांचे अनेक प्रकार करण्यात आले आहेत.

श्रुतींनी (वेदांनी) सांगितलेले ते श्रौत, व स्मृतींनी सांगितलेले ते स्मार्त, असे यज्ञाचे दोन प्रकार मानण्यात आले आहेत. परंपरागत दृष्टीने यज्ञसंस्थाही मूलतः श्रौत असल्यामुळे श्रौतयज्ञ हेच मूळचे यज्ञ होत. देवतेला द्रव्य अर्पण करणे हे यज्ञाचे लक्षण असल्यामुळेच स्मार्तयज्ञांना यज्ञ हे नाव प्राप्त झाले आहे.

श्रौतयज्ञांचे इष्टी, पशुयाग व सोमयाग असे तीन प्रकार आहेत. इष्टीमध्ये पुरोडाश, आज्य इ. हविर्द्रव्ये असतात. पशुयागात इष्टीतील द्रव्ये अधिक पशू आणि सोमयागात इष्टी व पशुयागातील द्रव्ये, अधिक सोमरस अशी हविर्द्रव्ये असतात. अग्निहोत्र हा नित्य, नवीन धान्य तयार झाल्याच्या निमित्ताने केला

जाणारा आग्रयणेष्टी हा नैमित्तिक, तर पुत्र प्राप्त व्हावा या इच्छेने केला जाणारा पुत्रकामेष्टी हा काम्ययज्ञ होय.

व्यवसायांना चालना: विविध यज्ञांतून वेगवेगळया व्यवसायांशी संबद्ध असलेली कामे करावी लागत आणि त्यामुळे अनेक व्यवसायांच्या व शास्त्रांच्या विकासाला चालना मिळाली. अग्निचयनापूर्वी जमीन नांगरावी लागत असल्यामुळे कृषिकर्माशी संबंध येई. चातुर्मास्य यागात यजमानाला विशिष्ट पद्धतीने केशकर्तन करावे लागत असे. शमिता म्हटला जाणारा माणूस पशूला बुकलून मारण्याचे व त्याचे अवयव कापण्याचे काम करीत असे. सोत्रामणी नावाच्या यज्ञात आहुती देण्यासाठी सुरा तयार केली जात असे.

आहुतीसाठी पुरोडाश, चरू वगैरे द्रव्येही तयार करावी लागत. घडवंचा, मुसळ वगैरेंमुळे सुतार कामाशी, नांगराचा फाळ, सुरी वगैरेंमुळे लोहारकामाशी; वस्त्रांमुळे कोष्टीकामाशी; विटा वगैरेंमुळे कुंभार व गवंडीकाम याच्याशी; तर हरणाच्या कातड्याचे जोडे वगैरें मुळे चर्मकाराच्या कामाशी संबंध येत असे.

याखेरीज सोम कुटणे, शिवणकाम, पशुपालन, दळण-कांडण, दोऱ्या वळणे, गवत कापणे, लाकडे तोडणे, खड्डे करणे इ. प्रकारची अनेक कामे यज्ञांमध्ये करावी लागत.

मनोरंजन: बहुतेक सर्व इंद्रिये रिझविण्याची साधने यज्ञसंस्थेत होती, असे ज्ञानकोशकारांनी म्हटले आहे. त्यामुळे सामान्य लोकांनाही यज्ञाचे आकर्षण वाटू शकत होते. सोमयागासारख्या मोठ्या यज्ञांत सामगायन आवश्यक असते. सामगायक म्हणजे उद्गाता. त्याच्या गाण्याचे आकर्षण सामान्य लोकांना विशेष असे. अश्वमेधात पारिप्लवाख्याने असत.

महाव्रतात डोक्यावर पाण्याच्या घागरी घेतलेल्या दासींचे नृत्य असे. वाजपेय यज्ञात १७ रथांची शर्यत असे आणि त्यावेळी १७ चौघडे वाजवले जात.

वेगवेगळया यज्ञांतून इतरही वाद्ये वाजवली जात. वाजपेययज्ञात विशिष्ट रथचक्रावर बसलेल्या ब्रह्म्याला गरगर फिरविले जाई.

साळुंखे, आ.ह. (विश्वकोश)

# पुराणे

**पुराणे व उपपुराणे** : हिंदूंचे विशिष्ट धार्मिक ग्रंथ. या ग्रंथाचे 'महापुराणे' व 'उपपुराणे' असे दोन प्रकार आहेत.

पुराणांची संख्या : त्यांची नावे बहुतेक सर्व महापुराणांतून आढळतात. ती पुढीलप्रमाणे : ब्रह्म, पद्म, विष्णू, वायु, भागवत, नारदीय, मार्कंडेय, अग्नि, भविष्य, ब्रह्मवैवर्त, वराह, लिंग, स्कंद, वामन, कुर्म, मत्स्य, गरुड व ब्रह्मांड. काही पुराणांतून वायूपुराणाऐवजी शिवपुराण आणि भागवतपुराणाऐवजी देवी-भागवत ही नावे आढळतात. भागवताला वैष्णव भागवत असेही नाव आहे.

पुराण संज्ञेचा अर्थ : 'पुराण' या शब्दाचा वाच्यार्थ प्राचीन असा आहे.

**पुराणांची निर्मिती व विकास** : भागवतानुसार ब्रह्मदेवाने एकेका मुखाने एक-एक वेद निर्माण केला आणि नंतर एकदम चारही मुखांनी इतिहास-पुराणांची निर्मिती केली.

(ईश्वराच्या वा यज्ञातील) उच्छीष्टापासून चार वेद व देव यांच्यासह पुराणांची निर्मिती झाली, असे अथर्व-वेदात म्हटले आहे. पुराणसंहितांच्या निर्मितीचे श्रेय व्यासांना देण्याची परंपरा अत्यंत प्रसिद्ध आहे. गोपथ ब्राह्मणात सर्पवेद ,पिशाचवेद, असुरवेद, इतिहासवेद व पुराणवेद यांच्या निर्मितीची चर्चा आहे. शतपथ ब्राह्मण व आश्वलायनगृह्यसूत्रांत पुराणांचा समावेश 'स्वाध्याया' त केलेला आहे.

व्यास हे एका व्यक्तीचे नाव नसून ते पदाधिकाऱ्याचे नाव आहे, असेही काहीजण मानतात.

बदलत्या काळानुसार आणि स्थानिक, सांप्रदायिक व धार्मिक गरजेनुसार पुराणांच्या स्वरूपात बदल होत गेले. त्यांचे स्वरूप वेदांप्रमाणे अपरिवर्तनीय राहिले नाही. त्यांच्या संहितांतील काही भाग गाळले गेले, तर काही भाग त्यात नव्याने घुसडण्यात आले.

**पुराणांचा काळ** : पुराणसंहिता कालानुसार सदैव बदलत गेल्यामुळे त्यांचा काळ निश्चितपणे सांगता येत नाही. त्यांतील काही अंश वेदपूर्वकाळापासून चालत आले आहेत, तर काही अंश इंग्रजांच्या अमदानीतही घुसडलेले आहेत.

**पुराणांचे विषय** : कालक्रमानुसार पुराणांचे विषय सदैव बदलत गेले आहेत. पुराणांच्या संहिता तयार होण्यापूर्वी लोकसाहित्याच्या स्वरूपातील पुराणात प्रामुख्याने प्राचीन आख्याने होती. व्यासांनी आख्याने, उपाख्याने, गाथा व कल्पशुद्धी या विषयांच्या आधारे पुराणसंहिता तयार केल्या. आख्यान व उपाख्यान ही दोन्ही कथानकेच असतात. स्वतः पाहिलेल्या घटनेचे वर्णन हे आख्यान व ऐकलेल्या घटनेचे वर्णन हे उपाख्यान असे एक मत असून, दुसऱ्या एका मतानुसार आख्यान हे आकाराने मोठे आणि उपाख्यान छोटे असते. ज्यांचा कर्ता कोण आहे, हे माहीत नाही, अशी जी अनेक परंपरागत व लोकप्रसिद्ध पद्ये व गीते वैदिक वाङ्मयात व पुराणांत आढळतात, त्यांना गाथा म्हणतात. त्यांत प्रसिद्ध राजांच्या पराक्रमांची आणि दानांची वर्णने असतात.

ब्रह्मा, विष्णू वा शिव यांना विश्वनिर्माता मानणाऱ्या विविध कथा पुराणांत आहेत.

पुराणांनी प्रतिसर्गाचे वर्णन करताना नैमित्तिक, प्राकृत, नित्य व आत्यन्तिक असा चार प्रकारचा प्रलय सांगितलेला आहे. ब्रह्मदेवाचा दिवस संपला की नैमित्तिक, त्याचे आयुष्य संपले की प्राकृत, पदार्थांत प्रतिक्षणी होणारे परिवर्तन म्हणजे नित्य आणि अज्ञानाचा नाश झाल्याबरोबर आत्यन्तिक असे ते चार प्रलय आहेत.

वंश व वंश्यानुचरित हे पुराणांचे दोन महत्त्वाचे विषय होत. विशेषतः क्षत्रियवंश व त्या वंशातील राजांच्या चरित्रांची वर्णने, हे या विभागाचे वैशिष्ट्य होय. ही वर्णने म्हणजे प्राचीन भारताच्या इतिहासाची मांडणी करण्यासाठी खात्रीलायक नसला, तरी एक महत्त्वाचा पुरावा आहे. मत्स्य, वायू, ब्रह्मांड, विष्णू, भागवत, गरुड आणि भविष्य या सात पुराणांतून राजवंशाची माहिती आहे.

वर्तमान हिंदू धर्माचे स्वरूप प्रामुख्याने पुराणाधिष्ठित असून, हिंदू धर्माला अंगभूत असलेल्या अंसख्य तात्त्विक व व्यावहारिक संकल्पना पुराणांनी विशद केल्या आहेत.

त्यांनी वैदिक धर्मातील यज्ञादींचे महत्त्व कमी करून हिंदू धर्माला एक नवे वळण देण्याचे काम केले. वैदिक मंत्रांच्या बरोबरीने पौराणिक मंत्र वापरले जाऊ लागले. देवपूजा, राज्याभिषेक, मूर्तिस्थापना इ. बाबतींत पौराणिक पद्धत पुढे आली. पुराणांनी पुण्यप्राप्तीचे अनेक सोपे मार्ग दाखविले. त्यांनी विविध प्रकारची व्रते व उपासना सांगितल्या. उपवासांचे महत्त्व वाढवले.

तीर्थक्षेत्रांच्या महिमा सांगणारी स्वतंत्र माहात्म्ये अनेक पुराणांतून आहेत. तीर्थयात्रा व तीर्थस्नान यांचे महत्त्व वाढले. भक्तिचे माहात्म्यही पुराणांनी वाढविले. भक्तीचे लौकिकी, वैदिकी व आध्यत्मिकी; मानसी, वाचिकी व कायिकी आणि सात्त्विकी, राजसी व तामसी इ. विविध प्रकार करण्यात आले. जप, नामस्मरण, मूर्तिपूजा, मंदिराची निर्मिती इत्यादींना पुराणांकडून प्रोत्साहन मिळाले. पूर्तधर्म म्हणजेच तलाव, विहिरी, धर्मशाळा, अन्नछत्रे इ.निर्माण करून परोपकार करणे, हे पुण्यकारक असल्याचे त्यांनी सांगितले. दान-विशेषतः अन्नदान- हे अत्यंत पुण्यकारक मानून त्याचे महत्त्व वाढवले.

श्राध्दांची आणि त्या वेळच्या अन्नदानांची वर्णने करण्यात आली. धर्म, अर्थ, काम व मोक्ष या पुरुषार्थांचे विवेचन केले. चार वर्ण व चार आश्रम यांच्या कर्तव्यांची चर्चा केली. निष्काम कर्मयोगाचेही महत्त्व सांगितले. ईश्वरी अवतारांचे वर्णन हा पुराणांचा एक महत्त्वाचा विषय आहे. विष्णूचे दहा अवतार प्रसिद्धच आहेत.

पुराणांचे विषय धर्मशास्त्रापुरतेही मर्यादित राहिले नाहीत. नारद, गरुड, अग्नि व विष्णूधर्मोत्तर यांसारखी काही पुराणे व उपपुराणे ही विश्वकोशात्मक व सर्वस्पर्शी बनली आहेत. राजधर्म, काव्यशास्त्र, छंदःशास्त्र, व्याकरण, आयुर्वेद, पशुवैद्यक, वृक्षायुर्वेद, धनुर्वेद, धातुशास्त्र, रत्नविद्या, शिल्पशास्त्र, नृत्यसंगीतादी कला, वास्तुशास्त्र, मूर्तिशास्त्र, ज्योतिष, गणित, सामुद्रिकशास्त्र इ. विषयांची चर्चा अनेक पुराणांनी केली आहे. अनुलेपनविद्या (पायाला लेप लावल्यावर अर्ध्या दिवसात हजारो योजन चालू शकण्याची विद्या), वशीकरणविद्या, अंतर्धानविद्या, धन कमी पडू न देणारी पद्मिनीविद्या,

स्वेच्छारूपधारिणीविद्या, परकायाप्रवेश, त्रैलोक्यविजयविद्या इ.विविध विद्यांची माहिती अनेक पुराणांतून आली आहे.

ब्रह्मांडरचना व भूगोल हाही पुराणांचा एक महत्त्वाचा विषय आहे. ब्रह्मांडात १४ भुवने असून त्यांपैकी पृथ्वीच्या वर सहा व खाली सात भुवने आहेत, अशी कल्पना होती. खालच्या भुवनांना पाताळ म्हणतात. त्याखेरिज स्वर्ग, नरक, ब्रह्मलोक, पितृलोक इत्यादींची वर्णनेही आढळतात.

तत्त्वतः पुराण आणि इतिहास हे वाङ्मयप्रकार भिन्न दिसत असले, तरी त्यांतील भेद स्पष्ट नव्हता. प्राचीन ग्रंथांतून अनेकदा इतिहासपुराण म्हणजे पाचवा वेद इ. प्रकारे दोहोंचा उल्लेख एकत्रितपणे केलेला आहे. 'इतिहास म्हणजे पुरावृत्त' (पूर्वी घडलेले) आणि 'पुराण म्हणजे पुरावृत्त' या व्याख्याही दोन्हींचे ऐक्य दाखवतात. स्वतःला इतिहास म्हणवून घेणाऱ्या महाभारताने स्वतःला पुराण असेही म्हटले आहे आणि पुराण असलेल्या वायुपुराणाने स्वतःला इतिहास असेही म्हटले आहे.

त्यांखेरीज इतर अनेक ग्रंथांशी पुराणांचा संबंध होता. महाभारत, काही स्मृती व काही पुराणे यांनी श्लोकांच्या बाबतीत परस्परांची उसनवारी केल्याचे आढळते. रामायण व महाभारत यांचा बराचसा भाग पुराणांसारखा असून हरिवंश तर पुराणच मानले गेले आहे. कालिदास, बाणभट्ट इत्यादींच्या काव्यग्रंथांचा व पुराणांचा कल्पनांची देवघेव करण्याच्या दृष्टीने संबंध आलेला आहे.

**पुराणांचे महत्त्व व कार्य** : पुराणे ही वेदांप्रमाणेच अपौरुषेय व अनादी आहेत, पुराणांची उत्पत्ती दैवी आहे; वेदांपेक्षा पुराणे श्रेष्ठ आहेत; पुराण हा वेदांचा आत्माआहे; श्रुतिस्मृती हे डोळे असले, तर पुराण हे हृदय आहे; पुराण ऐकणाऱ्या व्यक्तीची सर्व पापे नष्ट होतात इ. प्रकारे पुराणांची स्तुती करण्यात आली आहे. शुक्राचे मुख असलेल्या व्यक्तीच्या स्वरूपात पुराणांचे मानवीकरण करण्यात आले आहे होते. पुराण वाचणाऱ्या व्यक्तीला पुराणिक वा पौराणिक म्हटले जाई. पुराणिकाने मंदिरात भक्तांपुढे पुराण वाचण्याची प्रथा भारतात शेकडो वर्षांपासून चालू आहे.

सध्याच्या मूर्तिपूजक हिंदू धर्माचे स्वरूप प्रामुख्याने पुराणांवरच आधारलेले आहे. याज्ञवल्क्यस्मृतीने पुराणांची १४ विद्यांमध्ये, तर शुक्रनीतीने ३२ विद्यांमध्ये गणना केली आहे. भारतीय राजांचा इतिहास जाणून घेण्याच्या दृष्टीने पुराणांतील वंशवर्णने अत्यंत उपयुक्त आहेत. बहुजनसमाजापर्यंत धर्माचे ज्ञान पोहोचविण्याची मोठी कामगिरी पुराणांनी पार पाडली आहे. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रभाव वाढवला, स्त्री-शुद्रांनाही मोक्षाचा मार्ग खुला केला, बौद्धधर्माकडे वळलेल्या लोकांना परत हिंदू धर्मात आणले, जैनधर्माचा प्रभाव कमी केला आणि तीर्थयात्रा, दान, व्रते, जप इत्यादींचे महत्त्व वाढवून हिंदू धर्माचे सध्याचे स्वरूप सिद्ध केले, ही त्यांची कार्ये ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची आहेत. त्यांचे स्वरूप पंथीय असूनही त्यांनी पंथद्वेष न वाढवता समन्वयवादी दृष्टी जोपासली हेही एक वैशिष्ट्य होय.

# अठरा पुराणांची महत्त्वाची वैशिष्ट्ये:

**ब्रह्मपुराण** : ब्रह्मदेवाने दक्षाला सांगितल्यामुळे ब्रह्मपुराण म्हटले जाणारे हे पुराण पुराणांच्या यादीत पहिले असल्यामुळे त्याला 'आदिपुराण' म्हटले जाते. त्यात सूर्योपासना वर्णिलेली असल्यामुळे त्याला सौरपुराण असेही म्हणतात.

**पद्मपुराण** : या पुराणात ब्रह्मदेवाने पद्मातून विश्वनिर्मिती केल्याची कथा असल्यामुळे त्याला पद्म हे नाव मिळाले असून ते वैष्णवपुराणांत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

कालिदासाचे शांकुंतल हे नाटक या पुराणातील शाकुंतल उपाख्यानावर आधारलेले आहे, असे मानले जाते. पद्मपुराण या नावाची दोन जैन पुराणेही आढळतात.

**विष्णूपुराण** : विष्णूभक्तिला प्राधान्य दिल्यामुळे विष्णूचे नाव प्राप्त झालेले हे पुराण भागवतपुराणाखालोखाल महत्त्वाचे असून वैष्णवदर्शनांचा आधार मानले जाते. राक्षसांचा पूर्वज पुलस्त्य याच्या वरदानामुळे पराशराने हे पुराण रचले, असे म्हटले आहे.

**वायूपुराण** : वायूने सांगितल्यामुळे वायुपुराण म्हटले जाते. यात शिवचरित्राचे विस्तृत वर्णन असून भौगोलिक वर्णनांसाठीही हे पुराण प्रसिद्ध आहे.

**भागवतपुराण** : भागवतधर्माचे विवेचन करणारे आणि सर्वश्रेष्ठ मानले जाणारे हे पुराण अत्यंत लोकप्रिय आहे. ते व्यासांनी आपला पुत्र शुक याला सांगितले, असे म्हटले जाते.

**नारदीयपुराण** :नारदीय पुराण, नारदपुराण आणि बृहन्नारदीयपुराण अशी समान नावांची तीन पुराणे आढळतात. यात नारदाने विष्णूभक्तीचे वर्णन केले, म्हणून हे नारदीय पुराण होय. यात अनेक विषय आलेले असल्यामुळे त्याचे स्वरूप बरेचसे विश्वकोशात्मक झाले आहे.

**मार्कंडेयपुराण** : मार्कंडेय ऋषींनी सांगितल्यामुळे त्यांचे नाव प्राप्त झाले. यात द्रौपदीचे पंचपतित्व, तिच्या अल्पवयीन मुलांची हत्या इ. प्रश्नांची चर्चा असून हरिश्चंद्र ब्रह्मवादिनी मदालसा, कृष्ण, मार्कंडेय इत्यादींच्या कथा आहेत. अग्नि,सूर्य, देवी इत्यादींची स्तोत्रे असून 'दुर्गासप्तशती' या नावाने विख्यात असलेले देवीमाहात्म्य १३ अध्यायांत वर्णिलेले आहे.

**अग्निपुराण** : अग्नीने वसिष्ठांना सांगितल्यामुळे अग्नीचे नाव प्राप्त झाले. या पुराणात पंचलक्षणे आढळत असली, तरी परा व अपरा विद्यांचे वर्णनच महत्त्वाचे आहे. रामायण व महाभारताचे सार, बुद्धावतारासह इतर अवतार इ.विषयांबरोबरच छंद, व्याकरण, अलंकार, योग, ज्योतिष मंदिरे, मूर्ती, धर्म इत्यादींची शास्त्रे यात वर्णिलेली आहेत. यात गीतासार व यमगीता आलेली असून आयुर्वेद, वृक्ष आणि पशूंचे वैद्यक, रत्नपरीक्षा, धनुर्विद्या, मोहिनी व इतर काही इ. विषयांचे विवेचन आलेले आहेत.

**भविष्यपुराण** : भविष्यकालीन घटनांची व व्यक्तिंची वर्णने करण्याची भूमिका घेतल्यामुळे याला भविष्यपुराण हे नाव मिळाले आहे. यात इंग्रजी अमदानीतील घटनांचीही वर्णने आली आहेत. उदा, व्हिक्टोरिया राणीला यात विकटावती म्हटले आहे, तर रविवारला संडे म्हणतात, असे सांगितले आहे. यात सूर्योपासना विशेषत्वाने आली असून कित्येक घटनांची व राजवंशांची वर्णने ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाची आहेत.

**ब्रह्मवैवर्तपुराण** : कृष्णाने ब्रह्याचे विवरण केल्याचे वर्णन यात असल्यामुळे याला ब्रह्म, प्रकृती, गणेश व कृष्णजन्म अशा चार खंडांत विभागलेल्या या पुराणाचा कृष्णजन्म खंड १३३ अध्यायांचा आहे. यात गणेश हा कृष्णाचा अवतार मानलेला असून उत्तान रासक्रिडा, अनेक माहात्म्ये इ. गोष्टी आढळतात.

**वराहपुराण** : वराहावतारी विष्णूने हे पुराण पृथ्वीला सांगितले अशी समजूत आहे. द्वादशीच्या व्रतासारखी अनेक वैष्णव व्रते यात असून रामानुज संप्रदायाने यातून अनेक वैष्णव अनेक विषय स्वीकारले आहेत. यात मथुरामाहात्म्य, नचिकेत्याने उपाख्यान इ. विषय प्रामुख्याने आले आहेत.

**लिंगपुराण** : शिवाने अग्निलिंगात प्रवेश करून या पुराणाद्वारे मोक्षादींचे विवेचन केले, या समजुतीमुळे याला लिंगपुराण हे नाव मिळाले आहे. यात ब्रह्मांडरुपी लिंगाची उत्पती, लिंगपूजा, शैवव्रते,शिवाचे २८ अवतार, काशीचे वर्णन ,तंत्रविद्या इ.विषय प्रामुख्याने आले असून हा लिंगायतांचा एक प्रमुख धर्मग्रंथ मानला जातो.

**स्कंदपुराण** : स्कंदाने सांगितल्यामुळे त्याचे नाव मिळाले. याच्या सूतसंहितेत ब्रह्मगीता व सूतगीता आहेत, तर रेवाखंडांत सत्यनारायणव्रताची कथा आहे.

**वामनपुराण** : यात वामनावताराचे वर्णन विशेषत्वाने असून पहिल्या श्लोकात वामनालाच नमस्कार केलेला आहे. यात शैव, कालदमन, पाशुपत व कापालिक अशा चार शैव संप्रदायाचे वर्णन असून वैष्णव व पाशूपत शैव या दोहोंना समान महत्त्व दिलेले आहे. यात असुरांच्या कथा असून शिवपार्वतीचे विस्तृत चरित्र आलेले आहे. कालिदासाचे कुमारसंभव व वामनपुराण यांत बरेच साम्य आढळते.

**कूर्मपुराण** : विष्णूने कूर्मावतारात इन्द्रद्युम्न राजाला हे पुराण सांगितले, अशी समजूत आहे. हे शैवपुराण असल्यामुळे शिव व दुर्गा याचे माहात्म्य हेच याचे मुख्य विषय आहेत. यात पाखंड मते दिलेली असून वाममार्गीयांच्या यामलयंत्र या ग्रंथाची माहितीही दिलेली आहे. याच पुराणात 'ईश्वरगीता' व 'व्यासगीता' अशा दोन गीता आलेल्या आहेत.

**मत्स्यपुराण** : विष्णूने मत्स्यरूपाने मनूला सांगितले. दक्षिण भारत, आंध्र प्रदेश, नासिक वा नर्मदातीर या ठिकाणी ते लिहिले गेले असावे, अशी मते आढळतात. स्वल्पमत्स्यपुराण या नावाने याचे एक संक्षिप्त स्वरूपही आढळते. यात वितृवंश, ऋषिवंश, राजवंश, राजधर्म, हिमालय, तीर्थे इ. विषयांचे वर्णन प्रामुख्याने आलेले आहे.

**गरुडपुराण** : विष्णूच्या सांगण्यावरून गरुडाने या पुराणाद्वारे वैष्णव तत्त्वांचे वर्णन केले, म्हणून याला गरुडाचे नाव प्राप्त झाले. याच्या पूर्वखंडात व्याकरण, छंद साहित्य, वैद्यक इ. विषयांची माहिती असल्यामुळे हे विश्वकोशात्मक बनले आहे. याच्या उत्तरखंडाच्या 'प्रेतकल्पा' त औध्र्वदेहिराची माहिती आहे. एखाद्याच्या मृत्यूनंतर दहा दिवसपर्यंत घरी गरुडपुराणाचा पाठ करण्याची प्रथा आहे.

**ब्रह्मांडपुराण** : ब्रह्मांडाची उत्पती आणि विस्तार यांचे वर्णन हा याचा मुख्य विषय असल्यामुळे याला ब्रह्मांड हे नाव मिळाले आहे. हे वायूने व्यासांना सांगितले असल्यामुळे याला वायवीयब्रह्मांडपुराण असेही म्हणतात. गोदावरीच्या उगमाचा प्रदेश वा सह्याद्री हे याचे निर्मितिस्थान असावे, असे दिसते. यात परशुराम व कार्तवीर्य यांचा संघर्ष, ललितादेवीचे आख्यान, क्षत्रियराजवंशाचे वर्णन इ. विषय प्रमुख आहेत. अध्यात्मरामायण हा ग्रंथ आणि ललितासहस्रनाम, सरस्वतीस्तोत्र, गणेशकवच इ. भाग या पुराणातून घेतलेले आहेत.

**उपपुराणे** : १८ महापुराणांहून वेगळी अशी जी पुराणे आहेत, त्यांना उपपुराणे म्हणतात.

निर्मिती : उपपुराणे व्यासांनी रचली, असे मानले जात नाही. १८ पुराणे ऐकून मुनींनी तयार केलेली संक्षिप्त पुराणे म्हणजे उपपुराणे, असे कूर्मपुराणात म्हटले आहे.

संख्या : महापुराणांप्रमाणे उपपुराणांचीही संख्या अठरा मानली जाते. कूर्म, पद्म व देवी भागवत १८ उपपुराणांची नावे दिली आहेत.

कूर्मपुराणाच्या आधारे दिलेली यादी : **आद्य (सनत्कुमारप्रोक्त), नारसिंह, स्कांद (कुमारप्रोक्त), शिवधर्म, दुर्वाससोक्त, नारदीय, कापिल, वामन, उशनसेरित, ब्रह्मांड, वारुण, कालिका, माहेश्वर, सांब, सौर, पराशरोक्त, मारीच, भार्गव.**

काही वेळा एकच पुराण वेगवेगळया. याद्यांत वेगवेगळया नावांनी आलेले दिसते. काही उपपुराणांची व महापुराणांची नावे समानच आहेत. इतर काही उपपुराणांची नावे पुढीलप्रमाणे : विष्णूधर्म,

विष्णूधर्मोत्तर, नंदी, गणेशक, गारुड, प्रमासक, आखेटक, देवी, बार्हस्पत्य, नंदिकेश्वरयुग्म, एकपाद, मृत्यूंजय. कौर्म, मानव, वायवीय, बृहदवैष्णव, आंगिरसक, बृहद्धर्म, लीलावती, बृहन्नाकसिंह, दैव पाद्म, आणू, भास्कर, शौक्र, लघुभागवत, एकाग्र, बृहन्नन्दीश्वर इत्यादी.

**काळ** : सातव्या-आठव्या शतकांत उपपुराणांच्या निर्मितीला प्रारंभ होऊन तेराव्या शतकांपर्यंत वा त्यानंतरही ते काम चालू होते.

**विषय** :सौरपुराणाच्या मते उपपुराणे ही महापुराणांना पुरवणी वजा असल्यामुळे तीही पुराणांप्रमाणेच पंचलक्षण असतात. उपपुराणांचे विषय सामान्यतः महापुराणांशी मिळतेजुळते आहेत.

साळुंखे,आ.ह. (विश्वकोश)

## उपवेद –

**आयुर्वेद**: ज्या शास्त्रात आयुष्याबद्दलचे ज्ञान आहे किंवा ज्याशास्त्राच्या उपयोगाने आयुष्य प्राप्त करून घेता येते ते शास्त्र म्हणजे आयुर्वेद. प्राथमिक स्वरूपाचा आयुर्वेद लिखित स्वरूपात अथर्ववेदात प्रथम दिसतो.चरकसंहिता, सुश्रुतसंहिता व काश्यपसंहिता यांच्यामध्ये त्याला शास्त्रीय स्वरूप प्राप्त झालेले दिसते. नंतर रसतंत्राची त्यात महत्त्वाची भर पडली.

हेतू, लिंग व औषध म्हणजे उपाय हे आयुर्वेदाचे तीन मुख्यविषय. आरोग्याची म्हणजे हितकर आयुष्याची व रोगाची कारणे म्हणजे हेतू; आरोग्याची व रोगाची लक्षणे वा चिन्हे म्हणजे लिंग आणि आरोग्याची व रोगनाश करण्याची साधने म्हणजे औषध वा उपाय. निरोगी व हितकर आयुष्याच्या अध्ययनात तर सर्व सृष्टीचे अध्ययन अंतर्भूत होते.

कारण पांचभौतिक सृष्टीतून मनुष्यशरीर उत्पन्न होते, त्यातच राहते व त्यातच मरते; त्याचा जन्म, स्थिती व मरणरूप संसार विश्वाचाच भाग आहे; हेतु विषयक विचारात जिवंत मानव शरीर व ते शरीर ज्या सृष्टीचे कार्य आहे त्या सृष्टीचा विचारअंतर्भूत होतो.

कारण मानवी जीवनाची परिपोषक व रोगप्रतिकारक साधने व प्रतिकूल कारणे सृष्टीतच असतात व मानवी जीवनाच्या क्रिया प्रतिक्रिया त्यावर अवलंबून असतात. या संदर्भातच करून घ्यावयाचे हितकर व रोगप्रतिकारक आयुष्य व दुर्बल आणि रोगी आयुष्य यांचे विज्ञान म्हणजे आयुर्वेद; इसवी सनापूर्वी हा वेद निर्माण झाला.

हितकर आयुष्य :जो शारीरिक व मानसिक रोगांपासून मुक्त, विशेषतः तारुण्य चिरकालअसणारा, यश, बल, वीर्य व पराक्रम यांनी युक्त असा, इंद्रियांचे अर्थ, उपभोग संभार ज्याला उपलब्ध होऊ शकतात,

ज्याची इंद्रिये विषयांचा उपभोग घेण्यास समर्थ आहेत, ज्याला अनेक विषयांचे पुष्कळ ज्ञान आहे, जो एक महान विद्वान वा कलाकार आहे, सामर्थ्यशाली व मोठे व्यक्तित्त्व ज्यास लाभले आहे व समाजात तसा जो मानला जातो, ज्याला श्रेष्ठ दर्जाचे वैभव प्राप्त झालेले आहे, कोणतेही कार्य करण्याच्या प्रारंभीच त्या कार्याच्या सिद्धीची सामग्रीही ज्याला संपादन करता येते व जो इच्छेप्रमाणे वागू शकतो त्याचे आयुष्य हितकर व सुखी होय. याच्या विरुद्ध ज्या प्रमाणात ज्याची परिस्थिती असते त्या प्रमाणात त्याचे आयुष्य दुःखी असते.

सर्व प्राणिमात्रांचे हित करणारा, दुसऱ्याचे न घेणारा, सत्य बोलणारा, मनोजयी, करावयाचे ते विचारपूर्वक करणारा, गाफिल किंवा बेफिकीर न राहणारा, धर्म, अर्थ, काम यांचे संपादन व सेवन हे परस्परांना अविरोधीपणाने करणारा, पूज्यांची पूजा करणारा, शांत स्वभावाचा, वृद्धांना मान देणारा, प्रेम,

क्रोध, मत्सर, गर्व, गौरव व गती यांवर व्यवस्थित नियंत्रण करणारा, नेहमी नाना प्रकारे दान करणारा, लोकांना नाना प्रकारची मदत करणारा, तपाचरणाने ज्ञान संपादनाचा व इंद्रियजयाचा नेहमी प्रयत्न करणारा, अध्यात्म जाणणारा व त्यात रत होणारा, स्मृती व बुद्धी चांगली असणारा, इह व परलोक यांचा विचार करणारा, याचे आयुष्य हितकर होय.

आयुर्मान: साधारणपणे माणसाचे १०० वर्षे हे आयुर्मान होय. शरीराच्या अवयवाच्या लांबी रुंदी, हालचालीने दिसणारे दृश्य, गूढता, उन्नतता, अवयवरचना, शरीरवाढीचा क्रम, अंगुलींचे प्रमाण, सारासारत्व, प्रकृतिदोष इ. अनेक गोष्टींवरून आयुष्याच्या दीर्घादीर्घत्वाचे प्रमाण आयुर्वेदात सांगितले आहे.

आयुष्य : शरीर, इंद्रिये, मन, आत्मा ह्यांचा संयोग म्हणजे आयुष्य. ह्या संयोगामुळे योग्य वेळी ज्ञानक्रिया चालू राहते. व्यवस्थित चालणारी ज्ञानक्रिया आयुष्यलक्षण होय. आयुर्वेदात आयुष्याला हितकर द्रव्ये व अहितकर द्रव्ये सांगितली आहेत.

आयुर्वेदाचे प्रयोजन: आरोग्यसंपन्न व्यक्तीचे आरोग्य राखणे व रोगी व्यक्तीच्या रोगांचे निर्मूलन करणे हे आयुर्वेदाचे ध्येय आहे.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या शारीर, मानस इ. भावांचे भिषगाकडून परीक्षण करून उत्तम, मध्यम, अल्प यांपैकी आपण ज्या आयुष्य गटात असू त्यापेक्षा दीर्घ आयुष्य लाभावे, मानवाचे जे शंभर वर्षांचे आयुर्मान दिसून येते त्यापेक्षाही अधिक आयुष्य लाभावे, याकरिता सतत प्रयत्न करणे मानवी कर्तव्य होय.

सर्व रोग अनिष्ट आहार, विहार, आचार केले तर त्यामुळे उत्पन्न होत असतात.

शरीर थकणार नाही इतके श्रम मानवाने नियमितपणे केलेच पाहिजेत. ह्या श्रमांनाच 'व्यायाम' असे म्हणतात. दररोज आयुर्वेदोक्त पद्धतीने वाढता व्यायाम घेतल्याने शरीराची मागणी वाढते. स्वस्थवृत्त दिनचर्या व्यायामाने शरीर निर्दोष, निर्मल होऊन शरीराचे धातू म्हणजे घटक उच्च प्रतीचे बनतात.

व्यायामाने अग्नी प्रदीप्त होतो; शरीरातील अग्नी अनेक असतात; शरीरातील प्रत्येक घटक शरीरातून निघून जाईपर्यंत सतत त्या त्या अग्नीने पचत असतो. ह्या पुनः पुनः पचनाने तो अधिकाधिक निर्मल होऊन वरवरच्या दर्जाचा होत राहतो. आहारघटक शरीरघटक बनतात. उत्तम प्रतीचे शरीरघटक बनविण्यास योग्य अशा घटकांचाच आहार घेतला तर पुढचे कार्य व्यवस्थित रीतीने चालते. औषधे आहाराच्या कार्याला मदत करतात. औषधांनी शरीर निर्देश निर्मल करून आहारापासून उत्तरोत्तर उत्तमोत्तम घटक बनावेत म्हणून वयःस्थापनकर अशा औषधांचे नित्य सेवन करावे.

## अष्टांग आयुर्वेद :

(१) कायचिकित्सा म्हणजे साधारण रोगचिकित्सा.

(२) बालरोग आणि स्त्रीरोग यांची चिकित्सा. जरी सर्व सारखे असले तरी मुले आणि स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा काही भिन्न विकार असतात.

(३) शल्यचिकित्सा. शल्य म्हणजे शस्त्रोपकरणे. सर्व विकारांमध्ये औषधांचा उपयोग होत असला तरी काहींमध्ये यंत्र वा शस्त्र यांचा उपयोग रोग काढण्याकरिता करावा लागतो.

(४) शालाक्यचिकित्सा. शलाका म्हणजे सळी. काहींमध्ये सळयांचा उपयोग करावा लागतो.

(५) दंष्ट्रचिकित्सा. दंष्ट्र म्हणजे डसून इजा करणारे प्राणी. बाह्य जीवनसृष्टीतील प्राण्यांचे आक्रमण होऊनच ते होतात. त्यात सर्प, व्याघ्र इ. विषारी हिंसक अशा प्राण्यांचा समावेश होतो.

(६) ग्रहचिकित्सा. ग्रह म्हणजे पकडणारा. भोवतालच्या सृष्टीतल्या वातावरणात संचार करणाऱ्या सूक्ष्म सूक्ष्म जीवांचे (ग्रहांचे, भूतांचे, जंतूंचे) आक्रमण होत असते. हे वरचे ६ चिकित्सा प्रकार, झालेला रोग नाहीसा करण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत.

(७) वय:स्थापन म्हणजे तारुण्य टिकविणे.मानव व त्याची संतती संपन्न व बलवान व दीर्घजीवी होण्याचे दृष्टीने जरेची चिकित्सा वय:स्थापनाने करावयाची असते. त्याकरिता औषधे असतात व त्याकरिता विशिष्ट जीवनपद्धती स्वीकारावी लागते.

(८) वाजीकरण. म्हणजे शुक्रधातू वाढवून वाजी म्हणजे बलवान करण्याकरिता चिकित्सा करावयाची असते. अशी ही आयुर्वेदाची आठ अंगे आहेत.

जोशी, वेणीमाधवशास्त्री (विश्वकोश)

**वेदांगे** : वेदांना पूर्ण प्रमाण आणि पवित्र मानणाऱ्या वैदिकांची अशी श्रद्धा होती, की वेदांतील विधिनिषेधांच्या पालनानेच आपल्या भावी पिढ्यांचे ऐहिक व पारलौकिक कल्याण होईल. त्यामुळे वेदांचे पठण पिढ्यान्‌पिढ्या चालू ठेवून वैदिक साहित्य जिवंत ठेवले गेले. त्याच कारणाने वेदांचे बौद्धिक चिंतन सुरू झाले व त्या चिंतनातून वैदिकांना बौद्धिक ज्ञानाचा पाया घालता आला. त्यातून वेदांगे निर्माण झाली.

**शिक्षा, कल्प, व्याकरण, निरूक्त, छंद आणि ज्योतिष** अशी एकूण सहा वेदांगे आहेत.

**शिक्षा**: वेदमंत्रांचे उच्चारण शुद्ध व अचूक होण्याच्या दृष्टीने ध्वनिशास्त्राचा अभ्यास करून रचण्यात आलेल्या शास्त्रांना `शिक्षा' असे म्हणतात.

**कल्प** : ह्या वेदांगास `कल्पसूत्रे' असेही म्हणतात. कल्पसूत्रांमध्ये श्रोतसूत्रे, शुल्बसूत्रे, गृह्यसूत्रे आणि धर्मसूत्रे ह्यांचा समावेश होतो. संहिता व ब्राह्मणग्रंथ ह्यांतील यज्ञसंस्थेचे सांगोपांग स्वरूप व्यवस्थित, एकत्र आणि विषयवारीने उपलब्ध करण्यासाठी श्रौतसूत्रे निर्माण झाली. काही श्रौतसूत्रांना–उदा., बौधायन, मानव, आपस्तंब व कात्यायन - `शुल्बसूत्र' नावाचा अध्याय जोडलेला असतो. यज्ञकुंड, यज्ञवेदी, यज्ञमंडप तयार करताना घ्यावयाच्या मोजमापांचे गणित शुल्बसूत्रांत सांगितलेले असते. भारतीय भूमितीचे प्राथमिक स्वरूप शुल्बसूत्रांत दिसते. गृह्यसूत्रांत नामकरण, उपनयन, विवाह इ. सोळा संस्कार तसेच श्राद्धे ह्यांचे विधी सांगितले आहेत. आश्वलायन, शाखायन, बौधायन, आपस्तंब, पारस्कर, गोभिल, कौशिक इ. १७ गृह्यसूत्रे आज उपलब्ध आहेत.

**व्याकरण** : वेदमंत्रांतील शब्द अपभ्रष्ट होऊ नयेत, तसेच संधी होऊन शब्दात बदल होत असल्यामुळे मूळ शब्द कसा आहे तो कळावा तसेच अर्थही कळावा ह्यांसाठी वैदिक मंत्रांचा पदपाठ तयार करण्यात आला. तो करताना व्याकरण अगोदरच तयार होते. पदपाठ तयार झाल्यानंतर संस्कृत भाषेत बदल झालेले होते. तेव्हा सबंध शिष्ट संस्कृतचे व्याकरण तयार झाले. अनेक व्याकरणे झाली. त्यांत पाणिनीचे व्याकरण श्रेष्ठ ठरले.

**निरुक्त** : वेदांची भाषा कालांतराने समजणे कठीण जाऊ लागले. त्यामुळे शब्दांची व्युत्पत्ती व अर्थ सांगण्याचे शास्त्र निर्माण झाले. तेच निरुक्त होय. वेदांतील शब्दांचे व धातूंचे संग्रह म्हणजे `निघंटू' वा शब्दकोश. वैदिक समानार्थक व अनेकार्थक पदांचा वा धातूंचा जो सर्वप्राचीन उपलब्ध कोश आहे, त्याला निघंटू असे नाव आहे. ह्या कोशावर यास्काने लिहिलेले भाष्यही निरुक्त ह्या नावाने प्रसिद्ध आहे.

**छंद** : छंद ह्या वेदांगाला `छंदोविचिती' अशीही संज्ञा आहे. वेदांतील बरेच मंत्र छंदोबद्ध असून छंद हे वेदमंत्रांप्रमाणे वेदमंत्रांनी करावयाच्या यज्ञकर्माशीही निगडित आहेत. ब्राह्मणग्रंथांमध्ये छंदाच्या गूढ व अद्भूत सामर्थ्याची वर्णने येतात. पिंगल यांचा छंद: सूत्र हा ग्रंथ ह्या वेदांगाचा प्रतिनिधी मानला जातो.

**ज्योतिष**: वेदकाली ज्योतिष हे सहावे वेदांग तयार झाले होते. सत्तावीस नक्षत्रे, चंद्राच्या अवस्था, सूर्याचे संक्रमण, ऋतूंची परिवर्तने ह्या सर्वांचे पद्धतशीर परिगणन यज्ञाच्या निमित्ताने वैदिक ऋषीला काळजीपूर्वक करावे लागे. श्रौत व गृह्य कर्मांसाठी लागणारे पंचांग वैदिक काळी अस्तित्वात आले. सत्तावीस नक्षत्रांची आकाशातील मांडणी ही प्रथम वेदकाली वैदिकांनी शोधली.

जोशी, लक्ष्मणशास्त्री, (वैदिक संस्कृतीचा विकास)

# रामायण

प्राचीन भारताच्या दोन हजार वर्षांपूर्वी रचलेल्या पहिल्या दोन महाकाव्यांपैकी वाल्मीकि रामायण हे पहिले आहे. दुसरे महाकाव्य महाभारत  होय. कमीतकमी दोन हजार वर्षे भारताच्या राष्ट्रीय, सांस्कृतिक वैभवाला या दोन महाकाव्यांनी शोभा आणली आहे; कारण विविध आकृतिबंध असलेल्या साहित्यसंपदेच्या निर्मितीचे ही दोन महाकाव्ये मूलस्त्रोत बनले आहेत. संस्कृतमधील काव्याच्या अभिजात आकृतिबंधाचा पहिला व उत्कृष्ट नमुना म्हणजे वाल्मीकि रामायण होय. विविध प्रकारच्या अलंकारांच्या सूचकतेतून अभिव्यक्ती, हे अभिजाततेचे लक्षण आहे.

रामायणाचे मुख्य महत्त्व म्हणजे ते उत्कृष्ट काव्य आहे; मुळात तो धर्मग्रंथ नव्हे. धर्मग्रंथ म्हणून हळूहळू बनला. भारतीय आणि विशेषतः संस्कृत काव्यरचनेचा पहिला आदर्श म्हणून त्याला मान्यता मिळाली. वाल्मीकी मुनी हे आदिकवी ठरले.

संस्कृतमधील कालिदासाच्या रघुवंश या महाकाव्याला, भवभूतीच्या उत्तररामचरिताला, संस्कृतमधील आणि अन्य भारतीय भाषांमधील विविध प्रकारच्या साहित्य प्रकारांना रामायण या आदिकाव्याने विषय पुरवला. परंतु या विषयात वारंवार अधिक भर पडत गेली. मूळच्या विषयात अनेक बदलही झाले. संस्कृतमध्ये विसांपेक्षा अधिक रामायणे झाली. अद्‌भुत रामायण, आनंद रामायण, अध्यात्म रामायण, इ. संस्कृत रामायणे हे रामभक्तांचे आणि वैष्णव संप्रदायातील स्त्री पुरुषांचे धार्मिक ग्रंथ होत.

वाल्मीकि रामायणाच्या प्रथम रचनेमध्ये राम हा पराक्रमी व आदर्श माणूस म्हणून वर्णिलेला आहे; परंतु तो कालांतराने विष्णूचा अवतार म्हणून वाल्मीकिरामायणातील प्रक्षिप्त भागात नोंदलेला आढळतो. बाकीची संस्कृत रामायणे, प्रादेशिक लोकभाषांतली रामायणे व नाटकादी साहित्य यांच्यामध्ये राम हा बहुतेक ठिकाणी विष्णूच्या दशावतारांतील सातवा अवतार म्हणूनच मानलेला आहे, हे लक्षात घेऊन अनेक पश्चिमी संस्कृत विद्वानांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे, की जगातील आजपर्यंतच्या साहित्यामध्ये मुळात रसिकांना रंजविणारे एक काव्य म्हणून प्रसिद्ध झालेले काव्य -वाल्मीकिरामायण- हे बिनतोड आहे.

भारतासह अनेक राष्ट्रांतील जनतेच्या जीवनावर आणि विचारांवर इतका खोल प्रभाव पाडणाऱ्या या साहित्यग्रंथासारखा कोणताही दुसरा ग्रंथ जगात नसेल.

वाल्मीकिरामायणाचे बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड आणि उत्तरकांड असे सात भाग आहेत आणि श्लोक चोवीस सहस्त्र आहेत.

रामायणातील मूळ कथेत दोन निरनिराळे भाग एकत्र झालेले दिसतात.

या एकंदर कथानकाच्या मुळाशी भारताच्या इतिहासातील अतिप्राचीन काळी घडलेली संस्कृतिप्रसाराची वास्तव कथा आहे, असे काही पश्चिमी विद्वान मानत होते. मूळच्या आर्यपूर्व भारतामध्ये आर्य संस्कृतीचे व्यापक प्रमाणात आक्रमण रामायण सूचित करते; असे त्यांचे म्हणणे होते.

मूळचे वाल्मीकिप्रणीत रामायण अयोध्याकांडापासून युद्धकांडापर्यंतच असावे, असे सुसंघटितपणा आणि विशिष्ट सुंदर शैली यांवरून निश्चितपणे अनुमानिता येते. बालकांड व उत्तरकांड ही नंतरची भर होय.

मधल्या कांडांतील ठिकठिकाणी पडलेले प्रक्षेप हेही ध्यानात घ्यावे लागतात. या विद्यमान उपलब्ध असलेल्या रामायणाचा सारांश खालीलप्रमाणे.

जोशी, लक्ष्मणशास्त्री (विश्वकोश)

(रामायण कथा आपल्या सगळयांच्याच परिचयाची आहे. त्यामुळे काही भागच पुढे देत आहे.)

नारदमुनी देवलोकी गेल्यानंतर वाल्मीकी तमसा नदीच्या तीरी येतात. तेथे क्रौंच पक्ष्याच्या एका जोडीतील नराला एक पारधी बाण मारतो. त्या पक्ष्याची मादी आक्रोश करू लागते. तो ऐकून वाल्मीकींचे कविहृदय शोकाकुल होते व अगदी सहजस्फूर्तीने एक श्लोक त्यांच्या तोंडून बाहेर पडतो. त्यानंतर ते आश्रमात येतात, तेव्हा प्रत्यक्ष ब्रह्मदेव त्यांच्यापुढे प्रकट होऊन त्यांना सांगतात, की तू रामाचे संपूर्ण चरित्र वर्णन कर.

त्यानंतर वाल्मीकी मुनींनी रचिलेले रामायण सर्वांनी श्रवण करावे, असे सांगितले जाते.

त्यानंतर रामाचा विवाह सीतेशी आणि लक्ष्मणाचा विवाह जनकाचीच दुसरी कन्या उर्मिला हिच्याशी झाला. विश्वामित्रांच्या सांगण्यावरून जनकराजाचा धाकटा भाऊ कुशध्वज याच्या दोन कन्या मांडवी आणि श्रुतकीर्ती ह्या अनुक्रमे भरत आणि शत्रुघ्न ह्यांस दिल्या गेल्या.

दशरथाच्या राजमहालातील अयोध्येच्या राजसिंहासनासंबंधी झालेली कारस्थाने आणि ज्येष्ठ पुत्राला - म्हणजे रामाला वनवासात पाठविल्यामुळे दशरथाचा अंत होणे हा मूळचा भाग.

यातच पुत्रविरहामुळे दशरथाचा मृत्यू ओढवतो; रामाचा सावत्र बंधू भरत सिंहासनाबद्दल विरक्ती दर्शवितो, परंतु रामाचाच प्रतिनिधी म्हणून राज्याच्या प्रशासनाची जबाबदारी स्वीकारतो. हा या पहिल्याच भागातला अखेरचा अंश होय.

दुसरा भाग म्हणजे दंडकारण्यातील आणि एकंदर भारताच्या दक्षिणेतील राम-लक्ष्मणांची शौर्यकथा. त्यात विविध विचित्र सामर्थ्याचे नरभक्षक राक्षस, जटायूसारखे पक्षी, सुग्रीव-वाली-हनुमानासारखे शूर

वानर, जांबुवानासारखी बळकट आणि दणकट अस्वले इ. अनेक शत्रुमित्रांच्या अद्भुत घटनांनी रंगलेला हा दुसरा भाग होय. अखेर लंकेवर स्वारी करून राम सीतेची सुटका करतो.

तथापि राम सीतेच्या चारित्र्याविषयी शंका प्रदर्शित करतो. सीता अग्निदिव्य करते. सीता शुद्ध असल्याची ग्वाही प्रत्यक्ष अग्नीकडून मिळाल्यानंतर राम तिचा स्वीकर करतो. पुष्पक विमानातून राम अयोध्येला परततो. रामाला राज्याभिषेक होतो.

पुढे सीतेला दिवस जातात. राम तिला तिच्या डोहाळ्यांसंबंधी विचारतो, तेव्हा तपोवनात, तपस्व्यांच्या पायांपाशी राहावे, अशी आपली तीव्र इच्छा असल्याचे सीता त्याला सांगते. पुढे सीतेच्या शुद्धीबद्दल लोकपवाद पसरतो. परगृही दीर्घकालपर्यंत एखादी विवाहीत स्त्री राहिली, तरी तिला पतीने शुद्ध मनाने परत घेतली हे चांगले उदाहरण नव्हे. अशा उदाहरणामुळे लोकही असे करायला लागतील, म्हणून लोकांना उदाहरण घालून देण्याकरिता सीतात्याग करण्याचा निर्णय राम घेतो.

सीता शुद्ध आहे, ह्याबद्दल रामाच्या मनात मात्र यत्किंचितही संशय राहिलेला नसतो. तो लक्ष्मणाला आज्ञा करतो, की ‘गंगेच्या पलीकडे, तमसा नदीच्या काठी, वाल्मीकिमुनींचा आश्रम आहे. त्याच्या जवळ असलेल्या निर्मनुष्य प्रदेशात तू सीतेला सोडून ये’. अत्यंत दुःखी मनाने राम ही आज्ञा देतो. सीतेने आपल्याला तपोवनात राहण्याचे डोहाळे लागल्याचे सांगितले होते, हेही त्याला आठवते. त्याचे डोळे अश्रूंनी भरून येतात. ‘तुझ्या इच्छेनुसार राजाने तुला तपोवनात सोडण्यास मला सांगितले आहे,’ एवढेच लक्ष्मण सीतेला सांगतो. सीतेला फार आनंद होतो.

परंतु रथात बसल्यानंतर मात्र तिला अस्वस्थ वाटू लागते. अशुभ चिन्हे जाणवू लागतात. गंगेपलीकडे गेल्यानंतर लक्ष्मणाला सत्य सांगणे भाग पडते. त्या सत्यकथनाचे दुःख लक्ष्मणालाही झेपण्यासारखे नसते. ते कर्म करण्यापेक्षा मरण बरे, असेच त्याला वाटत असते; पण अखेर तो सर्व काही सांगून टाकतो. पण वाल्मीकिमुनींच्या छायेखाली तुला येथे राहता येईल हेही तो तिला सांगतो.

सीता अत्यंत व्यथित होते. माझा देह विधात्याने केवळ दुःखासाठीच निर्माण केला असावा, असे उद्गार तिच्या तोंडून निघतात. आपल्या पतीचा राजवंश नष्ट होऊ नये, एवढ्यासाठीच आपण प्राण देत नाही, हे ती लक्ष्मणास सांगते. रामासाठी ती लक्ष्मणाला असा निरोप देते, की लोकांकडून निंदा होणार नाही, अशाच प्रकारे आपल्या पतीने वागले पाहिजे आणि पतीचे  हित मी प्राणांपेक्षा अधिक मोलाचे मानते. लक्ष्मण गेल्यानंतर सीतेला रडू अनावर होते.

लवकरच वाल्मीकिमुनींची आणि सीतेची भेट होते. ते तिला आश्रय देतात. तेथेच पुढे तिला कुश आणि लव हे दोन जुळे पुत्र होतात. आश्रमातच ते वाढतात. रामाला अश्वमेध यज्ञ करण्याची इच्छा होते. तो यज्ञ चालू असताना वाल्मीकी आपल्या शिष्यगणासह तेथे येतात. लवकुशांना ते रामायण गाण्यास सांगतात. दुसऱ्या दिवशी, प्रभातकाली, लवकुश रामायण गाऊ लागतात. राम ते  ऐकतो. त्या मुलांबद्दल

त्याला कुतूहल उत्पन्न होते. हे आपलेच पुत्र आहेत, हे रामाच्या नंतर लक्षात येते. त्यानंतर राम 'सीतेची इच्छा असल्यास तिने आपल्या शुद्धतेचा प्रत्यय देण्यासाठी येथे यावे', असा निरोप वाल्मीकींकडे देतो.

वाल्मीकी सीतेस घेऊन येतात. राम जनसमुदायासमोर स्पष्ट करतो, की सीता शुद्ध असल्याबद्दल त्याच्या स्वतःच्या मनात आजिबात शंका नाही.

सीतेने आपल्या शुद्धतेचा प्रत्यय पूर्वीच दिलेला आहे; परंतु लोकापवादामुळे सीतात्याग करावा लागला; तेव्हा लोकसमुदायापुढेच सीता शुद्ध आहे, हे सिद्ध व्हावे; पण सीता आपली शुद्धता सिद्ध करण्यासाठी असे म्हणते, की जर मी शुद्ध असेन तर हे पृथ्वीमाते, तू मला पोटात घ्यावेस आणि तसे घडून येते. सारा लोकसमुदाय ते दृश्य पाहून थक्क होतो. राम दुःखी होतो.

लक्ष्मणाने अगदी नाइलाजाने का होईना, पण हा नियमभंगच केलेला असतो. त्यामुळे त्याला शासन करणे रामाला भाग असते. सज्जनांचा त्याग करणे आणि वध करणे ह्या दोन्ही गोष्टी सारख्याच असे मानून राम लक्ष्मणाला ठार न मारता त्याचा त्याग करतो. लक्ष्मण सरयूतीरी जातो. तेथे त्याचे निर्वाण होते. तो स्वर्गात प्रवेश करतो. त्यानंतर कुशलवांना राज्याभिषेक करून राम सर्व निरवानिरव करतो. महाप्रस्थानासाठी निघतो. सर्व बंधू, प्रजाजन, वानर, राक्षस ह्यांसह राम सरयू नदीत प्रवेश करतो. सर्वजण प्राणत्याग करतात. रामासोबत आलेल्या सर्वांना उत्तम गती प्राप्त होते.

कुलकर्णी, अ. र. (विश्वकोश)

## योगवासिष्ठ –

दशरथ राजाने रामाला निरनिराळ्या धार्मिक स्थळांची यात्रा करायला पाठवलेले असते. राम परत आल्यावर राजाच्या लक्षात येते की राम नेहमी सारखा वागत नाही. कसल्यातरी विचारात गढून गेलेला दिसतो. एकाकी असतो, उदास असतो. एके दिवशी राजाच्या दरबारात विश्वामित्र ऋषी येतात व राजाला सांगतात की त्यांना यज्ञात राक्षस फार त्रास देत आहेत. तेंव्हा त्या राक्षसांचा नाश करण्यासाठी राजाने रामाला त्यांच्या बरोबर पाठवावे.

परंतु दशरथ राजा त्याला तयार होत नाही कारण राम अजून लहानच असतो व त्याला असल्या कामाचा अनुभवही नसतो. त्यामुळे कदाचित विश्वामित्र रागावून शाप देण्यापूर्वीच तेथे उपस्थित असलेले वशिष्ठऋषी दशरथाला सांगतात की रामाला विश्वामित्र ऋषींबरोबर जाऊ देत. त्यावेळी राजा दशरथ रामाची मनस्थिती बरोबर नसल्याचे सांगतात.

हे ऐकून वशिष्ठऋषी रामाला बोलावून त्याला काय झाले ते विचारतात. राम सांगतो की त्याला हे जग किती कष्टप्रद आहे याची जाणीव झाली असून जगण्यात काही सारस्य वाटत नाही. हे ऐकून वशिष्ठऋषी राजा दशरथाच्या संमतीने रामाला स्वत:बरोबर घेऊन जातात. त्यानंतर ते स्वत: रामाला जो उपदेश करतात तेच योगवाशिष्ठ.

“जो पर्यंत मनुष्य अहंकारी असतो आणि त्याने विषय जिंकलेले नसतात तोपर्यंत त्याला शांती आणि परमानंदाची प्राप्ती होत नाही. शांती आणि आनंदाचा अनुभव आत्मानुभूतीनेच येत असतो.

इंद्रियांच्या भोगाने माणसाची तृप्ती कधीही होत नाही. जी वस्तू प्राप्त केल्या नंतर आणखी काही प्राप्त करण्याचे राहत नाही आणि दु:ख, शोक आणि मोह याचा लवलेशही उरत नाही असे मानवाने प्राप्त करून घेतले पाहिजे. त्यातच शांती आणि परमानंद आहे.

यम (सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अस्तेय आणि अपरिग्रह) आणि नियम (सुचिता, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान) याचा अभ्यास करून आपले मन शुद्ध आणि विवेकी केले पाहिजे."

## महाभारत–

(ही कथाही सर्वांच्या परिचयाची आहे. त्यामुळे काही महत्वाच्या घटनाच येथे घेतल्या आहेत.)

महाभारताची एकंदर १८ पर्वे आहेत. पर्व म्हणजे विभाग. हरिवंश हे खिल(परिशिष्ट), १९ वे पर्व. प्रत्येक पर्वात अनेक उपपर्वे, उपपर्वे अध्यायांमध्ये आणि अध्यायश्लोकांमध्ये अशी रचना आहे. क्वचित काही अध्याय हे गद्यरूप आहेत. सामान्यतः सर्व १८पर्वांची शीर्षके लक्षात घेतली, तर ती सर्व शीर्षके क्रमाने विकास पावणाऱ्या कथेचीविषयदर्शक शीर्षके आहेत असे वाटते. **(१) आदिपर्व, (२)सभापर्व, (३) वनपर्व, (४) विराटपर्व, (५) उद्योग पर्व, (६) भीष्म पर्व, (७) द्रोणपर्व, (८) कर्ण पर्व, (९) शल्य पर्व, (१०) सौप्तिक पर्व, (११) स्त्री पर्व, (१२)शांती पर्व, (१३) अनुशासन पर्व, (१४) आश्वमेधिक पर्व, (१५) आश्रमवासिक पर्व, (१६)मौसल पर्व, (१७) महाप्रस्थानिक पर्व, (१८) स्वर्गारोहण पर्व.**

हरिवंश हे पर्व खिल म्हणजे परिशिष्ट किंवा मागून जोडलेले एकोणिसावे पर्व होय. प्रत्यक्ष महाभारतात कृष्णकथा नाही. ती कथा विस्ताराने हरिवंशात सांगितली आहे.

महाभारताची रचना किंवा महाभारताची निरनिराळया वेळी झालेली संस्करणे म्हणजे व्यासांची रचना.

महाभारताच्या मुख्य कथेची रूपरेषा अशी आहे : आदिपर्व : पांडू व धृतराष्ट्र यांचा जन्म नियोगविधिने अंबालिका व अंबिका ह्या विचित्रवीर्याच्या पत्नींपासून झाला. धृतराष्ट्र हा जन्मांध म्हणून त्याला राजपद मिळाले नाही. पांडू हा युद्धविद्यानिपुण म्हणून हस्तिनापूरच्या राजसिंहासनावर भीष्मांनी त्याची स्थापना केली. धृतराष्ट्र, पांडू व विदुर या तिघांचेही शिक्षण झाले व विवाहही झाले.धृतराष्ट्राने गांधारीला वरले. आपला पती अंध आहे, असे समजताच तिने आपल्या नेत्रांवर कायमची पट्टी बांधली. कुंती आणि माद्री यांच्याशी पांडूचा विवाह झाला.

एकदा अरण्यात मृगया करीत असताना मृग आणि मृगीच्या रुपाने एक मुनिदांपत्य कामोपभोग घेत होते. पांडूचा बाण लागून मुनी मरण पावला. मरताना पांडूला त्या मुनीने शाप दिला की, तूही स्त्रीसंग करताच तत्काल मरशील. त्यानंतर पांडूने विजनवास पत्करला. वनात असताना पांडूने कुंती आणि माद्री या दोन्ही पत्न्यांना नियोगविधिने अन्य पुरूषांपासून पुत्रप्राप्ती करून घ्यावी, अशी आज्ञा केली. कुंतीला एका ऋषीने पुत्र प्राप्तीकरता मंत्रविद्या शिकवली होती. तिच्या योगाने कुंतीने यम, वायु व इंद्र यांचे मंत्रांनी आवाहन करून त्यांच्यापासून धर्म, भीम व अर्जन हे पुत्र प्राप्त करून घेतले; माद्रीने आश्विनीकुमारांपासून नकुल व सहदेव हे दोन पुत्र मिळविले.

धृतराष्ट्राची पत्नी गांधारी याच सुमारास गर्भवती होती. आपल्या आधी कुंतीला पुत्र झाल्याचे ऐकून तिच्या मनाला धक्का बसला आणि तिचा गर्भ पतन पावला. धक्का बसण्याचे कारण आपला पुत्र राज्याचा वारस होणार नाही; कुंतीचाच पुत्र वारस होईल, हे लक्षात आले. तिचा गर्भ लोखंडासारखा टणक मांसपेशी होता. व्यासांच्या सांगण्यावरून त्यावर थंड पाण्याचा शिपका मारला. त्याचे एकशे एकभाग झाले. ते भाग

एकशे एक घृतकुंभांमध्ये जपून ठेवले. त्यांतून दुर्योधन, दुशाःसन इ. शतपुत्र आणि एक कन्या अशी एकशे एक अपत्ये निपजली.

एके दिवशी माद्रीशी रममाण झाला असताना पांडू पंचत्वाप्रत गेला; कारण त्याला तसा शाप होता.त्याच्याबरोबर माद्रीने सहगमनकेले.

कुंती पाच पांडवांसह राजधानीला म्हणजे हस्तिनापूरला परतली.

दुर्योधन, शकुनी, दुःशासन आणि कर्ण यांनी गुप्त खलबत करून कुंतीला पुत्रांसह दग्ध करण्याचा कट रचला.

कौरवांनी वारणावत या सुंदरनगरीमध्ये जतुगृह म्हणजे लाखेचा महाल तयार करविला. त्वरित ज्वालाग्राही अशा लाखेच्या ह्या महालात कुंतीसह पांडव राहतील अशी योजना केली. दुर्योधनाचा हस्तक

पुरोचन योग्य वेळी लाक्षागृहाला आग लावणार होता. विदुराच्या हा सगळा कट लक्षात आला. धृतराष्ट्राने कुंती आणि पांडवांना सांगितले होते, की वारणावत ही नगरी फार सुंदर आहे. ती पहायला तुम्ही तिकडे जा. या कटाचा सुगावा विदुराला लागला होता. त्याने आपल्या कुशल कारागिराकडून त्या जतुगृहातून गुप्त रीतीने बाहेर पडण्याकरता एक भुयार खोदून घेतले. वारणावनात आल्यावर एके दिवशी कुंतीने ब्राह्मणभोजनाचा व दानधर्माचा कार्यक्रम केला. संतुष्ट अतिथी आणि पुरोचिन रात्री झोपी गेले. त्या लाक्षामहालात एका बाजूला आपल्या पाच पुत्रांसह एक निपादी उतरली होती. रात्री भीमानेच लाक्षागृहाला आग लावली. पांडव लगेच उठून त्या भुयारातून कुंतीसह गुप्तपणे सुखरूपबाहेर पडले आणि वनात गेले. पुरोचन ह्या आगीत जळून मेला. तसेच दुसऱ्या दिवशी पाच पुत्रांसह एक स्त्री जळलेली पाहून कौरवांना वाटले की, पांडवांचा योग्य निकाल आपण लावला.

राक्षस हे रात्री हिंडत असतात.  त्याप्रमाणे हिडिंब नामक राक्षस व त्याची भगिनी हिडींबा यांना माणसांची चाहूल लागली. हिडिंब राक्षसाने हिडिंबेला तीमाणसे हुडकून काढण्याकरता पाठवले. तिला पांडव दिसले. त्यातला भीमसेन तिला फारआवडला. भीमसेनावर ती आसक्त झाली. हिडिंबा परत गेली नाही. हिडिंब हा तिचा भाऊ तेथे आला व खवळला. त्याचे आणि भीमसेनाचे युद्ध झाले व त्यात हिडिंब ठार झाला. हिडिंबेने भीमाशी विवाह करण्याची अनुज्ञा कुंतीपाशी मागितली. दोघांचा विवाह झाला. हिडिंबेला घटोत्कच नावाचा पुत्र झाला.

नारदमुनींच्या उपदेशाप्रमाणे पांडवांनी द्रौपदीबरोबर प्रपंच एकत्र न करता दिवस प्रत्येकाला वाटून घ्यावे; एकमेकांशी एकमेकांच्या एकांतवासात विक्षेप आणू नये; विक्षेप जो आणिल त्याने एक वर्ष वनवास पत्करावा; असे ठरले. परंतु एका महत्त्वाच्या कारणास्तव अर्जुनाकडून नियमभंग झाला. अर्जुन वनवास पतकरून अनेक देश हिंडला. या यात्रेत उलुपी नावाची नागकन्या व मणिपूरची राजकन्या चित्रांगदा यांच्याशी विवाह करून त्यांच्यापाशी काही दिवस राहिला. या यात्रेत द्वारकेलाही त्याने भेट दिली व

रामकृष्णांची भगिनी सुभद्रा हिच्या प्रेमात सापडून तिला पळवून नेले. याला कृष्णाची संमती होती; पण बलरामाची नव्हती. बलरामानेही अखेर संमती दिली. दोघांचा विवाह झाला आणि अर्जुन सुभद्रेला घेऊन इंद्रप्रस्थास परतला.

द्रौपदीला याज्ञसेनी, पांचाली किंवा कृष्णा अशा अनेक नावांनी संबोधितात. द्रुपदाचे तिसरे अपत्य म्हणजे शिखंडी हा होय. तो पहिल्यांदा कन्येच्या रूपाने उत्पन्न झाला. पश्चात स्थूणाकर्ण यक्षाच्या कृपेने तो पुरूष बनला.द्रौपदीला पांडवांपासून पाच पुत्र झाले. सुभद्रेला अभिमन्यू झाला.

**स्त्री पर्व** : राजा धृतराष्ट्र आणि गांधारी हे दोघे भयंकर दुःखाने खचले. पती व पुत्र गमावलेल्या सगळ्या वीर स्त्रिया आक्रोश करीत होत्या. संजय आणि विदुर धृतराष्ट्राचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याच सुमाराला पांडव आणि कृष्ण हे धृतराष्ट्राच्या भेटीस आले. पांडवांशी सद्भावनेने वागण्याचा उपदेश कृष्णाने धृतराष्ट्रास केला. गांधारीच्या दुःखाला पारावार नव्हता; कारण सगळे पुत्र मारले गेले होते.

द्रौपदीनेही सगळे पुत्र गमावले होते.गांधारीजवळ श्रीकृष्ण गेला, तेव्हा दुःखतप्त गांधारीने त्याला शाप दिला, की या सर्वसंहाराचे मूळ तू आहेस. तुझ्या यादवकुलाचाही असाच निःपात होईल आणि तो तुला आपल्या डोळयांनी पहावा लागेल.

**अनुशासन पर्व** : अध्यात्मशास्त्र, धर्मशास्त्र, शुभाशुभ कर्मविचार, दैव पुरूष विचार, अनेकवर्णांचे आणि आश्रमांचे धर्म, गोरक्षणाचे माहात्म्य, तारकासुर वृत्तांत, श्राद्यविधी अशा विविध संकीर्ण विषयांचे भीष्मांनी केलेले विवेचन या अनुशासन पर्वात आले आहे. श्रोता व पृच्छक आहेत युधिष्ठिर म्हणजेच धर्मराज.

**आश्रमवासिक पर्व** : करूवंशाचा प्रमुख या नात्याने धृतराष्ट्राचा युधिष्ठिरांकडून सर्व प्रकारे आदर केला जात होता. गांधारीचाही राज कुलात मान राखला जात होता. पंधरा वर्षे राजमहालात राहिल्यानंतर धृतराष्ट्राने गांधारीसह वानप्रस्थ स्वीकारला. धृतराष्ट्र-गांधारी वनात गेले. कुंती, विदुर आणि संजयही

त्यांच्यासह वनात गेले. दोन वर्षांनंतर पांडवांना वार्ता आली की, धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंती हे दावानलामध्ये भस्मसात झाले. संजय हिमालयात निघून गेला.

**मौसल पर्व** : कुरूयुद्ध झाल्यानंतर ३६ वर्षांनी पांडवांना पुन्हा धक्कादायक वार्ता मिळाली की गांधारीच्या शापामुळे यादव वंशासह कृष्णाचा नाश झाला आहे. ऋषीच्या शापामुळे यादव मद्य पिऊन बेहोश झाले आणि सर्वांनी आपापसांत युद्ध करून एकमेकांना ठार मारले. सर्व यादवांचा निःपात झाला. बलरामानेही आपला अवतार संपवला. कृष्ण वनात जाऊन समाधी लावून बसला असताना एका व्याधाने त्याच्यावर मृग समजून बाण मारला; त्याच्या पायात तो गेला व त्याची अवतारसमाप्ती झाली. रूक्मिणी, हेमवती, जांभवती इ. काही कृष्णपत्न्यांनी अग्निप्रवेश केला. सत्यभामेने तपश्चर्येसाठी वनाचा आश्रय घेतला. उरलेल्या परिवारास घेऊन अर्जुन द्वारकेतून बाहेर पडला. पाठोपाठ समुद्राला उधाण येऊन द्वारका

समुद्राच्या पोटात गडप झाली. अर्जुन राहिलेल्या यादव स्त्रियांसह हस्तिनापुरात येत असता वाटेत वन्य जनांनी अर्जुनावर हल्ला केला; लुटालूट केली आणि यादव स्त्रियांना पळवून नेले. वाटेत व्यासांच्या आश्रमात अर्जुन आला तेव्हाव्या सांनी सांगितले की, आता सर्व संपले आहे; पांडवांनी महाप्रस्थान ठेवावे.

**महाप्रस्थानिक पर्व** : व्यासांच्या निरोपाप्रमाणे युधिष्ठिरांनी महाप्रस्थानाचा संकल्प केला. अभिमन्युपुत्र परिक्षित याला राज्याभिषेक केला. नंतर हस्तिनापूर सोडून उत्तरेस द्रौपदीसह सर्व पांडव महाप्रस्थानास निघाले. हिमालय पर्वत पार केल्यावर त्यांना वाळूचा समुद्र लागला. मेरू पर्वताचे दर्शन झाले. शक्ती क्षीण झाली. प्रथम द्रौपदी कोसळली आणि संपली.

क्रमाने सगळे पडले आणि संपले. युधिष्ठिर तेवढे पुढे जाऊ शकले. वाटेत रथस्थ इंद्राने त्यांचे स्वागत केले.

इंद्र युधिष्ठिरांस स्वर्गात नेण्यासाठी आला होता. आपले बंधू आणि पत्नी द्रौपदी ह्यांच्याशिवाय आपण स्वर्गात येणार नाही, असे युधिष्ठिरानी सांगितले. ते सर्व आधीच स्वर्गात पोहोचल्याचे इंद्राने त्यांना सांगितले. युधिष्ठिरांबरोबर एक कुत्रा सारखा होता. त्याला स्वर्गात घेण्याचे इंद्राने नाकारले, तेव्हा धर्मराजांनी आपण स्वतःही त्या कुत्र्यावाचून स्वर्गात राहू शकत नाही, असे उत्तर दिले. हे उत्तर दिल्याबरोबर तो कुत्रा जो प्रत्यक्ष धर्मदेवच होता तो प्रकट झाला. धर्मदेवाने युधिष्ठिरांची प्रशंसा केली. नंतर स्वर्गात जाण्यासाठी युधिष्ठिर इंद्राच्या रथातबसले.

**स्वर्गारोहण पर्व** : स्वर्गामध्ये युधिष्ठिरांना दुर्योधन मानाने सिंहासनावर बसलेला दिसला. आपले बंधू मात्र त्यांना तेथे दिसले नाहीत; द्रौपदीही दिसली नाही. त्यांना सखेदाश्चर्य वाटले. जेथे हे सर्व आहेत, तेथेच मला न्या, असे ते म्हणू लागले. तेव्हा एका देवदूताने त्यांना नरकात नेले. नरकाचे दर्शन त्यांना असह्य झाले; पण तेथेच त्यांना आपले बंधू, पत्नी व आप्त भेटले. हे सर्व नरकात का? ह्यांनी पातक तरी कायकेले ? असे

प्रश्न युधिष्ठिरांना पडले. त्यांनी ह्या सर्वांसह नरकातच रहावयाचे ठरविले. अखेरीस धर्मदेवाने युधिष्ठिरांना सांगितले, की तू जे पाहिलेस, ती भगवानइंद्राची माया होती. तुझ्या परोपकारबुद्धीची कसोटी त्यातून पाहिली गेली. तू तीत उत्तीर्ण झालास. तुझे बंधू, द्रौपदी आदि सर्व स्वर्गातच आहेत. त्यानंतर युधिष्ठिराचा मानवी देह नाहीसा होऊन तो परमात्म्यात विलीन झाला.

जोशी, लक्ष्मणशास्त्री (विश्वकोश)

## कृष्णचरित्र–

(हे सर्वांच्याच परिचयाचे आहे. त्यामुळे त्यातल्या काही महत्वाच्याच घटना येथे घेतल्या आहेत.)

भागवतात गोपी आणि कृष्ण यांच्या शृंगाराचे उत्तान वर्णन आले आहे. तसेच कृष्ण व गोपींची रासक्रीडा खूप खुलवून सांगितली आहे.

हरिवंशात हा शृंगार आणि क्रीडा सूचक रूपानेच तेवढी आली आहे.महाभारत, हरिवंशव भागवत यांमध्ये कृष्ण हा गोपींचा प्राणवल्लभ म्हणून निर्दिष्ट केलेला असला, तरी तेथे कोठेही राधेचा निर्देश नाही.

यदुवंशाच्या वृष्णिकुलात कृष्णाचा जन्म झाला.

देवकाला चार मुलगे व सात मुली झाल्या. देवकाची कन्या देवकी ही वसुदेवाची पत्नी आणि कृष्णाची माता होय. मथुरेच्या तीरावर ‘व्रज’ म्हणजे गोकुळ होते.

वसुदेवाची सख्खी बहीण ‘पृथा’ म्हणजे पहिल्या तीन पांडवांची माता कुंती होय. कुंती ही कुंतभोज राजाला दत्तक गेली होती.

नंद आणि यशोदा यांचा पुत्र म्हणून कृष्ण गोकुळात व नंतर गोकुळाची वस्ती उठल्यावर वृंदावनात वाढला. कृष्णाने द्वारकेत व भोवतालच्या प्रदेशात बलरामाच्या साहाय्याने गणराज्याची स्थापना केली. या गणराज्याचा उल्लेख महाभारतातील शांतिपर्वात आहे. कृष्णाने विदर्भराजा हिरण्यलोमा किंवा भीष्मक या यादव वंशीय राजाच्या रुक्मिणीनामक सुंदर कन्येशी राक्षस विवाहविधीने विवाह केला.

भीष्मकाला 'दाक्षिणात्येश्वर' असे विशेषण हरिवंशात लावलेले आहे. तेथे म्हटले आहे, की 'कुंडीननामक नगरीत राहून याने अगस्त्याच्या दिशेवर म्हणजे दक्षिण दिशेवर आपली राजसत्ता चालविली.' राक्षसविवाहविधी हा क्षत्रियांस विहित मानला आहे. राक्षसविवाहविधी म्हणजे कन्येला तिच्या माता-पित्यांच्या संमतीवाचून पळवून नेऊन विवाह करणे. बलरामासह कृष्ण रुक्मिणीला द्वारकेस घेऊन गेला व तेथेच शास्त्रोक्त पाणिग्रहण विधीने कृष्णाने रुक्मिणीला वरले.

सत्यभामा, जांबवती, कालिंदी, मित्रविंदा, सत्या, भद्रा व लक्ष्मणा यांच्याशी कृष्णाचे विवाह झाले. त्याही पराक्रमाच्या योगानेच त्याने मिळविल्या. कृष्णाच्या या अष्टनायिका होत.

पांडवांचा आणि कृष्णाचा मैत्रीचा संबंध कृष्णाची भगिनी सुभद्रा व अर्जुन यांच्या विवाहाने दृढ झाला,

भारतीय युद्धात कृष्णाने दुर्योधनाला आपली सेना दिली व स्वतः अर्जुनाचे सारथ्य केले. त्यावेळी अर्जुनाला तत्वज्ञानावर अधिष्ठित असा कर्तव्य पालनास उपयुक्त नीतितत्त्वांचा उपदेश देऊन युद्धाला प्रोत्साहित केले. कृष्णाने या युद्धात पांडवांना अनेक वेळा कुटिल सल्लामसलत देऊन त्यांच्या विजयास भरपूर हात दिला.

कृष्णाच्या अखेरच्या जीवनपर्वात यादवांमध्ये आपसांत मारामाऱ्या होऊन यादवकुलाचा संहार झाला. बलराम कृष्णांना या सर्व गोष्टींचा अत्यंत वीट आला. बलरामाने देहाचे विसर्जन केले आणि

कृष्णाने प्रभासक्षेत्राजवळील वनामध्ये योगसमाधी लावली. त्यात एका पारध्याचा बाण लागल्यावर त्याने देह सोडून दिला.

यादवकुलाचा पशुसंगोपन मुख्य व्यवसाय; त्यांच्या काही शाखांमध्ये तो कृष्णापर्यंत चालू होता. त्यामुळे कृष्णकथा ही वैश्य व शूद्र या भारतीय समाजरचनेतील लोकांमध्ये अत्यंत प्रिय झाली. शूद्रादी खालच्या वर्णांना कृष्ण हा आपल्यातीलच वाटू लागला.

त्यामुळे भक्तिमार्ग हा चांडालादिकांपर्यंत म्हणजे हरिजनांपर्यंत हरिप्राप्तीचा मार्ग ठरला. नृत्य व वाद्यकलेत निपुण असलेला हा मुरलीधर गोपगोपींसह रासक्रीडेत रममाण होतो; गोपालनात निपुण; पोहणे, कुस्ती इ. शारीरिक शक्तींच्या खेळांमध्ये तरबेज; उत्कृष्ट मल्ल असा कृष्ण सामर्थ्यशाली सुसंस्कृत जीवनपद्धतीचा आदर्श ठरतो. जरासंध, बाण इत्यादिकांशी संग्रामांत विजयी होणारा वीर म्हणूनही शूरांना तो स्फूर्ती देणारा ठरतो. पांडवांचा मुत्सद्दी सल्लागार आणि भगवद्गीतेच्या तत्त्वज्ञानाचा महान द्रष्टा म्हणून कृष्णाचे दिव्य स्थान भारतीय संस्कृतीत अढळ बनले. वेदकालापासून आजपर्यंत झालेल्या जगातील धार्मिक

विभूतींमध्ये, धर्मसंस्थापकांमध्ये इतके वैचित्र्यपूर्ण, सर्वांगीण आणि समृद्ध चरित्र जगाच्या वाङ्मयात कोणाचेही सापडत नाही.

पौराणिक परंपरेप्रमाणे कृष्ण हा द्वापर युगाच्या अखेरीस म्हणजे द्वापर आणि कली यांच्या संधिकाळात इ. स. पू. ३००० वर्षांच्या पूर्वी झाला.

भारतीय युद्धाच्या समयी कृष्णाचे वय १०० किंवा त्याहून थोडे अधिक होते, असे काहींचे म्हणणे आहे.

## श्रीमद्भगवद्गीता -

(दोन्ही बाजूंची सैन्ये एकमेकांशी भिडली असता शस्त्रसंपात प्रवृत्त झाला असताना इतकी दीर्घकाळ तत्त्वचर्चा चाललेली विसंगत वाटते.)

विश्वव्यापी विनाशाच्या अपरिहार्य परिणतीच्या दर्शनाने मानवी मन गलितधैर्य बनताकामा नये; तटस्थ, अलिप्त, शांत, तत्त्वदर्शी प्रज्ञेच्या सामर्थ्याने प्रपंचातमानवाने टिकले पाहिले, असा संदेशगीतादेते.

मानवी जीवनाचा अर्थ अनंत व अगाधविश्वाच्या म्हणजे विश्वरूपदर्शनाच्या संदर्भात लक्षात घेऊन गीतेने हा संदेश दिला आहे.महाभारत संग्रामाचा तो ध्वनितार्थ आहे. वासुदेव कृष्ण हा पुरूषोत्तम, प्रत्यक्ष विष्णूच भगवद्गीतेचा उपदेष्टा आहे. मूलतः महाभारत हा वासुदेव भक्तिसंप्रदायातला ग्रंथ आहे; परंतु त्यात अर्जुनाला पाशुपत अस्त्र देणारा पशुपती शिवही मधून मधून प्रकट होतो; देवीही एखाद्या वेळी झळकते.

हिंदू धर्मातील सर्व संप्रदायांना मान्य असा हा ग्रंथ आहे. मुख्यतः हे महाकाव्य आहे. या महाकाव्यामध्ये धीरोदात्त पुरूष आणि महनीय महिला यांचे जीवन हे केंद्रस्थानी आहे. अद्भूत कथानकांच्या स्वरूपात दडलेल्या अतिप्राचीन इतिहास त्यांत सूचित केला आहे. राजनीती, धर्मशास्त्र आणि तत्त्वज्ञान त्याचप्रमाणे तीर्थकथांच्या संदर्भातील धार्मिक कर्मकांड यांचाही ऊहापोह यात केलेला आहे. कमीत कमी दोन सहस्त्रवर्षे मान्य झालेला हा ग्रंथ आहे.

जोशी, लक्ष्मणशास्त्री (विश्वकोश)

काही नेहमीच्या वापरातल्या महत्वाच्या **प्राचीन संज्ञा** (व्याख्या) –

१) अंतरिक्ष – ज्याच्या मध्यभागी नक्षत्रे असतात ते.

२) अंत्येष्टी – अंत्य म्हणजे शेवटचा आणि इष्टी म्हणजे यज्ञ. या यज्ञात स्वत: यजमानच हविर्द्रव्य असतो. यजमानाचा मुलगा वा आप्तबांधव यांच्याकडून त्यालाच आहुती म्हणून दिले जाते.

३) अतींद्रिय – परब्रह्माची अनुभूती.

४) अद्वैत – जीवात्मा व परमात्मा यात द्वैत नाही, याचे आत्मज्ञान.

५) अध्यात्मशास्त्र – परब्रह्माचे आत्मज्ञान.

६) अपरिग्रह – संपत्तीचा वा भोग्य वस्तूंचा संचय (संग्रह) न करणे.

७) अहिंसा – हिंसेच्या विरुद्ध अर्थ. कृत (स्वत: केलेली), कारित (दुसरयाकडून करविलेली) आणि अनुमोदित (मूक संमती असलेली) असे हिंसेचे तीन प्रकार आहेत.

८) गाथा – 'गीयते इति गाथा' जी गायिली जाते ती.

९) धर्म – ज्यामुळे व्यक्ती व समाज यांची धारणा होते तो धर्म होय.

१०) निर्गुण – गुणरहित. हे अनादि अनंत असते. परमात्मा, परब्रह्म वा चैतन्यतत्व निर्गुण आहे.

११) वाच्यार्थ –वाच्यार्थ म्हणजे कोणतीही वस्तू ज्या नावाने ओळखली जाते ते नाव होय. व लक्ष्यार्थ म्हणजे ज्या नावावरून दुसरा काही विशिष्ट अर्थ लक्षात घ्यावयाचा असतो तो होय.

**संदर्भ ग्रंथ** : (अधिक माहितीसाठी हे ग्रंथ जरूर वाचा. इतरही साहित्य विपुल प्रमाणात उपलब्ध आहे.)

१) उपनिषदें भाग १ व २ – आनंद साधले

२) ऋग्वेद - स. कृ. देवधर

३) यजुर्वेद - स. कृ. देवधर

४) सामवेद - स. कृ. देवधर

५) अथर्ववेद – स. कृ. देवधर

६) विश्वकोश

७) भारतीय आचार्य – विद्यावाचस्पती शंकर वासुदेव अभ्यंकर

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी भाषा आणि संस्कृती यांचा इंटरनेटच्या काळात झपाट्याने विकास व्हावा म्हणून ई साहित्य प्रतिष्ठान काम करते. इंटरनेट हे भविष्याचे माध्यम आहे. आपली संस्कृती, आपला वारसा आणि आपली भाषा यांची ओळख येणाऱ्या पिढ्यांना व्हायला हवी तर ते सर्व इंटरनेटवर ठेवायला हवं. आपल्या भाषेतली पुस्तकं इथे हवी. तरुणांच्या मोबाईलवर त्यांना स्थान मिळायला हवं. त्यांचा घरोघरी प्रसार व्हायला हवा. त्यासाठी ही सारी खटपट चालू आहे.

त्यात आपला सहभाग हवा आहे. पैसे नकोत. वेळही नको. फ़क्त दोन गोष्टी करा.

एक : आपण वाचलेल्या पुस्तकांबद्दल प्रतिक्रिया द्या. या कार्याबद्दल आपलं मत कळवा.

दोन: आपल्या ओळखीच्या दहा मराठी साक्षर लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

आमचा पत्ता : esahity@gmail.com

आपले नम्र

ई साहित्य प्रतिष्ठान